QURANACHYA SHEETAL CHHAYET

'कुरआनच्या' शीतल छायेत

* लेखक *

डॉ.एम.जियाउर्रहमान आज़मी

एम्.ए.पी.एच्.डी.

* भाषांतर *

बादशहा बार्शीकर, एम्.ए.बी.एड्.

विषय सूची (अनुक्रमणिका)

	हितगूज	५
	लेखका विषयी चार शब्द	६
	पहिला भाग	
१	कुरआन आणि ईश्वराची महा सत्ता	८
२	कुरआन व एकेश्वरवाद	११
३	ईश्वर निष्ठा	१६
४	कुरआन आणि ईश्वराचे प्रेषित	१९
५	कुरआन आणि प्रलयाचा दिवस	२४
६	कुरआन आणि ज्ञान	२७
७	ज्ञानासाठी प्रेरणा	२९
८	कुरआन आणि समाज	३६
९	कुरआन व माता-पिता	३९
१०	कुरआन आणि न्याय	४१
११	कुरआन आणि राजनैतिक व्यवस्था	४४
१२	इस्लामी राज्याचे अधिकारी व त्यांची कर्तव्ये	४७
१३	आचार संहिता	४९
१४	कुरआन आणि नैतिक मूल्ये	५१
१५	मुक्ति मार्ग	५२
१६	कल्याणाचा मार्ग	५३
१७	क्षमा भाव	५५
१८	शांती मार्ग	५७
१९	प्रेम भावना	५९
२०	अशीही भक्ती, कुरआन आणि कुरआनच	६१

भाग दुसरा

२१	विश्वासाची शीतल छाया	६५
२२	इतिहासाची सोनेरी पाने	६७
२३	कुरआन आणि मार्गदर्शन	६९
२४	हजरत उमर आणि एक म्हातारी	७१
२५	हजरत उमर आणि पिठाची पोती	७२
२६	हजरत उमर आणि भेसळीचे दूध	७५
२७	हजरत उमर आणि समानता	७७
२८	प्रिय पुत्राच्या नावे पित्याचे पत्र	७९
२९	ती तिच्या कृत्यासाठी पश्चाताप करू लागली	८३
३०	उमर बिन अब्दुल अजीज खलिफा बनतात	८५
३१	एक ग्लास पाणी	८८
३२	हसन बसरीचे एक वैचरिक पत्र	९१
३३	नग्न तलवारीच्या छायेत	९४
३४	ही तुमची पत्नी आहे	९८
३५	मदिनेत रमजानचे स्वागत	१०२
३६	अंतीम इच्छेचे केंद्र	१०६
३७	अशी ही माणसे	१०८
३८	एका शतका नंतर	१११
३९	असेही व्यापारी	११४
४०	तेव्हा आणि आत्ता	११७
४१	कुरआन जगप्रसिध्द व्यक्तिंच्या नजरेतून	११९

हितगूज

खात्री बाळगा, सर्व ईश्वरीय ग्रंथात कुरआन चे महत्व सर्वात अधिक आहे. कारण

१) आज १४०० वर्षानंतरही कुरआन हा ग्रंथ प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर जसा अवतरला होता तसाच आहे. चौदाशे वर्षाच्या प्रदीर्घ कालखंडात त्याच्यात काना मात्रेचाही फरक झाला नाही. त्याचे मूळ स्वरुप आजही कायम आहे. कोणाही मानवाचे त्यात बदल करण्याचे धाडस झाले नाही.

२) कुरआनने मानवासाठी काटेकोर जीवन व्यवस्था सादर केली आहे. व्यापक अशी जीवन व्यवस्था कुरआनने सादर करतांना मानवाला वर्तमानात व भविष्यातही त्याचा उपयोग व्हावा, प्रत्येक देशाला त्या पासून लाभ मिळावा असे व्यावहारिक रुप-वर्तन प्रणाली आम्हास दिली आहे. त्या मुळे आपले जीवन सुखमय बनू शकते. त्या मुळे कुरआन इतर धर्मग्रंथा पेक्षा निराळा आहे.

त्या ईश्वरी महान ग्रंथाच्या शिकवणूकीची एक झलक, या पुस्तकाद्वारे-पहिल्या भागातून आपणास पाहवयास मिळेल.

याच पुस्तकाच्या दुसऱ्या भागात, कुरआनच्या अध्ययनाने, त्यातील विचारावर चालणाऱ्या व्यक्ति व समुहाचे स्वरुप कसे पालटले होते. हे दर्शविणाऱ्या कथा दिल्या आहेत. कुरआनच्या मार्गदर्शनाने समाज व व्यक्ति सदाचारी-मानवता प्रेमी व शालीन बनतो. हे काही ऐतिहासिक घटना द्वारे स्पष्ट केले आहे.

'कान्ति' साप्ताहिक दिल्ली यामध्ये प्रकाशित झालेल्या लेखांचे हे संकलन आहे. त्याचा आम्हास अभिमान वाटतो. 'कान्ति' परिवारातर्फे डॉक्टर साहेबांच्या या कृतीचे आम्ही स्वागत करतो. त्यांना सदिच्छा इच्छितो.

डॉ. कौसर यजदानी
सम्पादक
'कान्ति' साप्ताहिक, नवी दिल्ली
१९७७ ई. स. वी.

लेखका विषयी चार शब्द

या पुस्तकाचे लेखक डॉ. एम. जियाउर्रहमान आजमी यांचा जन्म सन १९४३ मध्ये झाला. हायस्कूलचे शिक्षण संपवून ते १९५९ मध्ये जामिया दारुस्सलाम उमराबाद, तामिळनाडू येथे शिक्षणासाठी गेले. सन १९६६ मध्ये 'मौलवी फाजिल' ची पदवी त्यांनी तेथे प्राप्त केली. १९७० मध्ये इस्लामी युनिव्हर्सिटी मदिना येथून इस्लामी कायदा हा विषय घेऊन बी.ए. ची पदवी प्राप्त केली. सन १९७३ मध्ये 'हजरत अबू हुरैराह आणि त्याच्या हदीस' या विषयावर शोध कार्य केल्यामुळे त्यांना शाह अब्दुल अजीज युनिव्हर्सिटी मक्का ने 'इस्लामिक स्टडीज' या विषयासाठी, 'एम-ए.' ची पदवी प्रदान केली. त्यानंतर अजहर विश्वविद्यालय काहिरा येथून त्यांनी पी.एच.डी. केली. पी.एच.डी. साठी त्यांनी इस्लामचे पैगंबर 'हजरत मुहम्मद (स.) यांचा न्याय' ह्या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला होता. त्यामुळे १९७७ मध्ये त्यांना सर्वोच्च पदवी पी.एच.डी. ने सन्मानित केले गेले.

डॉक्टर महोदयांनी, अरबी, उर्दू व हिंदी मध्ये भारत, पाकिस्तान आणि मध्य पूर्वेतील अनेक देशातील धार्मिक व साहित्यिक पत्र-पत्रिकेतून अनेक लेख लिहिले. त्या द्वारे ज्ञान प्रसाराच्या कामात त्यांनी मोलाचे कार्य केले आहे. १९७८ पासून मदिना विश्वविद्यालयात 'हदीस' चे प्रोफेसर आहेत. आता पर्यंत त्यांनी अरबी भाषेत एक डझनच्या वर पुस्तके लिहिली आहेत. ती पुस्तके इजिप्त आणि लेबेनान मधून प्रकाशित झाली आहेत.

या पुस्तकाची पहिली व दुसरी आवृत्ती झटकन संपून गेली. ती लोकप्रियही झाली. म्हणून ही तिसरी आवृत्ती आम्ही काही लेखात संशोधन करून प्रकाशित करीत आहोत. अशी आशा आहे की वाचकांना हे पुस्तक आवडेल.

प्रकाशक

भाषांतरकाराचे मनोगत

मागील १५ दिवस कुरआनच्या छायेत वावरत होतो. लौकिक जगाचा विसरच पडला जणू !

दिवसा भाषांतर आणि रात्री विचारच विचार ! प्रेषित मुहम्मद (स.) यांचा एकेश्वरवाद, फक्त एकेश्वराची भक्ति, प्रेम, न्याय, दया, क्षमा, शांती यांचा पुरस्कार. एक, कलह रहित, प्रेमावर आधारलेले, सद्भावाचा पुरस्कार करणारे निर्मोही जग निर्माण करण्यासाठी ईश्वराने एका निरक्षराची केलेली निवड, सर्व काही कल्पनेच्या बाहेरचे ! अद्भूत आणि आश्चर्य चकित करणारे !! सत्पथाचीच घोषणा करणारे दिव्य विचार !!!

सार्वकालिक, सर्व देशीय असे अक्षुण्ण विचार खुलफाए राशीदिनचे, पथ प्रदर्शक तसेच आचरणाचा सर्वोच्च आदर्श घालून देणारे विचार !

इस्लामी जगताचा ह्या दिव्य विचाराचा वारसा कोणी पुढे न्यायचा ? आजच्या भारतीय नेत्यांची क्षुद्र स्वार्थासाठी आपसात चाललेली हाणामारी, राष्ट्र मेले तरी आम्ही चैनित जगलो पाहिजे हा अट्टाहास. चोहोकडून अंधारून आल्या सारखे वाटते.

तेव्हा अचानक प्रकाशाचा झोत, कुरआन व प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या रूपाने हे भाषांतर करताना जाणवला. क्षणकाल अंतरबाह्य उजळून निघाल्याची सुखद जाणीव मनाला झाली.

इस्लाम हा एक केवळ तथाकथित धर्म नाही. तर ती वैश्विक एकात्मतेची जाणीव आहे. वाचकांना विनंती आहे. त्यांनी कसलेही पूर्वग्रह मनात न आणता इस्लाम समजून घ्यावा.

इस्लामी मराठी पब्लिकेशन्सने ही संधी मला दिली. शतशः आभार !

बादशहा बार्शीकर

पहिला भाग

कुरआन आणि ईश्वराची महान सत्ता (अधिकार)

ईश्वराची सत्ता कुरआनने विविध प्रकारे वर्णिली आहे. जसे पृथ्वी आणि आकाश या मध्ये जे काही आहे ते ईश्वरानेच निर्माण केले आहे. त्या मुळे पृथ्वीवरील कण नि कण ईश्वराचे गुणगान करतात. मानवाने आपल्यातील मानवांनाच ईश्वराची उपाधी दिली आहे आणि ते त्याचीच ईश्वर म्हणून उपासना करतात, ही मानवाची घोड चूकच आहे. आपण कुरआनच्या काही आयतींचे (मंत्रांचे) अध्ययन करू, आणि त्याच्या सत्तेचे महानतेचे गुणगान करूया.

"अथवा उदाहरण म्हणून त्या माणसाकडे पाहा, ज्याचे एका अशा वस्तीवरून जाणे झाले जी उजाड झाली होती. तो म्हणाला, ही वस्ती, जी नाश पावली आहे. उजाड आणि उध्वस्त झाली आहे, हिला अल्लाह कशा प्रकारे पुन्हा जीवन प्रदान करेल ही वस्ती पुन्हा वसवेल ?

यावर अल्लाहने त्या माणसाचे प्राण काढून घेतले. आणि तो शंभर वर्ष मृतावस्थेत पडून राहिला. नंतर अल्लाहने त्याला पुन्हा जीवित केले. आणि त्याला विचारले, "सांग तू किती काळ पडून राहिला आहेस ?"

त्याने उत्तर दिले, "फार तर एक दिवस अथवा काही तास राहिलो असेन."

"तुझी याच स्थितीत शंभर वर्षे व्यतीत झाली आहेत. आता जरा तुझ्या अन्न व पाण्याकडे पाहा. त्यात जरा देखील फरक झालेला नाही. दुसरीकडे तुझ्या गाढवाकडे पाहा. (की त्याच्या हाडाचा सापळा देखील कुजून गेला आहे.)" ईश्वराने खुलासा केला.

"आणि हे आम्ही या साठी केले आहे की आम्ही (ईश्वर) तुला मानवासाठी उदाहरण बनवू इच्छितो. मग पाहा की या हाडाच्या सापळ्यात पुनर्जीवित करून त्याच्यावर मांस व कातडी पुन्हा निर्माण करतो."

अशा प्रकारे सत्य स्थिती त्याच्यावर पूर्णपणे प्रकट झाली, तेव्हा तो म्हणाला, "मला माहित आहे की अल्लाह प्रत्येक गोष्टीवर प्रभुत्व राखतो."

सूरह अल बकरा २:२५९

"अल्लाहने स्वतः या गोष्टीची ग्वाही दिली आहे की, त्याच्या शिवाय

कोणीही परमेश्वर नाही. आणि फरिश्ते (देवदूत) व ज्ञानी लोकही ग्वाही (साक्ष) देतात की, त्या प्रभावशाली बुध्दिमंता शिवाय कोणीही अन्य ईश्वर नाही.''
सूरह आलि इमरान ३:१८

''सांगा, हे अल्लाह समस्त राज्याच्या स्वामी ! तू हवे त्याला राज्य देतोस व हवे त्याच्याकडून हिसकावून घेतोस. हवे त्याला प्रतिष्ठा प्रदान करतोस व हवे त्याला अपमानित करतोस. कल्याण तुझ्याच अधिकारात आहे. निःसंशय तू प्रत्येक गोष्टीला समर्थ आहेस.''

तू रात्रीला दिवसात ओवीत आणतोस, आणि दिवसाला रात्रीत, निर्जीवातून सजीवाला बाहेर काढतोस, व सजीवातून निर्जीवास व ज्याला इच्छितोस त्याला उदंड जीविका देतोस.''
सूरह आलि इमरान ३:२६-२७

''निःसंशय अश्रध्दा त्या लोकांनी केली, ज्यांनी सांगितले की, मरीयम पुत्र येशू मसीह हाच ईश्वर आहे. हे नबी (स.) त्यांना सांगा की, जर अल्लाहने मरीयम पुत्र येशू मसीह आणि त्याची आई, तसेच पृथ्वी वरील सर्वांना नष्ट करू इच्छिले, तर कोण त्याला या इराद्यापासून रोखू शकेल ? अल्लाह तर पृथ्वी आणि आकाशाचा आणि त्या मधील सर्व वस्तूंचा स्वामी आहे. ज्या पृथ्वी आकाशामध्ये आढळतात.

तो जे काही इच्छितो सृजन (निर्माण) करतो. व त्याचे प्रभुत्व सर्व वस्तूवर आहे.''
सूरह अल्माईदा ५:१७

''हे पैगंबर ! (स.) त्यांना सांगा, कधी तुम्ही याचा विचार केला आहे की, जर अल्लाहने तुमची दृष्टी व श्रवणशक्ति तुमच्या पासून हिराऊन घेतली आणि तुमच्या हृदयावर शिक्का मोर्तब केले. (तुमची आकलन शक्ति परत घेतली.) तर अल्लाह शिवाय कोण असा ईश्वर आहे, जो या शक्ति तुम्हास परत बहाल करू शकेल ? पहा कशाप्रमाणे आम्ही वरचेवर आपली (ईश्वराची) संकेत चिन्हे त्यांच्या समोर ठेवतो. आणि हे कशा प्रकारे त्याच्या पासून दृष्टी चुकवितात.''
सूरह अल् अन्आम ६:४६

''त्याने प्रत्येक वस्तू निर्माण केली आहे. व त्याला प्रत्येक वस्तुचे ज्ञान आहे. हा आहे अल्लाह तुमच्या पालनकर्ता, कोणीही अन्य ईश्वर त्याच्या शिवाय नाही. तो प्रत्येक वस्तुचा रक्षणकर्ता - भारधारक आहे.''
सूरह अल् अन्आम ६:१०१ ते १०२

“(उरली त्याची शक्यता तर) आम्हाला (ईश्वराला) कोणतीही वस्तू अस्तित्वात आणण्यासाठी या पेक्षा अधिक काही करावे लागत नाही की, तिला आदेश देतो की, “घडो.” आणि बस्स तसे घडते.” *सूरह अन्नहल १६:४०*

“आणि तोच आहे. ज्याने पाण्यापासून मनुष्य निर्माण केला. मग त्याच्या पासून (त्याचा) वंश व सासरच्या दोन शृंखला चालविल्या. तुझा पालनकर्ता मोठाच सामर्थ्यवान आहे.” *सूरह अल् फुरकान २५:५४*

“अल्लाहच तर आहे ज्याने दुर्बल अवस्थे पासून तुमच्या निर्मितीस प्रारंभ केला. मग त्या दुर्बलते नंतर तुम्हाला शक्ति प्रदान केली. मग त्या शक्तिनंतर तुम्हाला दुर्बल व वृध्द केले. तो जे काही इच्छितो निर्माण करतो आणि तो सर्व काही जाणणारा व प्रत्येक गोष्टीला समर्थ आहे.” *सूरह अर्‌रुम ३०:५४*

“स्तुती त्या अल्लाहसाठीच आहे. जो आकाशाचा व पृथ्वीचा बनविणारा आहे. दुतांना ‘संदेश पोहोचविणारा’ नियुक्त करणारा आहे. (असे दूत) ज्यांचे दोन-दोन, तीन-तीन व चार-चार बाहू आहेत. तो आपल्या निर्मितीच्या रचनेत जसे इच्छितो वाढ करतो. निश्‍चित अल्लाह प्रत्येक गोष्टीस समर्थ आहे.” *सूरह फातिर ३५:१*

“काय या लोकांनी पृथ्वीवर कधी संचार केलेला नाही, की जेणेकरून त्यांना त्या लोकांचा शेवट दिसला असता, जे त्यांच्या पूर्वी होऊन गेले आहेत ? आणि यांच्या पेक्षा जास्त शक्तिशाली होते. पृथ्वी व आकाशात त्यांना कोणतीही गोष्ट नमवू शकत नाही. तो सर्वज्ञ आहे आणि प्रत्येक गोष्टीवर सामर्थ्य बाळगतो.” *सूरह फातिर ३५:४४*

“अल्लाह प्रत्येक वस्तुचा निर्माता आहे. आणि तोच प्रत्येक वस्तूवर देखरेख ठेवणारा आहे. पृथ्वी आणि आकाशाच्या खजिन्याच्या किल्लया त्याच्याच जवळ आहेत. जे लोक अल्लाहच्या संकेताशी (आदेशाचा) द्रोह करतात त्यांचा तोटाच होतो.” *सूरह अज्‌जुमर ३९:६२ ते ६३*

“पृथ्वी आणि आकाशांचा राज्याचा स्वामी तोच आहे. (तोच) जीवन प्रदान करतो आणि मृत्यू देतो. आणि (तोच) प्रत्येक गोष्टीला समर्थ आहे.” *सूरह अल्‌हदीद ५७:२*

२) कुरआन व एकेश्वर वाद

कुरआनची शिक्षा-शिकवण ही एकेश्वर वादाचीच आहे. आमच्या पूर्वजांनीही हीच शिकवण आम्हास दिली होती. काळाच्या ओघात ती एकेश्वर वादाची शिकवण आम्ही विसरून गेलो होतो. काहींनी त्या मध्ये अयोग्य असे बदल केले होते. तेव्हा परमेश्वराने त्याच्या शेवटच्या ग्रंथाद्वारे (कुरआन) एकेश्वर वादास पुनर्जिवित केले. त्या लोकांवर कुरआनने कडक ताशेरे ओढले, जे लोक एक मेव ईश्वर सोडून अनेक देव देवतांची ईश्वर समजून पूजा करीत होते. कुरआन विविध प्रमाणित उदाहरणाने सिध्द करते की, या जगाचा एकच एक चालक आहे. व तोच पूजेस योग्य आहे.

आम्ही आमच्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ कुरआनातील काही वचने उधृत करीत आहोत. त्यांच्या सखोल अध्ययन पूर्वक वाचनाने तुम्हास प्रतीत होईल की, अरे ! हेच तर आम्हास अभिप्रेत होते.

"त्यांच म्हणणं आहे की, अल्लाहला पुत्रही आहे. अल्लाह या गोष्टीपासून दूर आहे, किती तरी पवित्र आहे. वास्तविक हे सत्य आहे की, पृथ्वी आणि स्वर्गातील सर्वच गोष्टीचा अल्लाह स्वामी आहे. सर्व जण त्याचेच आज्ञाधारक आहेत. तोच (तर) आकाश व पृथ्वीचा प्रवर्तक आहे. जेव्हा (तो) एखादी घटना घटित करण्याचे ठरवितो तेव्हा फक्त म्हणतो 'तथास्तु' आणि क्षणार्धात तसे घडते." *सूरह अल् बकरा २:११६ ते ११७*

"अल्लाह चिरंजीव आहे. त्याने सर्व जगाचा भार स्वतःच्या डोक्यावर घेतला आहे. त्याच्या शिवाय इतर कोणीही ईश्वर नाहीं. तो झोपत ही नाही आणि त्याला डुलकी ही लागत नाही. पृथ्वी व आकाशात जे काही आहे ते त्याचेच आहे. असा कोणीही नाही जो ईश्वराच्या परवानगी शिवाय कोणाची शिफारस करेल ! जे काही दासाच्या (मानवाच्या) दृष्य आहे व दासाला अदृष्य आहे, त्यालाही तो जाणतो. त्याच्या (ईश्वराच्या) माहिती पैकी कोणतीही गोष्ट त्याच्या (दासाच्या) बुध्दिकक्षेत येऊ शकत नाही. जो पर्यत तो (ईश्वर) त्यांना (दासांना-मानवाला) स्वतः देऊ इच्छित नाही. त्याचे राज्य पृथ्वी व आकाशावर पसरले आहे. त्याचे संरक्षणाने तो (ईश्वर) थकत नाही. फक्त तोच एकटा महान व श्रेष्ठ आहे." *सूरह अल बकरा २:२५५*

"अल्लाहने स्वतः या गोष्टीची ग्वाही दिली आहे की, त्याच्या शिवाय कोणीही 'ईश्वर' नाही. आणि फरिश्ते (देवदूत) व सर्व ज्ञान राखणारे सुध्दा रास्त व न्यायनीतिने याची ग्वाही देतात की, त्या प्रभावशाली बुध्दिमंता शिवाय (ईश्वरा शिवाय) खरे पाहता कोणीही (अन्य) ईश्वर नाही." *सूरह आलिइमरान ३:१८*

"'अल्लाह' त्याच्या शिवाय अन्य कोणीही ईश्वर नाही. तो तुम्हा सर्वांना त्या पुनरुत्थाच्या (न्यायाच्या) दिवशी एकत्र करील. ज्याच्या येण्यात कोणतीही शंका नाही. आणि अल्लाहच्या वचना पेक्षा अधिक खरी गोष्ट कोणाची बरे असू शकेल ?" *सूरह अन्निसा ४:८७*

"हे ग्रंथ धारकांनो ! आपल्या धर्मात अतिरेक करू नका. आणि अल्लाहशी सत्याखेरीज अन्य कोणतीही गोष्ट जोडू नका. मसीह, 'मरियम पुत्र ईसा' या व्यतिरिक्त इतर काहीच नव्हता, की तो फक्त एक अल्लाहचा प्रेषित होता. आणि एक आदेश होता की, जो अल्लाहने मरियम कडे पाठविला. आणि एक आत्मा होता अल्लाहकडून (ज्याने मरियमच्या गर्भात मुलाचे रूप धारण केले.) म्हणून तुम्ही अल्लाहवर व त्याच्या प्रेषितावर श्रध्दा ठेवा. आणि असे म्हणू नका की, 'तीन' आहेत. परावृत व्हा हे तुमच्याच हिताचे आहे. अल्लाह तर फक्त एकच आहे. तो पवित्र आहे त्या पासून की त्याचा कोणी पुत्र आहे. पृथ्वी व आकाशातील साऱ्या वस्तु त्याच्या मालकीच्या आहेत. आणि त्याच्या पालन पोषणासाठी व देखरेखीसाठी केवळ तोच पुरेसा आहे." *सूरह अल्निसा ४:१७१*

"खचितच द्रोह केला त्या लोकांनी, ज्यांनी म्हटले की, अल्लाह तिन्ही पैकी एक आहे. खरे पाहता एकमेव अल्लाह शिवाय कोणीही ईश्वर नाही. जर हे लोक आपल्या या गोष्टी पासून परावृत्त झाले नाही तर त्यांच्या पैकी ज्याने द्रोह केला आहे. त्याला कठोर शिक्षा दिली जाईल. मग काय हे लोक अल्लाह जवळ पश्चाताप व्यक्त करणार नाहीत ? आणि त्यांच्या जवळ माफी मागणार नाहीत? अल्लाह फार क्षमाशील व दया करणारा आहे." *सूरह अल् माईदा ५:७३-७४*

"जर, तुम्ही या लोकांना विचारले की, पृथ्वी आणि आकाश कोणी निर्माण केले आहे ? आणि चंद्र व सूर्यास कोणी अधीन केले आहे ? तर आवश्य म्हंतील की, 'अल्लाहने' मग कोठून हे (अश्रध्द) फसगत करून

घेत आहेत ? अल्लाहच आहे जो आपल्या दासापैकी ज्याची इच्छितो (त्याची) उपजीविका विपुल करतो. व ज्याची इच्छितो (त्याची) संकुचित करतो. निश्चित अल्लाह प्रत्येक गोष्ट जाणणारा आहे. आणि जर तुम्ही त्यांना (अश्रध्दांना) विचारले, कोणी आकाशातून पाणी वर्षविले ? आणि त्या द्वारे मृत पडलेल्या जमीनीला जिवंत केले ? तर ते अवश्य म्हणतील, 'अल्लाहने' सांगा, स्तुती त्या अल्लाहसाठीच आहे. परंतु त्यांच्या पैकी बहुतेकजण समजत नाहीत.'' *सूरह अल् कबूत २९:६१ ते ६३*

''यांना विचारा, आकाशात व पृथ्वीतलावर जे काही आहे, ते कोणाचे आहे ? सांगून टाका, सर्व काही अल्लाहचेच आहे. त्याने दया व कृपेची नीति स्वतःसाठी अनिवार्य करून ठेवली आहे. (म्हणून तो अवज्ञा व उध्दटपणावर लगेच पकडीत नाही.) पुनरुत्थानाच्या दिवशी तो तुम्हा सर्वांना अवश्य जमा करील. हे एक सर्वस्वी निःसंदिग्ध सत्य आहे. परंतु ज्या लोकांनी आपण होऊन स्वतःला विनाशाच्या धोक्यात टाकले आहे. ते त्याला मानीत नाहीत.

रात्रीच्या अंधारात आणि दिवसाच्या उजेडात, जे काही स्थिरावले आहे. ते सर्व अल्लाहचेच आहे. आणि तो सर्व काही ऐकतो व जाणतो. सांगा, अल्लाहला सोडून मी इतर कोणाला आपला पालक बनवू. त्या अल्लाहला जो आकाश व पृथ्वीचा निर्माता आहे. तो उपजीविका देतो. उपजीविका घेत नाही. सांगून टाका, मला तर हाच आदेश दिला गेला आहे की, सर्व प्रथम मी त्याच्यापुढे आज्ञा पालनार्थ मान तुकवावी. (आणि ताकीद करण्यात आली आहे की कोणी अनेकेश्वरवादी होत असेल तर होवो) तू कोणत्याही परिस्थितीत अनेकेश्वर वाद्यात सामील होऊ नकोस. सांगा, जर मी आपल्या पालन कर्त्याची अवज्ञा केली तर मला भय वाटते की, एका मोठ्या (भयंकर) दिवशी मला शिक्षा भोगावी लागेल. त्या दिवशी जो शिक्षेपासून वाचेल त्यावर अल्लाहने मोठीच दया केली आहे. आणि हेच (उघड) स्पष्ट यश आहे. जर अल्लाहने तुम्हाला एखाद्या प्रकारची हानी पोहोचवली तर त्याच्या शिवाय कोणीच नाही. जो तुम्हास हानीपासून वाचवू शकेल. आणि जर त्याने तुम्हाला एखाद्या चांगल्या गोष्टीने उपकृत केले तर त्याला प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य प्राप्त आहे. त्याला आपल्या दासावर सर्वाधिकार प्राप्त आहे. आणि तो बुध्दिमान व जाणकार आहे.

त्यांना विचारा कोणाची साक्ष सर्वाहून श्रेष्ठ आहे ? सांगा माझ्या व तुमच्या मध्ये अल्लाह साक्षी आहे. आणि हे कुरआन माझ्याकडे वह्य द्वारे (दिव्य अवतरणा द्वारे) पाठविले गेले आहे. जेणे करून तुम्हा प्रत व ज्या ज्या लोकांपर्यंत कुरआन पोहोचेल त्या सर्वांना मी सावध करावे. काय खरोखरच तुम्ही अशी साक्ष देऊ शकता ? की अल्लाह बरोबर इतर ईश्वर देखील आहेत. सांगून टाका, अशी साक्ष तर मी कदापि देऊ शकत नाही. सांगून टाका ईश्वर तर तोच एक आहे. आणि मी त्या अनेकेश्वरवाद्यापासून सर्वस्वी अलिप्त आहे. ज्यात तुम्ही गुरफटला आहात.''

सूरह अल् अनआम ६:१२ ते १९

''हा एक संदेश आहे. सर्व मानवासाठी आणि हा पाठविला गेला आहे की त्यांना याच्या द्वारे सावध केले जावे. आणि त्यांनी जाणावे की, वस्तुतः ईश्वर केवळ एकच आहे. आणि जे बुध्दिमान आहेत त्यांनी यावर विचार करावा.''

सूरह इब्राहिम १४:५२

''ता. हा. आम्ही हे कुरआन तुमच्यावर या साठी अवतरले नाही की, तुम्ही संकटात पडावे हे तर एक पुनःस्मरण होय. अशा प्रत्येक मानवासाठी ज्याने भीति बाळगावी. अवतरले गेले आहे त्याच्या कडून ज्याने निर्माण केले पृथ्वी आणि उत्तुंग आकाशांना तो परम दयाळू (सृष्टीच्या) सिंहासनावर विराजमान आहे. तोच स्वामी आहे त्या सर्व वस्तूंचा, ज्या आकाशात व पृथ्वीत आहेत. ज्या पृथ्वी व आकाशाच्या दरम्यान आहेत. आणि ज्या मातीखाली आहेत. तुम्ही वाटल्यास आपले म्हणणे थोडक्यात सांगा. तो तर हळूच सांगितलेली गोष्ट, किंबहुना त्या पेक्षाही अधिक गुप्त गोष्टही तो जाणतो. तो अल्लाह आहे. त्याच्या शिवाय अन्य कोणीच परमेश्वर नाही. त्याची उत्कृष्ट नामावली आहे.''

सूरह ताहा २०:१ ते ८

''ज्या लोकांनी अल्लाहला सोडून इतरांना वाली बनविले आहे. त्याचे उदाहरण कोळ्या सारखे आहे. जो आपले एक घर बनवितो. आणि सर्व घरापेक्षा जास्त दुर्बल कोळ्याचे घरच असते. यांना ज्ञान असते तर ! हे लोक अल्लाहला सोडून ज्या कोणा वस्तूचा धावा करतात, अल्लाह त्यांना चांगलेच जाणतो. आणि तोच जबरदस्त आणि बुध्दिमान आहे. ही उदाहरणे आम्ही लोकांच्या प्रबोधनासाठी देत असतो. परंतु यांना तेच लोक समजतात जे ज्ञान

बाळगणारे आहेत. अल्लाहने आकाशांना व पृथ्वीला सत्याधिष्ठित निर्माण केले आहे. वस्तुतः यात एक संकेत आहे. श्रध्दावंता साठी.''

सूरह अल् अन् कबूत २९:४१ ते ४४

''जर तुम्ही या लोकांना विचारले की, पृथ्वी आणि आकाशांना कोणी निर्माण केले आहे ? आणि चंद्र सूर्याला कोणी अधिन केले आहे. तर आवश्य म्हणतील की अल्लाहने, मग ते कोठून फसगत करून घेत आहेत ? अल्लाहच आहे जो, आपल्या दासापैकी ज्याची इच्छितो (त्याची) उपजीविका विपुल करतो. व ज्याची इच्छितो (त्याची) संकुचित करतो निश्चितच अल्लाह प्रत्येक गोष्ट जाणणाराच आहे. आणि तुम्ही यांना विचारले, कोणी आकाशातून पाणी वर्षविले. आणि त्या मृत पडलेल्या जमिनीला जिवंत केले. तर ते आवश्य म्हणतील, अल्लाहने. सांगा स्तुती अल्लाह साठीच आहे. परंतु यांच्या पैकी बहुतेक जण समजत नाहीत.'' *सूरह अल् अनकबूत २९:६१ ते ६३*

''जर अल्लाह एखाद्याला पुत्र बनवू इच्छित असता तर आपल्या निर्मिती पैकी हवे त्याला निवडले असते. पवित्र आहे तो या पासून (की एखाद्या त्याचा पुत्र असावा) तो अल्लाह आहे एकमेव आणि सर्वांवर प्रभुत्व संपन्न त्याने आकाश पृथ्वीला स्वतःच्या सामर्थ्याने निर्माण केले आहे. तोच रात्रीवर दिवसाला व दिवसाला रात्रीवर गुंळाळतो. त्यानेच सूर्य आणि चंद्राला अशा प्रकारे अधीन करून ठेवले आहे की प्रत्येक एका निश्चित वेळेपर्यंत भ्रमण करीत आहे. लक्षात ठेवा तो महान व क्षमाशील आहे. त्यानेच तुम्हाला एका जीवा पासून निर्माण केले आहे. मग तोच आहे ज्याने, त्या जीवापासून त्याची जोडी बनविली. आणि त्यानेच जनावरा पैकी आठ नर व माद्या निर्माण केल्या. तो तुमच्या मातांच्या पोटात तीन तीन अंधःकार युक्त पडद्यात तुम्हास एकानंतर एक आकार देत जातो. हाच अल्लाह (ज्याची ही कामे आहेत) तुमचा पालन कर्ता आहे. बादशाही त्याची आहे. कोणीही उपास्य त्याच्या खेरीज नाही. आणि मग तुम्हाला (त्याची भक्ति करण्यापासून) कोण विन्मुख करीत आहे.''

सूरह अज़ज़ुमर ३९: ४ ते ६

''सांगा, तो अल्लाहच आहे एकमेव अल्लाह सर्वापासून निरपेक्ष आणि सर्व त्याचे गरजवंत आहेत. न त्याची कुणी संतती आहे न तो कोणाची संतती आहे. आणि कुणी त्याच्या समान नाही.'' *सूरह अल् इखलास ११२: १ ते ४*

३) ईश्वर निष्ठा

कुरआन मुळातच एकाच ईश्वरावर श्रध्दा ठेवण्याचा आदेश देते.

“म्हणा की, आम्ही श्रध्दा ठेवली अल्लाहवर आणि त्या मार्गदर्शनावर जे आमच्याकडे अवतरले, आणि जे इब्राहिम, इस्माईल, इसहाक, याकूब व याकूबच्या संततीकडे अवतरले. जे मूसा, ईसा आणि दुसऱ्या सर्व प्रेषितांना त्यांच्या पालन कर्त्याकडून दिले गेले. आम्ही त्यांच्यात कोणताही भेदभाव करीत नाही. आणि अल्लाहलाच समर्पित झालो आहोत.” *सूरह अल् बकरा २: १३५ ते १३६*

“आता का हे लोक अल्लाहच्या आज्ञा पालनाची पध्दत (अल्लाहचा दीन-धर्म) सोडून इतर एखादी पध्दत इच्छितात ? वास्तविक पाहता आकाश व पृथ्वीमध्ये जे जे काही आहे, ते आपण होऊन किंवा अपरिहार्य पणे अल्लाहला समर्पित झाले आहे. आणि त्याच्याकडे सर्वांना रूजू व्हावयाचे आहे. हे पैगंबर ! सांगा की, “आम्ही अल्लाहला मानतो.” आणि त्या शिकवणीला मानतो जी आम्हावर (हजरत मुहम्मदांवर (स्व.)) अवतरली आहे. त्या शिकवणीलाही मान्य करतो ज्या इब्राहिम, इसहाक, याकूब आणि याकूबच्या संततीवर अवतरल्या होत्या. आणि त्या आदेशावरही श्रध्दा ठेवतो जे मूसा व ईसा आणि इतर प्रेषितांना त्यांच्या पालनकर्त्याकडून दिले गेले. आम्ही त्यांच्या पैकी कोणामध्येही भेदभाव करीत नाही. आणि आम्ही (मुस्लिम) अल्लाहच्या आदेशाच्या अधिन आहोत.” या आज्ञा धारकते शिवाय अन्य एखादी पध्दत अंगिकारीत असेल त्याची ती पध्दत कदापि स्वीकारली जाणार नाही. व मरणोत्तर जीवनामध्ये तो अयशस्वी व विफल होईल.” *सूरह आलि इमरान ३:८३ ते ८५*

“आता जगात सर्वोत्तम जन समुदाय तुम्ही आहात, ज्याला मानवाच्या मार्गदर्शन व सुधारणे करता, मैदानात आणले आहे. तुम्ही सदाचाराचा आदेश देता व दुराचारास प्रतिबंध करता. आणि अल्लाहवर श्रध्दा बाळगता. त्या ग्रंथ धारकांनी श्रध्दा ठेवली असती तर ते त्यांच्या करिता उत्तम होते.”
सूरह आलि इमरान ३ : ११०

“बरे तर या लोकांवर कोणते संकट कोसळले असते. जर त्यांनी अल्लाह व अंतिम

दिनावर श्रध्दा ठेवली असती, आणि अल्लाहने जे दिले आहे, त्यातून खर्च केले असते. जर त्यांनी असे केले असते तर त्यांच्या पुण्याईची स्थिती अल्लाह पासून लपून राहिली नसती. अल्लाह कोणावरही तिळभर सुध्दा अत्याचार करीत नाही. जर कोणी एक पुण्य केले तर अल्लाह त्याला द्विगुणित करतो. व मग आपल्या तर्फे मोठा मोबदला प्रदान करतो. मग विचार करा की, तेव्हा हे लोक काय करतील ? जेव्हा आम्ही प्रत्येक लोकसमूहा मधून एक साक्षीदार आणू. आणि या लोकांवर तुम्हाला (हजरत मुहम्मद (स.) यांना) साक्षीदार म्हणून उभा करू तेव्हा ते सर्वजण, ज्यांनी पैगंबरांचे म्हणणे ऐकून घेतले नाही. आणि त्याची अवज्ञा करीत राहिले, इच्छा करतील की, पृथ्वीने आम्हाला तिच्या उदरात सामावून घेतले तर किती छान! तेथे ते आपली कोणतीही गोष्ट अल्लाह पासून लपवू शकणार नाहीत." *सूरह अन् निसा ४:३९ ते ४२*

"कर्मफळ तर तुमच्या इच्छे वरही अवलंबून नाही व ग्रंथधारकांच्या इच्छेवर देखील नाही. जो कोणी दुष्कर्म करील, त्याचे तो फळ भोगेल आणि अल्लाह विरुध्द त्याला कोणी समर्थक व सहाय्यक लाभणार नाही. आणि मग जो कोणी सत्कृत्य करील, मग तो पुरुष अथवा स्त्री जर तो श्रध्दावंत असेल तर असेच लोक स्वर्गामध्ये दाखल होतील. आणि त्यांचा हक्क यत्किंचितही हिरावून घेतला जाणार नाही. त्या माणसापेक्षा अन्य कोणाची जीवन पध्दती योग्य असू शकते ज्याने अल्लाह समोर मान तुकविली आणि आपली वर्तणूक चांगली राखली. आणि एकाग्र होऊन इब्राहिमच्या पध्दतीचे अनुकरण केले. त्या इब्राहिमच्या पध्दतीचे ज्याला अल्लाहने आपला मित्र बनविला होता. आकाशात व पृथ्वीत जे काही आहे ते अल्लाहचे आहे. आणि प्रत्येक वस्तू अल्लाहने व्यापिली आहे." *सूरह अन्निसा ४:१२३ ते १२६*

"मग जेव्हा मूसा चा राग शांत झाला, तेव्हा त्याने त्या (लिखीत) पट्टिका उचलून घेतल्या ज्यांच्या लिखाणात मार्गदर्शन व कृपा होती. त्या लोकांसाठी जे आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगतात. आणि त्याने आपल्या समुहातील सत्तर लोकांची निवड केली की, त्यांनी (त्याच्या सोबत) आम्ही ठरवून दिलेल्या वेळेवर हजर व्हावे. जेव्हा त्यांना एका भूकंपाने गाठले. तेव्हा मूसाने विनविले "हे माझ्या स्वामी, तू इच्छिले असते तर अगोदरच यांना व मला नष्ट करून शकत होतास. काय, तू त्या अपराधापायी जो आमच्या पैकी काही

मूर्खांनी केला होता, आम्हा सर्वांना नष्ट करणार आहेस ? ही तर तू घेतलेली एक परीक्षा होती, की ज्या द्वारे तू ज्याला इच्छितोच त्याला मार्गभ्रष्ट करतो. आणि ज्याला इच्छितो त्याला सन्मार्ग प्रदान करतो. आमचा पालक तर तूच आहेस, म्हणून आम्हाला क्षमा कर. आणि आमच्यावर कृपा कर. तू सर्वा पेक्षा जास्त क्षमा करणारा आहेस. आणि आमच्या साठी या जगातही भले लिहा व मरणोत्तर जीवनात सुध्दा. आम्ही आपल्याकडे रूजू झालो आहोत. उत्तरा दाखल फर्माविण्यात आले, "शिक्षा तर मी ज्याला इच्छितो त्याला करतो. पण माझी कृपा प्रत्येक वस्तूंवर आच्छादित आहे. आणि मी त्या लोकासाठी लिहीन, जे अवज्ञेपासून दूर राहतील. जकात देतील व माझ्या संकेतावर श्रध्दा ठेवतील.

(म्हणून आज ही दयालुता त्या लोकांच्या वाट्यास आली आहे) जे या निरक्षर पैगंबर - नबी (स.) चे अनुयायित्व पत्करतील. ज्यांचा उल्लेख त्यांना (यहुदी व ख्रिश्चन) त्यांच्या तौरात व इंजिलमध्ये लिखित स्वरुपात आढळतो. तो त्यांना सदाचाराची शिकवण देतो. व दुराचारापासून रोखतो. त्यांच्यासाठी स्वच्छ वस्तू हलाल करतो व अस्वच्छ वस्तू हराम करतो. आणि त्याच्या वरून ते ओझे उतरवितो जे त्यांच्यावर लादलेले होते. आणि तो बंधने सोडवितो. ज्यांच्यामध्ये ते जखडलेले होते. म्हणून जे लोक याच्यावर श्रध्दा ठेवतील आणि याचे समर्थन व सहाय्य करतील व त्या प्रकाशाचे अनुसरण करतील जो याच्या बरोबर अवतरला गेला आहे. तेच सफल होणारे आहेत. हे मुहम्मद (स.) सांगा की, "हे मानवांनो, मी तुम्हा सर्वासाठी त्या अल्लाहचा प्रेषित आहे. जो पृथ्वी व आकाशांच्या राज्याचा स्वामी आहे. त्याच्या शिवाय इतर कोणीही ईश्वर नाही. तोच जीवन प्रदान करतो व तोच मृत्यू देतो. म्हणून श्रध्दा ठेवा अल्लाहवर आणि त्याने पाठविलेल्या निरक्षर नबी (स.) वर जो अल्लाहला व त्याच्या आदेशाला मानतो. आणि अनुसरण करा त्याचे, जेणे करून तुम्ही सरळ मार्ग प्राप्त कराल." *सूरह अल् आअराफ ७:१५४ ते १५८*

"अल्लाहच्या मस्जिदमध्ये नियमित उपासना करणारे केवळ तेच लोक होऊ शकतात ज्यांनी अल्लाह व परलोकाला मानावे, नमाज कायम करावी, जकात द्यावी व अल्लाह व्यतिरिक्त कोणाचीही भीति बाळगू नये. यांच्या कडून अपेक्षा आहे की ते सरळ मार्गावर चालतील." *सूरह अत् तौबा ९:१८*

४) कुरआन आणि ईश्वराचे प्रेषित (दूत)

आम्ही (ईश्वराने) प्रत्येक जातीत आमचे दूत (प्रेषित) पाठविले आहेत आणि आमच्या (ईश्वराची) शिकवण लोकांपर्यंत पोहोंचविण्याची व्यवस्था केली आहे. याची कुरआनने पुष्टी केली आहे.

कोणाच्या मनात असा संभ्रम निर्माण होईल की, आम्ही ईश्वरीय दूताला कसे ओळखावे ? तो ईश्वराचा प्रेषित आहे किंवा नाही याची ओळख कशी होईल ? त्यासाठी प्रेषित ओळखण्याच्या काही कसोट्या आहेत. त्या खाली देत आहोत.

१) तो (प्रेषित) त्याच्या जातीत सर्वश्रेष्ठ असेल.

२) तो ईश्वराकडे येण्याचे निमंत्रण देईल.

३) तो अनेक चमत्कार करील आणि हे चमत्कार त्याच्या जातीतील जेष्ठांनी केलेल्या कामगिरी पेक्षा श्रेष्ठ असतील.

४) तो स्पष्टपणे जाहीर करेल की, मी अल्लाहचा प्रेषित-दूत आहे. म्हणून माझी उपासना करू नका. कारण मी ही तुमच्या प्रमाणे माणूसच आहे.

५) तो जे म्हणेल त्या प्रमाणे स्वतः कृति करेल. थोडक्यात, बोलेल तसा वागेल.

पूर्वापार पासून ईश्वराचे प्रेषित येतच राहिले. शेवटी अंतिम प्रेषित हजरत मुहम्मद (स्व.) आले. त्यांनी प्रलय काला पर्यंत ची आवश्यक शिकवण मानवाला दिली. ती शिकवण कुरआन व हदीस यातून आपणास पहावयास मिळते.

आता ईश्वराच्या प्रेषिता बाबत कुरआनमधील काही आयतींचा अभ्यास करू या.

''मुसलमानानो म्हणा की, आम्ही श्रध्दा ठेवली अल्लाहवर आणि त्या मार्गदर्शनावर जे आमच्याकडे अवतरले. आणि जे इब्राहीम, इस्माईल,

इसहाक, याकूब आणि त्याच्या संततीवर अवतरले होते. आणि जे मूसा ईसा आणि दुसऱ्या सर्व प्रेषितांना त्यांच्या पालनकर्त्या कडून दिले गेले. आम्ही त्यांच्यात कोणताही भेदभाव करीत नाही. आणि आम्ही अल्लाहलाच समर्पित झालो आहोत.

जर त्या लोकांनीही अशी श्रध्दा ठेवली, जशी श्रध्दा तुम्ही ठेवली आहे. तर ते सन्मार्गावर आहेत. आणि जर या कडे पाठ फिरविली तर स्पष्ट आहे की, ते संशयामध्ये (संभ्रमामध्ये) पडले आहेत. तेव्हा खात्री बाळगा की, त्यांच्या विरुध्द तुमचा अल्लाह तुमचा सहाय्यकर्ता म्हणून पुरेसा आहे. तो सर्व काही ऐकतो आणि जाणतो आहे.'' *सूरह अल् बकरा २:१३६ ते १३७*

''सदाचार हा नव्हे की, तुम्ही आपले तोंड पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे करावे, तर सदाचार हा आहे की, जे अल्लाहवर व त्याच्या अंतिम दिवसावर ईमान धारण करतात. तसेच सर्व दूतावर, सर्व ग्रंथ आणि प्रेषितावर ईमान धारण करतात. ईश्वरी प्रेमापोटी आपल्याला प्रिय असलेली संपत्ती आपले नातेवाईक आणि अनाथ गरजवंत, वाटसरू व याचक तसेच गुलामाच्या मुक्ततेसाठी खर्च करतील. आणि नमाज कायम करतील. व जकात अदा करतील. तसेच दिलेल्या वचनाची पूर्तता करतील. आणि अडचणी, संकटे आणि युध्द प्रसंगी देखील संयम करतील. तेच लोक सत्यशील व अल्लाहचे भय बाळगणारे आहेत.'' *सूरह अल् बकरा २:१७७*

''हे प्रेषित (स.) (जे आमच्याकडून मानवाच्या मार्ग दर्शना करिता नियुक्त झाले) आम्ही यांना एक दुसऱ्या पेक्षा वरचढ दर्जे (पात्रता) बहाल केले. यांच्या पैकी कोणी असा होता, ज्याच्याशी स्वतः अल्लाहने संभाषण केले. कुणाला त्याने दुसऱ्या प्रकारे उच्च दर्जे प्रदान केले. आणि शेवटी मरियम पुत्र ईसा मसीह यांना दिव्य संकेत बहाल केले. आणि पवित्र आत्म्याने त्याला सहाय्य केले. जर अल्लाहने इच्छिले असते तर शक्य नव्हते की, या प्रेषितानंतर ज्यांनी उज्ज्वल संकेत पाहिले असते त्यांनी आपसात लढाई केली असती. परंतु (अल्लाहची इच्छा अशी नव्हती की त्याने लोकांना सक्तीने मतभेदा पासून रोखावे. या कारणाने) त्यांनी आपसात मतभेद

निर्माण केले. मग कोणी श्रध्दा ठेवली व कोणी द्रोहाचा मार्ग अवलंबिला. होय, अल्लाहने इच्छिले असते तर ते कदापि लढले नसते. परंतु अल्लाह जे इच्छितो ते करतो.'' *सूरह अल् बकरा २:२५२ ते २५३*

''पैगंबराने त्या मार्गदर्शनावर श्रध्दा ठेवली आहे. जे त्याच्या पालनकर्त्याकडून त्याच्यावर अवतरेल आहे. आणि श्रध्दावंतानी सुध्दा ते मार्गदर्शन मना पासून स्वीकारले आहे. हे सर्व अल्लाह व त्याच्या फरिश्त्यांना व त्याच्या ग्रंथांना आणि त्याच्या प्रेषितांना मानतात. आणि त्याचे विधान असे आहे की, आम्ही अल्लाहच्या पैगंबरांना एक दुसऱ्या पासून वेगळे करीत नाही. आम्ही आज्ञा ऐकली व अनुसरण स्वीकारले. हे स्वामी ! आम्ही तुझ्या पाशी गुन्हा माफीचे इच्छुक आहोत. आणि आम्हाला तुझ्याकडेच परतावयाचे आहे.'' *सूरह अल् बकरा २:२८५*

''हे पैगंबर (स.) ! सांगा की, ''आम्ही अल्लाहला मानतो. त्या शिकवणींना मानतो जी आम्हावर अवतरली आहे. त्या शिकवणी देखील आम्ही मान्य करतो, ज्या इब्राहिम, इस्माईल, इसहाक, याकूब आणि त्याच्या संतती वर अवतरल्या होत्या. आणि त्या आदेशावर देखील श्रध्दा ठेवतो. जे मुसा, ईसा आणि इतर प्रेषितांना त्यांच्या पालनकर्त्याकडून दिले गेले. आम्ही त्यांत कोणताही भेदभाव करीत नाही. आणि आम्ही अल्लाहच्या आदेशाच्या अधीन (मुस्लिम) आहोत. या आज्ञाधारकते शिवाय जो कोणी अन्य एखादी पध्दत अंगिकारीत असेल, त्याची ती पध्दत कधीही स्वीकारली जाणार नाही. व मरणोत्तर जीवनामध्ये तो अयशस्वी व विफल होईल.'' *सूरह आलिइमरान ३:८३ ते ८५*

''हे मुहम्मद (स.) तुमच्या पालन कर्त्याची शपथ, ते कधीही श्रध्दावंत होवू शकत नाहीत, जो पर्यंत आपल्या वादग्रस्त प्रश्नात ते तुम्हाला निर्णय देणारा मान्य करीत नाहीत. मग जो काही तुम्ही निर्णय द्याल, त्यावर आपल्या मनांत देखील काही संकोच वाटूनये, तर पूर्णतः मान्य करावे.'' *सूरह अन् निसा ४:६५*

''हे श्रध्दावंतांनो ! श्रध्दा ठेवा अल्लाहवर त्याच्या पैगंबरावर व त्या ग्रंथावर जो

अल्लाहने आपल्या पैगंबरावर उतरविला आहे. आणि प्रत्येक त्या ग्रंथावर जो या पूर्वी त्याने उतरविला आहे. ज्याने अल्लाह आणि त्याचे दूत व त्यांचे ग्रंथ आणि त्याचे प्रेषित आणि अंतिम निवाड्यावर श्रध्दा ठेवली नाही (कुफ्र) तो मार्गभ्रष्टातेत भटकून-भरकटून दूर निघून गेला.'' *सूरह अन् निसा ४:१३६*

''जे लोक अल्लाह आणि त्याच्या पैगंबराशी द्रोह करतात आणि इच्छितात की अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताच्या दरम्यान भेदभाव करावा, आणि म्हणतात की, आम्ही काहींना मान्य करू आणि काहींना मानणार नाही. आणि श्रध्दा व अश्रध्दा याच्या मधून निराळाच मार्ग काढण्याचा निश्चय करतात. ते सर्व पक्के अश्रध्दावंत आहेत. आणि अशा अश्रध्दावंतांसाठी आम्ही अशी शिक्षा तयार करून ठेवली आहे. जी त्यांना अपमानीत व तिरस्करणीय करून सोडणारी आहे. या विरुध्द जे लोक अल्लाह आणि त्याच्या सर्व प्रेषितांना मानतील आणि त्याच्या दरम्यान फरक करणार नाहीत. त्यांना आम्ही त्याचा मोबदला अवश्य प्रदान करू. आणि अल्लाह मोठा क्षमा करणारा व दया करणारा आहे.'' *सूरह अन् निसा ४:१५० ते १५२*

''हे ग्रंथ धारकांनो ! आपल्या धर्मात अतिरेक करू नका. आणि अल्लाहशी सत्याखेरीज कोणतीही गोष्ट जोडू नका. ईसा मसीह 'मरियम पुत्र इसा' या व्यतिरिक्त अन्य काहीच नव्हता. तो अल्लाहचा एक प्रेषित होता. आणि एक आदेश होता की जो अल्लाहने मरियमकडे पाठविला. आणि एक आत्मा होता अल्लाह कडून (ज्याने मरियमच्या गर्भात मुलाचे रूप धारण केले) म्हणून तुम्ही अल्लाहवर व त्याच्या प्रेषितावर श्रध्दा ठेवा. आणि असे म्हणू नका की, ''तीन आहेत.'' परावृत्त व्हा ते तुमच्याच हिताचे आहे. अल्लाह तर फक्त एकच आहे. तो पवित्र आहे या पासून की, त्याचा कोणी पुत्र असावा. पृथ्वी व आकाशातील सर्व वस्तू त्याच्या मालकीच्या आहेत. आणि त्याच्या पालनासाठी व देखरेखीसाठी केवळ तोच पुरेसा आहे.'' *सूरह अन् निसा ४:१७१*

''अल्लाहने बनी इस्राईल कडून पक्के करार करून घेतले होते. आणि त्यांच्यात बारा निरिक्षक नियुक्त केले होते. व त्यांना सांगितले होते की, ''मी तुमच्या बरोबर आहे. जर तुम्ही नमाज प्रस्थापित केली, आणि जकात अदा केली व

माझ्या प्रेषितांना मानले आणि त्यांना मदत केली. व ईश्वराला उत्तम कर्ज देत राहिला. तर खात्री बाळगा की मी तुमच्यातील वाईट गोष्टी नाहीशा करीन. आणि तुम्हाला अशा उद्यानात दाखल करीन, ज्याच्या खालून कालवे वाहत असतील, परंतु त्या नंतर ज्याने अश्रध्देचे वर्तन अंगिकारले तर त्याने वास्तविक पाहता सन्मार्ग हरवून टाकला.'' *सूरह अल् माईदा ५:१२*

''हे होते आमचे बोध प्रमाण, जे आम्ही इब्राहिमला त्याच्या लोकांविरुध्द प्रदान केले. आम्ही ज्याला इच्छितो त्याला उच्च मानमरातब प्रदान करतो. सत्य असे आहे की, तुमचा पालन कर्ता अत्यंत बुध्दिमान व ज्ञानी आहे.

मग आम्ही इब्राहिमला इसहाक व याकूब प्रमाणेच संतती दिली. व प्रत्येकाला सन्मार्ग दाखविला. (तोच सन्मार्ग जो नूह ला दाखविला होता) आणि त्याच्याच वंशात आम्ही दाऊद, सुलैमान, अय्यूब, युसूफ, मूसा आणि हारून यांना (सन्मार्ग) दाखविला. अशा प्रकारे आम्ही सदाचरण करणाऱ्या लोकांना त्याच्या पुण्याई फळ देतो. (त्यांच्याच संततीत) ज़करिया, यह्या, ईसा आणि इलयास यांना (मार्गस्थ केले) सरळ मार्ग दाखविला. त्यांच्या पैकी प्रत्येकजण सदाचारी होता. (त्यांच्याच वंशातून) ईस्माइल, ईसा, युनूस आणि लूत यांना (मार्ग दाखविला) यांच्या पैकी प्रत्येकाला सर्व जगत्वासियावर आम्ही श्रेष्ठत्व प्रदान केले. त्याच प्रमाणे त्यांचे वाड वडील व त्यांची संतती व त्यांच्या भाऊ बंदा पैकी बहुतेकांना आम्ही उपकृत केले. त्यांना आमच्या सेवेसाठी निवडले. आणि सरळ मार्गाकडे त्यांना मार्गदर्शन केले ! हे अल्लाहचे मार्गदर्शन आहे. ज्या द्वारे तो आपल्या दासांपैकी ज्याला इच्छितो त्याला मार्गदर्शन करतो. परंतु जर त्या लोकांनी एखादे वेळी अनेकेश्वर वाद स्वीकारला असता तर त्याचे सर्व कर्मकृत्यच नष्ट झाले असते. ते लोक होते ज्यांना आम्ही ग्रंथ, अधिकार आणि प्रेषितत्व प्रदान केले होते. आता जर हे लोक हे मान्य करण्यास नकार देत असतील तर (पर्वानाही) आम्ही काही अन्य लोकांना हा कृपा प्रसाद सुपूर्त केला आहे. जे त्याला नाकारीत नाहीत.'' *सूरह अल् अन्आम ६:८३ ते ८९*

५) कुरआन आणि प्रलयाचा दिवस

'प्रलयाच्या दिवसावर विश्वास ठेवावा' ही कुरआनची प्रमुख शिकवण आहे. मानवाने केलेल्या चांगल्या वा वाईट कृत्याचा ईश्वरा समोर जाब द्यावा लागणार नाही व त्याच्या वर्तनाचे बरे वाईट फळ त्याच्या पदरात पडणार नसेल, तर तो मानवावर अन्यायच होईल. मानवाला त्या मुळे कोणाचीही भीति राहणार नाही.

या मर्त्य जगापलिकडे दुसरे अन्य जग नाही कां ? जर ते नसेल तर, हे चांगले ते वाईट असे आम्ही का मानावे ? हा बऱ्या वाईटाचा विचार कां ? एकीकडे आम्ही ज्याला 'चांगले' म्हणतो तर दुसरीकडे त्याला 'वाईट' संबोधले जाते. या साठी प्रलयाचा दिवस आवश्यक आहे. त्या दिवशी चांगल्या वर्तनाचा वा वाईट वर्तनाचा न्याय केला जाईल. शेवटच्या दिवशी अल्लाह मानवाच्या चांगल्या वा वाईट वर्तनाचा न्याय करेल आणि कर्मा प्रमाणे तो (अल्लाह) आम्हाला स्वर्गाचे बक्षिस अथवा नरकाची शिक्षा देईल. जेणे करून मानवाला चांगले स्वीकारावयाची बुध्दी होईल.

या संदर्भात आपण कुरआनचा संदेश त्याच्या आयती मध्ये पाहू आणि त्यावर विचार करू.

''जो ग्रंथ (हे मुहम्मद (स.) तुमच्यावर अवतरला आहे. (अर्थात कुरआन) आणि जे (ग्रंथ) तुमच्या पूर्वी अवतरले आहेत, त्या सर्वावर (देखील) जे श्रध्दा ठेवतात. आणि मरणोत्तर जीवनावर दृढ विश्वास ठेवतात.

असेच लोक आपल्या पालन कर्त्या कडून सरळ मार्गावर आहेत. आणि तेच सफल होणारे आहेत.'' *सूरह अल बकरा २: ४ ते ५*

''तेव्हा त्या दिवसापासून स्वतःला वाचवा, जेव्हा कुणीही कुणाच्या उपयोगी (यत्किंचितही) पडणार नाही. न कुणाकडून मोबदला स्वीकारला जाईल, न कुणाची शिफारस कुणाच्या उपयोगी पडेल. न अपराध्याला कुठून कोणती मदत लाभेल.'' *सूरह अल् बकरा २ : १२३*

“सदाचार हा नव्हे की, तुम्ही आपले तोंड पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे करावे. तर हा सदाचार आहे की जे अल्लाहवर व अंतिम दिवसावर ईमान धारण करतात. तसेच सर्व दूतावर, सर्व ग्रंथ आणि सर्व प्रेषितावर ईमान धारण करतात. ईश्वरी प्रेमापोटी आपल्याला प्रिय असलेली संपत्ती आपले नातेवाईक आणि अनाथ गरजवंत, वाटसरू व याचक तसेच गुलामाच्या मुक्ततेसाठी खर्च करतील आणि नमाज कायम करतील व जकात अदा करतील. तसेच दिलेल्या वचनाची पूर्तता करतील आणि अडचणी, संकटे आणि युध्द प्रसंगी देखील संयम करतील तेच लोक सत्यशील आणि अल्लाहचे भय बाळगणारे आहेत.” *सूरह अल् बकरा २:१७७*

“पालनकर्त्या, नि:संशय तू एके दिवशी सर्व लोकांना एकत्रित करणार आहेस. ज्या दिवसाच्या आगमना बद्दल कसलीच शंका नाही. तू आपल्या वचनापासून मुळीच ढळणारा नाहीस.” *सूरह आलिइमरान ३:९*

“आणि ते लोक देखील अल्लाहला नापसंत आहेत, जे आपली संपत्ती लोकांना दाखविण्यासाठी खर्च करतात आणि खरे पाहता ते अल्लावरही श्रध्दा बाळगीत नाहीत, अथवा अंतिम दिनावर देखील. सत्य असे आहे की सैतान त्यांचा मित्र झाला. त्याला अत्यंत वाईट मैत्री मिळाली.” *सूरह अन् निसा ४:३८*

“हे श्रध्दावंतांनो ! आज्ञा पालन करा. अल्लाहची आज्ञा पाळा. पैगंबराची व त्या लोकांची जे तुमच्या पैकी आज्ञाधिकारी असतील. मग जर तुमच्या दरम्यान एखाद्या बाबतीत वाद निर्माण झाला तर त्याला अल्लाह व पैगंबराकडे न्या. जर तुम्ही खरोखरच अल्लाह व अंतीम दिनावर श्रध्दा बाळगत असाल. हीच एक योग्य कार्यपध्दती आहे आणि शेवटच्या दृष्टीने देखील अधिक चांगली आहे.” *सूरह अन् निसा ४:५९*

“आणि आठवा, जेव्हा तुमच्या पालनकर्त्याने जाहीर केले की, तो पुनरुत्थाना पर्यंत सतत असले लोक बनीइस्त्राईल वर लादत राहील, जे त्यांना अत्यंत वाईट यातना देतील. नि:संशय तुमचा पालन कर्ता शिक्षा देण्यात तत्पर आहे, आणि निश्चितपणे क्षमा व दया दर्शविणारा देखील आहे.” *सूरह अल् आअराफ ७:१६७*

''अल्लाहच्या मशिदी मध्ये नियमित उपासना करणारे तर तेच लोक होऊ शकतात, ज्यांनी अल्लाह आणि परलोकाला मानावे आणि नमाज कायम करावी. जकात द्यावी व अल्लाह शिवाय कोणाचीही भीति बाळगू नये. यांच्याकडून अपेक्षा आहे की, ते सरळ मार्गावर चालतील. हज यात्रेकरूंना पाणी पाजणे, आणि मस्जिदे हरम (काबा) ची सेवा करणे याला तुम्ही त्या व्यक्तिच्या कामा बरोबर ठरविले आहे काय ? ज्याने श्रध्दा ठेवली. अल्लाहवर व 'मरणोत्तर' जीवनावर व ज्याने प्राण वेचले अल्लाहच्या मार्गात. अल्लाहच्या दृष्टीत ते दोघे समान नाहीत. व अल्लाह अत्याचारी लोकांना मार्ग दाखवित नाही.'' *सूरह अत् तौबा ९:१८ ते १९*

''(हेच ऐहिक जीवन यांना असे वाटू लागेल) जणू हे घटकाभर आपसात ओळख करून घेण्यासाठी थांबले होते. (त्या प्रसंगी सत्यता पटेल की) खरोखरी भयंकर तोट्यात आले, ते लोक ज्यांनी अल्लाहच्या भेटीला खोटे ठरविले आणि ते मुळीच सरळ मार्गावर नव्हते.'' *सूरह युनूस १०:४५*

''तुमचा ईश्वर तर केवळ एकच ईश्वर आहे. परंतु जे लोक परलोकाला मानीत नाहीत, त्यांच्या मनात 'नकार' वास्तव्य करून आहे. आणि ते घमेंडीत पडले आहेत. अल्लाह निश्चितच त्याची सर्व कृत्ये जाणतो. अप्रकट आणि प्रकट देखील. तो त्या लोकांना मुळीच पसंद करीत नाही, जे अहंकारामध्ये पडले आहेत.'' *सूरह अन्नहल १६:२२ ते २३*

''वस्तुस्थिती अशी आहे की जे लोक मरणोत्तर जीवन मानीत नाहीत. त्यांच्यासाठी आम्ही त्यांच्या कृत्यांना आकर्षक बनविले आहे. म्हणून ते भटकत फिरत असतील.'' *सूरह अननम्ल २७:४*

''अलीफ. लाम. मीम. हे बुध्दिमत्ता पूर्ण ग्रंथाचे संकेत आहेत. मार्गदर्शन व कृपा सदाचारी लोकासाठी जे नमाज कायम करतात. जकात देतात आणि मरणोत्तर जीवनावर विश्वास ठेवतात.'' *सूरह लुकमान ३१:१ ते ४*

६) कुरआन आणि ज्ञान

सर्व साधारण असा एक समज आहे की, धर्म आणि ज्ञान यांचा एकत्र निर्वाह होऊ शकत नाही. धर्माचा पाया (आधार) अंधविश्वासावर स्थित असतो. तेथे ज्ञानाचा प्रकाश जेव्हा प्रवेशतो तेव्हा श्रध्दा डळमळू लागते. म्हणून धार्मिक नेतृत्वाने ज्ञान प्राप्ती वर बंधने लादली होती. याच कारणाने युरोप मध्ये जेव्हा ज्ञानयुग अवतरले तेव्हा पोप व्याकूळ झाले. त्यांनी ख्रिश्चन धर्म वाचविण्यासाठी विद्वानांवर कठोर प्रहार केले. हे एवढ्यावर थांबले नाही, तर शेकडो वैज्ञानिक व विचारवंतांना मृत्यू दंड देण्यात आला. त्यांनी श्रमाने शोधलेले विज्ञानाचे शोध व तात्विक विचारांची पायमल्ली केली गेली. त्याचा परिणाम म्हणून धर्म व ज्ञान हे एकत्र राहू शकत नाही. असा विचार त्या काळच्या समाजात प्रस्तुत झाला. आणि आजही बरेच जण या विंचाराची 'री' ओढतांना दिसतात.

आम्ही धार्मिक इतिहासाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, बहुतेक सर्व धर्माची स्थापना अंध विश्वासाच्या आधारावर झाली आहे. धर्मांच्या विचार धारा काल्पनिक गोष्टीवर आधारलेल्या आहेत. धार्मिक कल्पनांना ज्ञानाची कसोटी लावून पाहिले असता. धर्म व ज्ञान यात खूप तफावत पडलेली दिसून येते. त्याचा परिणाम म्हणून आजचे विचारवंत, देवी देवतांच्या गोष्टीवर विश्वास ठेवेनासे झाले आहेत. इतिहासातील काल्पनिक योध्याच्या कथे वरील त्यांचा विश्वास बसेनासा झाला आहे. धर्माच्या रीति रिवाजांचे त्यांना आकर्षण वाटेनासे झाले आहे. आता ते पूजा पाठाला कंटाळल्याचे दिसून येत आहेत. त्या मुळे अनेकजण नास्तिक झालेले दिसतात.

विसाव्या शतकात धर्माची अशी विकृत अवस्था झाली आहे. त्या मुळे आधुनिक ज्ञानी मानव आपले भविष्य ज्ञानाच्याच प्रकाशात पाहू इच्छितो. आता आधुनिक ज्ञानी मानव अवकाशात भ्रमण करू लागला आहे. चंद्राचे सौंदर्यही त्याने आता पायदळी तुडविले आहे. त्या मुळे तो धर्माला अंधविश्वासाचा 'असंबध्द मेळ' समजू लागला आहे. त्या मुळे धर्माचे चुकीचे स्वरुप लोकापुढे येत आहे.

इतर धर्मांचा विचार न करता ज्ञानाबाबत इस्लामच्या विचार सादर करीत आहे. आम्ही आपणासमोर ज्ञाना शिवाय विश्वासाला काही महत्व नाही व ज्ञान प्राप्त करण्यावर इस्लामने पुरेपूर जोर दिला आहे. हे स्पष्ट करू इच्छितो. आमचे हे विचार चौदाशे वर्षापूर्वीचे जुने आहेत. मात्र हे विचार किती शास्त्रीय व सत्यावर आधारित आहेत, हे आपणास कळून येईलच. ज्यावेळी (चौदाशे वर्षापूर्वी) अरबस्थानात व युरोप मध्येही ज्ञाननावाची एखादी गोष्ट अस्तित्वात नव्हती त्या वेळी इस्लामने ज्ञान प्राप्त करण्याचा आदेश दिला होता. त्या वेळेचे जीवन 'खावोपिवो और मजा करो' असे व देवी देवतांवरील अंधश्रध्देवर आधारलेले होते.

ज्ञाना बाबत, ईश्वराकडून प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर पहिली आयत अवतरली, ती खालील प्रमाणे आहे.

"वाचा, (हे पैगंबर (स्व.)) आपल्या पालनकर्त्याच्या नामासहित ज्याने निर्माण केले. गोठलेल्या एका रक्ताच्या गोळ्या पासून मानवाची निर्मिती केली. वाचा, आणि तुमचा पालनकर्ता मोठा उदार आहे, ज्याने लेखणी द्वारे ज्ञान शिकविले. मानवाला ते ज्ञान दिले जे तो जाणत नव्हता."

सूरह अल् अलक़ ९६ : १ ते ५

या आयतीवर विचार केला असता हे स्पष्ट होते की, इस्लाम शिक्षणावर-ज्ञानावर किती भर देतो. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरीत झालेल्या सर्व प्रथम आयती द्वारे 'ज्ञानाचे' आवाहन करण्यात आले आहे. ही पहिली आयत 'ज्ञानाचा' आदेश देते. त्या वरून आपल्या लक्षात येईल की, इस्लामच्या सुरुवातीपासूनच ज्ञान आणि शिक्षणावर भर दिला गेला आहे.

कुरआन हा एक वैज्ञानिक ग्रंथ आहे. त्यात ज्ञानाचे भांडार सामावले आहे. त्या ज्ञानावर कितीही विचार केला तरी त्याचा अंत लागत नाही. हे आम्ही कुरआनद्वारे दाखविणार आहोत.

७) ज्ञानासाठी प्रेरणा

कुरआनोक्ती आहे की -

"परंतु असे का घडले नाही की त्यांच्या वस्तीतील प्रत्येक भागातून काही लोक निघाले असते, आणि धर्माचा बोध प्राप्त केला असता. आणि परत जाऊन आपल्या प्रदेशातील रहिवाश्यांना सावध केले असते. जेणे करून (मुस्लिमेतर वर्तन) त्यांनी वर्ज्य केले असते." *सूरह अत् तौबा ९: १२२*

इस्लाम ज्ञान-विज्ञानाच्या विरुध्द आहे या आरोपांचे खंडन करण्यास वरील एकच आयत पुरेशी आहे. जर इस्लाम ज्ञान-विज्ञाना विरुध्द असते तर वरील प्रमाणे त्याने जाहीर घोषणा केली नसती. की, हे लोकांनो ! ज्ञान प्राप्त करण्यासाठी घराबाहेर पडा. त्या मुळे जगाला, सत्य-असत्य, धर्म-अधर्म व चांगले-वाईट कर्म कोणते ते समजाऊन सांगू शकाल.

आज सर्व जग हिंसेच्या आगीत होरपळत आहे. खर तर आज मानव अवकाशाची स्वप्ने पाहत आहे. त्यासाठी मानवाने अतिशय (जास्त) खर्च केला आहे. तरी पण मानवाला सुख व शांती लाभू शकली नाही. त्याचे खरे कारण हे आहे की तो सत्य मार्ग सोडून चुकीच्या मार्गाने जातो आहे. मानवाच्या ज्ञानाचा हेतु, जगाला नेतृत्व देऊन रास्त मार्ग दाखवावा हा होता. परंतु त्याने अॅटम बॉम्ब सारखी शस्त्रे तयार करून, जगाच्या कल्याणा ऐवजी जगाला नष्ट करण्याचा विडा उचलला आहे. शिक्षणाचा अर्थ हाच असेल तर इस्लाम त्याच्या विरुध्द आहे. मात्र जर शिक्षण मानवाला मानव बनण्याचे शिक्षण देत असेल तर इस्लाम त्याच्या पाठी भक्कम पणे उभा राहील हे निश्चित !

आपणास आश्चर्य वाटेल की, कुरआन पैगंबरांना उद्देशून म्हणत आहे.

"हे मुहम्मद (स.) लक्षात ठेवा की एका ईश्वरा शिवाय कोणीही प्रार्थनेस योग्य नाही." *सूरह मुहम्मद ४७:१९*

पूजेस पात्र केवळ ईश्वरच आहे. हे जो पर्यंत पुजाऱ्यास समजणार नाही, तो पर्यंत त्याची पूजा निरर्थकच होईल. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, उपासना करण्यापार्वी उपासना कोणाची करावयाची याचे सत्य ज्ञान करून घणे आवश्यक आहे. जर असे नसेल तर त्याची उपासना निरर्थक होईल.

जे धर्माला केवळ अंधविश्वासास पात्र समजून व धर्म व्यवस्थित (पूर्णांशाने) पणे समजावून घेत नाहीत, त्यांना हा धोक्याचा ईशारा आहे. वरील बाब अन्य धर्माच्या बाबतीत योग्य असू शकेल. मात्र इस्लाम परिपूर्ण ज्ञानाचीच अपेक्षा ठेवतो.

आम्ही आमचे म्हणणे स्पष्ट करण्यासाठी प्रेषित मुहम्मद (स.) यांची पवित्र शिकवण खाली देत आहोत.

'कैस बिन कसीर' म्हणतात, एके दिवशी मी हजरत अबू दर्दा बरोबर दमिश्कच्या मशिदीत बसलो होतो. इतक्यात तेथे एक गृहस्थ आले आणि म्हणाले, हे अबू दर्दा, "मी मदिनेहून आपणाकडे या उद्देशाने आलो आहे की, 'आपण प्रेषित मुहम्मद (स.) यांची पवित्र हदीस (मुहम्मद (स.) यांची पवित्र वचने) सांगत असता. ती ऐकण्यासाठी मी आपणाकडे आलो आहे."

अबू दर्दा म्हणाले, "मी अल्लाहच्या रसूल कडून खालील प्रमाणे ऐकले आहे.

"जो मनुष्य ज्ञान मिळविण्यासाठी त्या रस्त्यावर चालत निघाला आहे, त्याच्या रस्त्यावर देवदूत आपले पंख अंथरतात. आणि ईश्वरही त्याचा रस्ता सोपा करतो." हदीस अबू दाऊद आणि तिर्मिजी

हजरत अनस सांगतात की, अल्लाहच्या प्रेषितांनी सांगितले -

"जी व्यक्ति ज्ञान प्राप्त करण्यास निघाली आहे ती ईश्वराच्या मार्गावर आहे. ती परत जाई पर्यंत" हदीस - तिर्मिजी

अबदुल्ला बिन अब्बास म्हणतात की, अल्लाहचे रसूल म्हणाले -

"ईश्वर ज्याचे कल्याण करू इच्छितो, त्याला धर्माची जाण करून देतो" हदीस-तिर्मिजी

अबू दर्दा म्हणतात की, अल्लाहच्या रसूलने उपदेश केला आहे -

"ज्या प्रमाणे आकाशातील ताऱ्या पेक्षा चतुर्दशीचा चंद्र श्रेष्ठ असतो, त्या प्रमाणे सर्व उपासका पेक्षा शिक्षित-ज्ञानी मनुष्य श्रेष्ठ आहे. आणि सुशिक्षित लोक हे नबीचे - प्रेषितांचे वारस आहेत. नबी आपल्या मागे दिनार - दिरहम (पूर्वीच्या अरबस्थानातील नाणी) ठेवून जात नाहीत. तर शिक्षण व ज्ञान मागे ठेवून जातात. म्हणून या पासून ज्यांनी धडा घेतला ते भाग्यवान होत."

हदीस-तिर्मिजी

अबू हुरैरा म्हणतात की, अल्लाहचे रसूल म्हणाले -

"ज्ञान ही मुस्लिमांची हरवलेली संपत्ती आहे. त्या मुळे त्याला जेथे ज्ञान मिळेल तो त्याचा हकदार आहे." हदीस -तिर्मिजी

वरील 'हदीस' ज्ञान प्राप्त करून घेण्यारास प्रोत्साहन देतात. तसेच काही कुरआनची वचने जे ज्ञान पुढील पीढीस न देता लपवून ठेवतात, ते दुसऱ्या पर्यंत पोहोचू देत नाहीत, त्यांच्यावर कडक टीका करतात. या प्रमाणे कुरआन ज्ञान मिळविण्याची इच्छा असणारास प्रोत्साहन देते. त्या मुळे इस्लाम हा एक वैज्ञानिक धर्म असल्याचे आपल्या लक्षात येईल.

ज्ञान लपविणारावर कडक टीका

इस्लाम वैज्ञानिक धर्म आहे. या कारणाने कुरआन त्या लोकांवर कडक टीका करते की, जे स्वत:जवळ ज्ञान असून ते दुसऱ्यापासून लपवून ठेवतात. ते इतरांना देत नाही. समाजात ज्ञानाचा प्रसार करीत नाहीत. ज्यामुळे इतर लाभ घेतली. या वरून हे स्पष्ट होते की, इस्लाम शिक्षणाला महत्वाचे स्थान देतो.

या संदर्भात कुरआनातील काही अवतरणे आपण पाहूया.

"त्या व्यक्ती पेक्षा अधिक अत्याचारी कोण असेल की ज्याने, ती साक्ष लपविली. जी अल्लाह कडून त्यांच्याकडे आली होती." *सूरह अल् बकरा २:१४०*

'साक्ष' याचा अर्थ इस्लामी धर्मगुरू - विद्वान लोक असा लावतात की, यहुदी आणि ख्रिश्चनांच्या धर्म ग्रंथात प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या

मुहम्मद या शब्दाचा अर्थ आहे, 'ज्याची स्तुती केली गेली होती.' प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या जन्माचे वेळी मक्केची लोकसंख्या साठ हजार होती.

पवित्र कुरआन नबींना (स.) 'जगासाठी दयाळू' या उपाधीने संबोधले. ऋग्वेदातही -

'दयाळू' पदवीप्राप्त, ज्याची स्तुती केली गेली आहे तो दहा हजार सहकार्या समवेत येईल. असा उल्लेख आहे. (५:२८)

याच प्रमाणे वेदातही 'महामदे' आणि 'महामद' या नावांनी येणाऱ्या (प्रेषित मुहम्मद (स.) यांचा उल्लेख आहे.

(पहा-याच लेखकाचे अरबी पुस्तक 'भारतीय धर्म')

आगमनाची जी खबर आहे. ती त्यांनी लपविली. आणि प्रेषित मुहम्मद (स.) स्वत: नबी असल्याची घोषणा केली तेव्हा तीस नकार दिला.

हिन्दू धर्म ग्रंथातही (वेद आणि पुराणात) प्रेषित मुहम्मद (स.) आगमनाचा उल्लेख आहे. तो खाली देत आहे.

''एका दुसऱ्या देशात एक आचार्य आपल्या मित्रासह अवतरतील. त्यांचे नाव 'महामद' असेल. ते वाळवंटी प्रदेशात येतील.''

भविष्य पुराण अध्याय ३२३ सूत्र ५ ते ८

स्पष्टपणे या श्लोकात 'महामद' हे नाव 'वाळवंट' या प्रदेशाचा संकेत दिसतो. या येणाऱ्या महापुरुषाच्या विषयी अन्य चिन्हे खालील प्रमाणे सांगितली गेली आहेत.

''जन्मापूर्वीच त्याचे लिंगच्छेदन (खतना) झाले असेल. त्यांना जटाजूट असणार नाही. त्यांनी दाढी राखलेली असेल. आपला संदेश ते प्रभावित पणे प्रसारित करतील. त्यांचा संदेश मानणारास 'मुसलाई' या नावाने संबोधिले जाईल.''

वरील श्लोकाचे लक्षपूर्वक मनन करा. लिंगच्छेदनाची पध्दत हिंदू मध्ये नाही. जटाजूट हे हिन्दू आचार्यामध्ये राखले जाते. येणाऱ्या आचार्यात अर्थात मुहम्मद (स.) यांच्यात या सर्व गोष्टी दिसून येतात. आणि त्यांचा संदेश मानणाऱ्यास 'मुसलाई' म्हटले जाईल, यात 'मुसलई' हा शब्द मुस्लिम किंवा मुसलमान या कडे अंगुली निर्देश करतो.

अथर्व वेदाच्या अध्याय २० मध्ये खालील श्लोक आढळतो.

''हे भक्तांनो ! लक्षपूर्वक ऐका, ज्याची प्रशंशा केली गेली आहे व प्रशंशा केली जाणार आहे. तो महान ऋषि 'महामदे' साठ हजार नव्वद लोकांच्या मध्ये अवतरणार आहे.

वरील उदाहरणांचा अर्थ त्या त्या धर्म पुस्तकात योग्य आणि खरा आहे. ईश्वराने दिलेल्या या 'साक्षी' आपण पुष्टीकरणार्थ एकत्र केल्या, तर ते मानव समाजासाठी कल्याण प्रद होईल.

''आणि सत्याला असत्याचे आवरण घालून जाणून बुजून सत्य लपवू नका.''

सूरह अल् बकरा २ : ४२

''पैगंबरावर (स्व.) केवळ संदेश पोहोचविण्याची जबाबदारी आहे. त्या नंतर तुमच्या उघड व गुप्त सर्व गोष्टींना जाणणारा अल्लाहच आहे.''

सूरह अल् माईदा ५:९९

''या ग्रंथधारकांना त्याचीही त्या कराराची देखील आठवण करून द्या की, जो अल्लाहने त्यांच्या कडून घेतला होता, की तुम्हाला ग्रंथाची शिकवण लोकांत प्रसारित करावी लागेल. ती लपवून ठेवता कामा नये. पण त्यांनी ग्रंथाला पाठीमागे घातले, आणि अल्पशा किमतीवर त्याला विकून टाकले. किती वाईट व्यवहार आहे हा जो हे करीत आहेत.'' *सूरह आलिइमरान ३:१८७*

या आयतीवरून हे स्पष्ट होते की, इस्लामपूर्व धर्मांनी ईश्वराने प्रदान केलेल्या धर्मग्रंथांना लपवून ठेवले. लोकापर्यंत व्यवस्थित रीतिने ते पोहोचवले नाहीत. हा मोठा अनाचार होता. कारण ते धर्मग्रंथ ज्ञानाचे भांडार होते. त्याला लपवणारे अत्याचारी-अनाचारी व धर्म विरोधी होत.

कुरआनोक्ती आहे की -

''आम्ही सर्व लोकांच्या मार्गदर्शनासाठी आपल्या ग्रंथात ज्याचे वर्णन आहे, अशा आमच्या अवतरलेल्या स्पष्ट मार्गदर्शनाला जे लपवतात. त्यांचा अल्लाह सुध्दा धिक्कार करतो. धिक्कार करणारे ही त्यांचा धिक्कार करतात.''

सूरह अल् बकरा २:१५९

''नि:संदेह, जे लोक अल्लाहने अवतरलेल्या ग्रंथामधील सत्य लपवितात. आणि क्षुद्र भौतिक लाभासाठी त्याचा सौदा करतात. असे लोक अग्नी भक्षण करून आपले उदर भरण करीत असतात. आणि अल्लाह पुनरुत्थानाच्या दिवशी त्यांच्याशी काहीही बोलणार नाही. व त्यांना पवित्र करणार नाही. त्यांच्यासाठी यातनामय प्रकोप आहे.'' *सूरह अल् बकरा २ :१७४*

या आयती ज्ञानाला लपविणाऱ्यांची कठोर टीका आलोचना करीत आहेत. या आयती वरून स्पष्ट होते की इस्लाममध्ये शिक्षणाची ज्ञानाची महता किती आहे. आता अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) याच्या शब्दात हे स्पष्ट करूया.

अबू हुरैरा म्हणतात, 'अल्लाहचे प्रेषित म्हणतात -

"जर कोणाला ज्ञानाबद्दल माहिती विचारली आणि त्याला माहित असून त्याने ते लपविले तर प्रलयाच्या दिवशी त्याला अग्नीचा लगाम लावला जाईल."
हदीस तिर्मिजी - अबू दाऊद

जे स्वत: जवळ ज्ञान असताना ही ते लपवतात त्यांच्यावर या हदीसने कठोर टीका केली आहे. या मुळे ज्ञान काही लोकापुरतेच मर्यादित राहते. त्याचा लाभ दुसऱ्यांना होत नाही. दुसऱ्याला ज्ञान देण्याने ते वाढते. ज्ञान आपल्या पुरते ठेवणे यात नुकसान आहे. असेही होऊ शकते की, ज्याला ज्ञान मिळाले आहे, तों ज्ञान देणाऱ्यापेक्षा अधिक समजूतदार असेल, व तो ज्ञान देणाऱ्यापेक्षा, त्यापासून त्यास जास्त लाभ मिळेल.

आता या दुसऱ्या हदीस मध्ये हे जास्त स्पष्ट होईल.

अब्दुल्ला बिन मसऊदचे म्हणणे आहे, की मी प्रेषित मुहम्मद (स.) यांना बोलतांना ऐकले आहे की,

"ज्याने माझे म्हणणे ऐकले, आठवणीत ठेवले, आणि लोकापर्यंत व्यवस्थित घेऊन गेला. त्या माणसास ईश्वर खूष ठेवो ! बऱ्याच वेळा असे होते की, शहाणपण आणि संयम यांचा संदेश पोहोचवणारा स्वत: शहाणा व संयमशील असेलच असे नाही. मात्र तो ज्याला शहाणपण आणि संयमाचा संदेश देईल, तो माणूस कदाचित संदेश देणारापेक्षा जास्त शहाणा व संयम राखणारा असेल."
हदीस-तिर्मिजी व अबूदाऊद

ज्ञानी व्यक्तिंनी ज्ञान लपवून ठेवता कामा नये. हे वरील हदीस मध्ये सांगितले आहे. त्या मुळे संपूर्ण समाजाचे नुकसान होते. प्रत्येक ज्ञानी ज्ञानाचे महत्व जाणेल असे नाही. कदाचित ज्याला त्याने ज्ञान दिले आहे तो त्या पासून जास्त लाभ मिळवू शकेल. ईश्वराने प्रत्येक व्यक्तिला अशी शक्ति दिली नाही, जो चांगले विचार समाजाला शिकवू शकेल.

जे दुसऱ्यापर्यंत ज्ञान पोहोंचू शकत नाहीत अशा लोकांवर वरील हदीस मध्ये टीका करण्यात आली आहे.

ज्याला ज्ञान दिले जात आहे, त्याची पात्रता पारखणेही महत्वाचे

आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. नाहीतर त्याला जे ज्ञान दिले जात आहे, त्यामुळे तो संभ्रमात पडेल. त्या संबंधी एका हदीस मध्ये सांगितले आहे.

अब्दुल्ला बिन मसऊद यांनी सांगितले की,

"लोकांना हदीसची शिकवण देतांना त्याची पात्रता लक्षात घ्या. असेही होऊ शकते की, तुम्ही लोकांना दिलेले ज्ञान, त्यांच्या डोक्यावरून जाईल व त्यांच्या मनात संभ्रम निर्माण होईल." हदीस-मुस्लिम

जरी वरील हदीस प्रेषित (स.) नसली तरी या हदीस वरून हे लक्षात येते की, हदीस चे ज्ञान दुसऱ्यांना देतांना त्याची पात्रता (बौध्दिक) लक्षात घेतली पाहिजे.

आज जगात जो गोंधळ आणि अस्वस्थता पसरली आहे, त्याचे कारण हेच आहे की, आमचे पुढारी हे विसरतात की त्यांच्या भाषणाचा समाजावर किती विपरीत परिणाम होईल ? हेच वरील हदीस मध्ये स्पष्ट केले आहे.

या बाबतीत कुरआनची समृध्दता लक्षात घेतली पाहिजे. त्यात विचारांची बहुमूल्य रत्ने दडलेली आहेत. हेच म्हणणे स्पष्ट करून सांगावयाचे म्हटले तर, आपण सर्व जगातील कागद आणि शाई, कुरआनच्या विचारांना स्पष्ट करण्यास वापरली, तरी ती कमीच पडेल. आणि तरीही आम्ही कुरआनच्या तळापर्यंत शेवटच्या विचारापर्यंत जाऊ शकणार नाही.

"पृथ्वीवर जेवढे वृक्ष आहेत त्याच्या सर्वच्या सर्व लेखण्या बनविल्या. आणि समुद्र (दौत बनविले) ज्याला आणखी सात समुद्रांची शाई पुरविली. तरी सुध्दा अल्लाहच्या गोष्टी लिहून संपणार नाहीत. निःसंशय अल्लाह जबरदस्त आणि बुध्दिमान आहे." *सूरह लुकमान ३१:२७*

८) कुरआन आणि समाज

जगात साधारण पणे दोन प्रकारची माणसे आपणास दिसतात. काही माणसे स्वत:शिवाय दुसऱ्यांचा विचार न करता स्वत:साठी जगतात. आणि स्वत:साठीच मरतात. तर काही माणसे स्वत:चा विचार न करता दुसऱ्यासाठी जगतात व मरतात. पहिल्या प्रकारच्या माणसामध्ये व कीडा, मुंगी व जनावरे या मध्ये फारसा फरक असत नाही. दुसऱ्या प्रकारच्या माणसांना मात्र जगाने उच्च स्थान दिले आहे. त्यांच्या चांगुलपणामुळे या जगाचे व्यवहार सुरळित पणे चालतात. ज्या दिवशी अशा परोपकारी मानवांचे अस्तित्व संपेल, त्या दिवशी हे हसते खेळते जग उजाड होईल. हे जग जीवंत असतांनाही मृतवत दिसू लागेल. म्हणून परोपकारी माणसांची सर्व धर्मांनी प्रशंशा केली आहे. दुसऱ्यांची सेवा करण्यास प्रोत्साहन दिले आहे. परोपकारालाच मानवाचा उच्च आदर्श (धर्म) मानले आहे.

"जो मानतेसाठी मरेल त्यालाच मनुष्य म्हणावे."

आता आपण या बाबत कुरआनचा संदेश पाहूया.

"जे कार्य पुण्याईचे व ईशपरायणतेचे आहे, त्या मध्ये सर्वांशी सहकार्य करा. आणि जी कामे पाप व अत्याचाराची आहेत. त्या मध्ये कोणाशीही सहकार्य करू नका. अल्लाहचे भय बाळगा, त्याची शिक्षा फार कठोर आहे."

सूरह अल् माईदा ५:२

सामाजिक जीवन कसे जगावे ? याचे उत्कृष्ट मार्गदर्शन वरील आयतीत आले आहे. जे समाजातील दुर्गुण नष्ट करू इच्छितात, त्यांनी समविचारी मित्रांचा एक संघ स्थापन करावा. त्या मध्ये जे समाज सेवेचे इच्छुक आहेत, त्यांना सामिल करून घ्यावे. तसं कशाला ? त्या सर्व मानवतावादी व्यक्तिंनी एकत्र येऊन आपली संघटना स्थापन करून, बळकट करावी. त्या संघाने समाजातील दुष्प्रवृत्ती नाहीशी करण्यासाठी प्रयत्न करावेत. एखादी दुसरी व्यक्ति हे काम करू शकणार नाही. एका व्यक्तिकडे कोणीही फारसे लक्ष देणार नाही. आणि ते लवकरच थकून जातील. जगातील कोणत्याही महान व्यक्तिचे जीवन चरित्र पहा. त्याच्या मागे अनुयायांची

एक फलटणच होती असे दिसून येईल. त्या अनुयायांनी त्यांच्या नेत्यांना बळ तर दिलेच पण त्याच बरोबर नेत्यांच्या विचाराच्या प्रसाराला मोलाचा हात दिला. त्या मुळेच त्या महनीय व्यक्तिनी त्यांच्या कार्यात (मिशन) यशस्वी होऊन हे जग सोडले.

जेव्हा कोणी व्यक्ति तुम्हाला सत्याकडे (चांगल्याकडे) बोलावील, तेव्हा आपणास ते अनिवार्य (अत्यावश्यक) होते की त्या महनीय व्यक्तिची मदत करावी. नाहीतर असे होईल की, दुर्गुणाच्या कोलाहलात महनीय व्यक्तिचा आवाज दडपून जाईल. आणि दुर्गुणाचा असत्याचा विजय होईल. खाली दिलेली आयत या दृष्टाने लक्षणीय आहे.

"आणि जे सत्याचा इन्कार करणारे आहेत ते एकमेकास सहाय्य करीत असतात. जर तुम्ही हे केले नाही तर पृथ्वीवर उत्पात आणि बिघाड उद्‌भवेल. म्हणून जे ईश्वरीय मार्ग स्वीकारू इच्छितात, त्यांनी आपसात प्रेमभाव वाढवून चांगले (सत्य) वर्तन स्वीकारावे." *सूरह अल् अन्फाल ८:७३*

पाहा, या आयतीमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, सामाजिक सेवेसाठी एकमेकात सौहार्द्र अत्यंत आवश्यक आहे. जर तसे झाले नाही तर ही पृथ्वी मानवाच्या पवित्र रक्ताने लांछित होईल. मग भक्तांना या (असत्याच्या) जगात डोके लपविण्या इतकीही जागा मिळणार नाही.

ज्यांनी युरोपची यात्रा केली आहे. त्यांना हे पुरेपूर माहित आहे, किंवा ज्यांनी युरोपचा इतिहास वाचला आहे, त्यांनी पाहिले आहे की, तेथे मानवतेची पूर्णतः दुर्दशा झाली आहे. तेथे, वडील-मुलगी, भाऊ-बहिण, या नात्याला काही अर्थ राहिला नाही. भर रस्त्यात व्याभिचार होतो आहे. पार्क व क्लब मध्ये स्वैर वर्तनाचा नंगा नाच सुरु आहे. ठिकठिकाणी दारूच्या (पब) अड्डयांचे पेव फुटले आहे. नवयुवक आणि कोमल कुमारिका यौवन मस्ती लुटण्यात गुंग झाली आहेत. ज्या ठिकाणी सभ्यता आणि संस्कृती शिकविली जाते ती पवित्र विश्वविद्यालये व्याभिचाराचे अड्डे बनले आहेत. संमिश्र शिक्षणाचा परिणाम म्हणून ८०% मुलीना जाणीव येण्यापूर्वीच मातृत्वाला सामोरे जावे लागत आहे. हे आम्ही कुठवर वर्णन

करावे ? थोडक्यात असे म्हणता येईल की, अशी एकही वाईट गोष्ट शिल्लक नाही, जी युरोपच्या बाजारात दिसत नाही.

याचे एकच कारण आहे. ते म्हणजे ईश्वराच्या भक्तांनी या दुष्कृत्याच्या निर्मूलनार्थ एकही संघ (संघटना) बनवला नाही. उलट जगातील ईश्वर भक्त आपसातील हेव्या दाव्यात (भांडणात) गुंग आहेत. आम्हाला याचे अत्यंत दु:ख आहे की, आशिया सुध्दा या दुष्कृत्यांना बळी पडत आहे. इथेही ईश्वर भक्तांची आपसात भांडणे जुंपली आहेत. ही अशीच अवस्था राहिल्यास ईश्वराचे नाव घेणारे कोणीही उरणार नाही. ज्यांच्या इज्ञती साठी आमची जीव देण्याचीही तयारी असते, त्याही उद्या युरोपच्या धर्तीवर रस्त्यावर अश्लील कृत्यात सहभागी होतील.

"लोकांच्या गुन्ह्यामुळे पृथ्वी आणि समुद्रावर उपद्रव माजले आहेत."

सूरह अर्‌रुम ३०:४१

परमेश्वराच्या भक्तांची कुरआन खालील प्रमाणे स्पष्ट करत आहे -

"श्रध्दावंत पुरुष व श्रध्दावंत स्त्रिया हे सर्व एकदुसऱ्यांचे मित्र आहेत. भलेपणाचा आदेश देतात व वाईट गोष्टीपासून रोखतात. नमाज कायम करतात. जकात देतात आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञाधारक आहेत. हे ते लोक आहेत, ज्याच्यावर अल्लाहचा कृपा वर्षाव होणारच. खचितच अल्लाह सर्वांवर प्रभावी व चतुर आणि बुध्दिमान आहे." **सूरह अत्‌तौबा ९:७१**

जे लोकांना चांगुलपणाची शिकवण देतात, त्या टोळीला (लोकांना) ईश्वर सफलतेचे वरदान देतो.

कुरआन स्पष्टोक्ती आहे की -

"सद्‌वर्तनाचे आवाहन करणारा व चांगुल पणाचा आदेश देणारा, तसेच दुराचाराचा प्रतिबंध करणारा, एक गट तुमच्यात अवश्य असला पाहिजे, अशा लोकांनाच साफल्य लाभेल." **सूरह आणि इमरान ३:१०४**

९) कुरआन आणि माता-पिता

आई वडिलांची सेवा करण्याचा आदेश दिला नसता तरी मानवाने आईवडिलांची सेवा केलीच असती. कारण मानवाच्या अंतःकरणाची ती स्वाभाविक वृत्ती आहे. आपण जेव्हा विचार करू लागतो, तेव्हा आमच्या लक्षात आमचा जन्मापासून तो तरुणपणा पर्यंतचा प्रवास लक्षात येतो. आई वडिलांनी आमचे पालन पोषण केले. त्यांनी जर आमच्या कडे लक्ष दिले नसते तर आम्ही एक दिवसही जिवंत राहू शकलो नसतो. त्यांनी आमच्या शिक्षणाची चांगली सोय करून आम्हास या जगात राहण्यास पात्र केले. त्यांनी स्वतःच्या सुखाचा त्याग करून, त्यांनी घाम गाळून कमावलेला पैसा आमच्या साठी खर्च केला. ते तसे न करते तर आम्ही एका एका पैशाला महाग झालो असतो. मग सांगा ! ज्यांनी आमच्या साठी सर्वस्व समर्पण केले, त्यांच्यासाठी आमचे काही कर्तव्य नाही काय ?

कुरआन या बाबतीत अत्यंत योग्य असे मार्गदर्शन करत आहे -

"तुझ्या पालन कर्त्याने निर्णय दिलेला आहे की, तुम्ही लोकांनी इतर कोणाचीही भक्ति करू नये. परंतु केवळ त्याची, आईवडिलांशी सद्‌वर्तन करा. तुमच्या पाशी त्यांच्या पैकी एक अथवा दोघे वृध्द होऊन राहिले तर, त्यांच्यासाठी 'ब्र' देखील काढू नका. व त्यांना झिडकारून प्रत्यूत्तर देखील देऊ नका. तर त्यांच्याशी आदर पूर्वक बोला. आणि नरमी आणि दयार्द्रतने त्यांच्याशी नमून रहा. आणि प्रार्थना करीत जा की, हे पालनकर्त्या, यांच्यावर दया कर, ज्या प्रमाणे दया आणि वात्सल्याने बालपणी यांनी माझे संगोपन केले." *सूरह बनी इस्त्राईल १७:२३ ते २४*

"आम्ही मानवास आदेश दिला आहे की, त्याने आपल्या आई वडिलांशी सद्व्यवहार करावा. परंतु जर त्यांनी तुझ्यावर दबाव आणला की, तू माझ्या बरोबर एखाद्या अशा उपास्याला भागीदार ठरवावे, ज्याला तू (माझा भागीदार म्हणून) जाणत नाहीस. तर त्यांची आज्ञा पाळू नकोस. माझ्याकडेच तुम्हा सर्वांना परतून यावयाचे आहे. मग मी तुम्हाला दाखवीन की, तुम्ही काय करीत राहिला होता." *सूरह अल् अन् कबूत २९:८*

आई वडिलांनी ईश्वरीय आज्ञांचे उल्लंघन करण्याचा आदेश दिला तरी त्याने ती आज्ञा मानू नये, वरील आयतीत हीच महत्वाची बाब आम्हास

सांगितली आहे. कारण ईश्वरानेच आम्हास निर्माण केले आहे. तसेच आमच्यासाठी प्रेमळ आई वडिलही दिले. ईश्वरानेच आम्हासाठी अनेक उपयुक्त वस्तू निर्माण केल्या. म्हणून ईश्वराच्या आराधनेत अन्य देव देवतास सामिल करून घेण्याचा आदेश आई-वडिलांनी दिला, तरी तो आम्ही मानू नये. ईश्वराचे आम्हावर अधिक उपकार आहेत, हे लक्षात घ्यावे. आणि कदाचित आई-वडील व ईश्वरीय आज्ञा यात विरोधाभास असला तरी, ईश्वराचे आमच्यावर अनंत उपकार असल्यामुळे, ईश्वराचीच आज्ञा पाळावी. याचा अर्थ असा नाही की, आईवडिलांची सेवा करू नये. या जगात त्यांची सेवाही आवश्यमेव आहे. त्यांची सेवा आर्थिक किंवा अन्य रूपात असू शकेल.

या कडे कुरआन आपले लक्ष वेधून घेते.

"आणि ही वस्तुस्थिती आहे की, आम्ही मानवाला आपल्या माता-पित्याचा हक्क ओळखण्याची स्वत: ताकीद दिली आहे. त्याच्या आईने यातना मागून यातना सहन करून, त्याला आपल्या उदरात ठेवले. आणि दोन वर्षे तिचे दूध सोडविण्यास लागले. (म्हणूनच आम्ही त्याला उपदेश केला की,) माझ्या प्रती कृतज्ञता दाखव आणि आपल्या माता पित्याशी ही कृतज्ञ राहा. माझ्याकडेच तुला परतावयाचे आहे. परंतु जर त्यांनी तुझ्यावर दबाव आणला की, माझ्या समवेत तू एखाद्याला भागीदार ठरवावे की, तू त्याला जाणत नाही. तर त्यांचे म्हणणे अजिबात ऐकू नकोस. जगात त्यांच्याशी सद् व्यवहार करीत राहा."

सूरह लुकमान ३१:१४ ते १५

आई वडील आणि मुले यांचे संबंध कसे असावेत हे या आयती ने आम्हासमोर स्पष्ट केले आहे. या आयतीवर जसजसा आपण विचार करीत राहू तसतसे या आयतीतील अध्यात्मिक भावना आम्हास स्पष्ट होत जाते.

'आई-वडिलांच्या पायाखाली स्वर्ग आहे' असे एका हदीस मध्येही सांगितले आहे. ज्यांना आई-वडिलांची सेवा करण्याची संधी मिळाली, परंतु त्याचा त्यांनी फायदा घेतला नाही. त्यामुळे ते स्वर्गापासून वंचित राहिले. ती मुले खरोखरच दुर्दैवी. याच प्रमाणे कुरआनमधील अनेक आयती आई-वडिलांची सेवा करण्यास प्रोत्साहन देतात.

१०) कुरआन आणि न्याय

समाजाच्या सुरक्षिततेसाठी न्यायपूर्ण वर्तनाची आवश्यकता असते. ज्या समाजात न्यायाची पायमल्ली होते त्या समाजाची प्रगती होऊ शकत नाही. 'न्याय' हा समाजाचा अधिकार आहे. त्याला धनाने अथवा शक्तिच्या बळावर हिसकावून घेता येत नाही. इतिहास साक्षी आहे की, ज्यांनी धन व शक्तिच्या बळावर न्याय हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. त्याला इतिहासाने कधी माफ केले नाही. तसेच त्यांना भविष्यातही कधी माफ केले जाणार नाही. असा एक दिवस येईल जेव्हा न्यायाची पायमल्ली करणाऱ्यांचा गळा घोटला जाईल. जे मानवतेला शक्तिने दाबण्याचा प्रयत्न करतील, त्यांना एके दिवशी दुःखाला सामोरे जावे लागेल. हा या जगाचा अटळ नियम आहे. त्या नियमाला कोणीही बदलू शकत नाही. जे न्यायाच्या आसनावर विराजमान होतात. त्यांना कठीण परीक्षेस सामोरे जावयाचे आहे हे ते (गुर्मित) लवकरच विसरतात. त्यांना त्यांच्या क्षणक्षणाचा हिशोब मानवतेच्या न्यायालयात द्यावयाचा आहे. त्यातून सही सलामत सुटले तरी इतिहासाच्या पानांना हिशोब द्यावयाचा असतो. त्यातूनही वाचले तरी ईश्वरापुढे त्याच्या न्यायालयातून ते वाचू शकत नाहीत. त्याचे कारण हे आहे की त्यांनी न्याय करतांना ज्याच्यावर अन्याय केला ते आत्मे अद्याप शांत झालेले नसतात. त्यांचा न्याय शक्ति आणि धनाच्या बळावर हिसकावून घेतलेला असतो. त्यांचे आत्मे तो पर्यंत शांत होणार नाहीत, जो पर्यंत न्यायपूर्ण बदला त्यांना मिळणार नाही.

अन्याय करणारे न्यायाधीश जे न्यायाच्या आसनावर विराजमान झालेले आहेत, त्यांना इस्लामने कडक ताकीद दिली आहे. अन्यायी न्याय देणाऱ्यास कडक शिक्षा दिली जाईल. असे इस्लामध्ये प्रावधान आहे. त्याचा परिणाम म्हणून इस्लाममधील कित्येक धर्मगुरूंनी व अत्याचारी राजांनी न्यायाधिशाची खुर्ची आसन स्वीकारण्यास नकार दिला आहे. न्यायाधिशाचे पद स्वीकारण्यासाठी अनेकांना बाध्य केले गेले, त्यांना आर्थिक प्रलोभने दाखविली गेली, त्यांना फटक्यांची शिक्षा दिली गेली. तुरुंगात बंद केले गेले. तरीही अनेक जणांनी न्यायाधिशांच्या आसनावर बसण्यास नकार दिला. इस्लामी न्याय जगाच्या इतिहासात म्हणूनच प्रसिध्द आहे.

या बाबतीत कुरआन काय आदेश देत आहे -

"अल्लाह तुम्हाला आज्ञा देतो की, ठेवी ठेवीदारांच्या स्वाधीन करा, आणि जेव्हा लोका दरम्यान न्याय निवाडा कराल तेव्हा न्यायाने निवाडा करा.

अल्लाह तुम्हाला उपदेश देत आहे. आणि निःसंशय अल्लाह सर्व काही ऐकतो व पाहतो." *सूरह अन् निसा ४:५८*

"हे श्रध्दावंतांनो, न्यायावर दृढ राहणारे व अल्लाहसाठी साक्षीदार बना. यद्यपि तुमच्या न्यायाचा व तुमच्या साक्षीचा आघात तुमच्या स्वतःवर, आईबापावर व नातेवाईकावर जरी होत असेल, तरी मामल्यातील पक्षकार मग तो श्रीमंत असो अथवा गरीब, अल्लाह तुमच्या पेक्षा त्यांचा जास्त हितचिंतक आहे. म्हणून आपल्या मनोवासनेच्या मागे धावून न्यायापासून दूर राहू नका. आणि जर तुम्ही पक्षपाताची गोष्ट बोललाच अथवा सत्याला बगल दिली, तर समजून असा की जे काही तुम्ही करता, अल्लाहला त्याची माहिती आहे." *सूरह अन् निसा ४:१३५*

एकाकी असणाऱ्या व्यक्तिला हा न्यायाचा मार्ग तसा कठीण नाही. पण माणसाची परीक्षा तेव्हा होते जेव्हा स्वतःच्या आई-वडिलांचा न्याय करण्याची त्याच्यावर पाळी येते तेव्हा त्याचे मन डगमगू लागते. तेव्हा त्याच्या न्याय प्रियतेची परीक्षा होते. अशा वेळेसही कुरआनने अगदी स्पष्ट केले आहे, की कुठल्याही परिस्थितीत न्यायाचा सत्याचा पक्ष त्याने सोडता कामा नये. अशा परिस्थितीत स्वतः दुसऱ्या न्यायाधिशाकडे 'खटला' वर्ग करावा व स्वतः न्यायास शरण जावे.

या बाबतीत अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) म्हणतात की, "मला त्या विधात्याची शपथ आहे की, जर माझी सर्वात आवडती मुलगी 'फातेमा' जरी चोरी करून न्यायासाठी माझ्यापुढे उभी केली गेली, तरी मी तिला शिक्षाच करेन."

आणि कुरआनमध्ये ही म्हटले आहे.

"श्रध्दावंतांनो ! अल्लाहसाठी सत्यावर अटळ राहणारे, व न्यायाची ग्वाही देणारे बना. एखाद्या गटाच्या शत्रुत्वाने तुम्हाला इतके प्रक्षोभित करू नये की, तुम्ही न्यायापासून विन्मुख व्हावे. न्याय करा हे ईशपरायणतेशी अधिक निकट वर्ती आहे. अल्लाहचे भय बाळगून कार्य करीत राहा. जे काही तुम्ही करता, अल्लाह त्याची पुरेपूर खबर ठेवणारा आहे." *सूरह अल् माईदा ५:८*

साधारण परिस्थितीत लोकांशी पूर्णरीतीने न्याय देणे अवघड नाही. परंतु एकीकडे तुमचा जिवलग मित्र व दुसरीकडे तुमचा कट्टर शत्रू न्यायासाठी तुमच्या समोर उभे आहेत. न्याय तुमच्या कट्टर शत्रूकडे जात

आहे. तेव्हा तुमची खरी परीक्षा असेल. तुमच्या समोर कट्टर शत्रूचा बदला घेण्याची उत्तम संधी आहे. आणि तुम्ही जाणीव पूर्वक जेव्हा शत्रूवर अन्याय करता तेव्हा काही क्षणासाठी आनंद होईल. परंतु तुमच्या कपाळावर कायमचा 'कलंक' इतिहासात नोंदविला जातो. परंतु इस्लाम, या कलंका ऐवजी इतिहासाने गर्व करावा अशी शिकवण देतो. इस्लामी इतिहासाचे तुम्ही ओझरते जरी अवलोकन केले तरी तुमची मान गर्वाने ताठ होईल.

कुरआन स्पष्टोक्ती आहे -

"जेव्हा तुम्ही बोलाल ते न्यायोचित बोला. ती गोष्ट आपल्या नातेवाईकांच्या बाबतीत का असेना." *सूरह अल् अन्आम ६:१५२*

"आणि जर तुम्हा लोकांना बदला घ्यावयाचा असेल तर फक्त त्या प्रमाणात घ्यावा ज्तिका तुमच्यावर अत्याचार केला गेला असेल. परंतु तुम्ही जर संयम बाळगला तर निश्चितपणे संयम बाळगणाऱ्या साठी उत्तम आहे." *सूरह अन्नहल १६:१२६*

"आणि त्यांना सांगा की, जो ग्रंथ अवतरला आहे, मी त्यावर श्रध्दा ठेवली. मला आज्ञा दिली गेली आहे की, मी तुमच्या दरम्यान न्याय करावा अल्लाहच आमचा पालनकर्ता आहे. आणि तुमचा पालन कर्ता सुध्दा."

सूरह अश्शूरा ४२:१५

या आयतीत प्रेषित मुहम्मद (स.) यांना प्रेषित म्हणून पाठविण्याचा उद्देश स्पष्ट केला आहे. त्यांनी न्यायाचे वर्तन करावे नाहीतर त्यांना प्रेषित म्हणून पाठविण्याचा उद्देशच असफल होईल. दुसऱ्या एके ठिकाणी कुरआन म्हणते -

"आणि निर्णय द्यावयाचा असेल तर न्यायपूर्णरीतिने द्या. कारण अल्लाह न्यायी लोकांना पसंद करतो." *सूरह अल् माईदा ५:४२*

हा न्यायाचा सिध्दांत कुरआनने मानवाच्या कल्याणासाठी यशासाठी सांगितला आहे. न्यायापासून दूर गेल्यामुळे मानवतेची दुर्दशा झाली आहे. आज निर्धन व निर्बलांसाठी न्यायाचे दरवाजे बंद झाले आहेत. हे दरवाजे जो पर्यंत उघडले जाणार नाहीत तो पर्यंत मानवता धाय मोकलून रडत राहील. असेही होऊ शकते की धाय मोकलून रडणाऱ्या मानवतेचा प्राण उडून जाईल.

११) कुरआन आणि राजनैतिक व्यवस्था

हे विश्व सृष्टीकर्त्या ईश्वराने निर्माण केले आहे. तोच या विश्वाचा संचालक आहे. असा कुरआनचा दृष्टीकोन आहे. तो इच्छिल त्याला बादशहा बनवितो आणि हवे त्याच्या कडून बादशाही हिसकावून ही घेतो. त्याच्या विचारावर कोणत्याही सत्तेचा प्रभाव पडू शकत नाही. तो सर्वेसर्वा आहे.

कुरआनची ही साक्ष पहा -

"सांगा, हे अल्लाह समस्त राज्याचा स्वामी ! तू हवे त्याला राज्य देतोस. हवे त्याच्या कडून हिरावून घेतोस. हवी त्याला प्रतिष्ठा प्रदान करतोस. हवे त्याला अपमानित करतोस. कल्याण तुझ्याच अखत्यारित आहे. निःसंशय तू प्रत्येक गोष्टीला समर्थ आहेस." *सूरह आलिइमरान ३:२६*

"भूमि अल्लाहची आहे. तो आपल्या दासांपैकी ज्याला इच्छितो त्याला तिचा वारस बनवितो." *सूरह अल् आअराफ ७:२८*

ही आहे कुरआनची मध्यवर्ती विचार प्रणाली आता त्या बाबत कुरआनच्या मार्गदर्शनाचे अध्ययन करू.

या विश्वाचा निर्माता ईश्वरच आहे हे तर स्पष्टच आहे, तोच आमचा पालनकर्ताही आहे. ज्याने आपल्या नियंत्रणाने अधिकाराने या विश्वाचा कण नि कण निर्माण केला आहे. त्याने साऱ्या विश्वाला नियमात बांधून टाकले आहे. त्या नियमाच्या बाहेर एक कणही जाऊ शकत नाही. सूर्य, चंद्र, नक्षत्रे, भूमि व आकाश आणि इतर ईश्वराने टाकलेल्या जबाबदाऱ्या शिस्तीत पार पाडीत आहेत. ते ईश्वरी शिस्तीचे किंचितही उल्लंघन करू शकत नाहीत. जसे आमच्या शरिराच्या अवयवांचे कार्य चालते. पाय चालण्यासाठी दिले आहेत, त्याच्या कडून विचार करण्याचे काम घेतले जात नाही. हात काम करण्यासाठी दिले आहेत, त्यांच्या कडून अन्न चर्वण करण्याच्या कामाची अपेक्षा असत नाही. कान श्रवणासाठी दिले आहेत. त्याने कधी पाहण्याचे काम घेतले जात नाही. असेच सर्व अवयवांचे आहे. परंतु ईश्वराने आम्हाला काही स्वातंत्र्ये बहाल केली आहेत. त्याचा आम्ही कितपत योग्य उपयोग करतो हे पाहावयाचे आहे. ते स्वातंत्र्य कोणते ? ऐका, 'ते स्वातंत्र्य विचार करण्याचे व त्या प्रमाणे वागण्याचे आहे ? म्हणजे सत्य किंवा असत्य मार्गाने जाण्याचे व्यभिचार व अत्याचार या पासून दूर राहण्याचे.

कुरआन स्पष्टोक्ती आहे -

''आम्ही मानवाला एका मिश्र विर्यापासून निर्माण केले आहे. जेणे करून त्याची परिक्षा घ्यावी. आणि त्या साठी आम्ही त्याला ऐकणारा आणि पाहणारा बनविला. आम्ही त्याला मार्ग दाखविला. मग त्याने कृतज्ञता मानणारे बनावे अथवा द्रोह करणारा. द्रोह करणाऱ्यांसाठी आम्ही साखळदंड व जोखड आणि भडकणारा अग्नी तयार ठेवला आहे.'' *सूरह अद्‌दहर ७६: २ ते ४*

आता आपल्या लक्षात आले आहे की आम्ही ईश्वराच्या बंधनातून मुक्त होऊ शकत नाही. म्हणून आम्ही त्याच्या नियमाचे पालन करावे हेच योग्य आहे. ज्या प्रभूने आम्हास निर्माण केले तोच आम्हासाठी योग्य नियम तयार करू शकतो. त्या बाबत कुरआनोक्ती आहे -

''लक्षात ठेवा, त्यानेच आम्हाला निर्माण केले आणि त्याचाच आदेश सर्वावर चालतो.'' *सूरह अल् आअराफ ७:५४*

''ते लोक आता म्हणतात, ''या कार्यवाहीत आमचा देखील वाटा आहे.'' त्यांना सांगा कोणाचाही कसलाही वाटा नाही. या कामाचे सर्व अधिकार अल्लाहच्या हातात आहेत.'' *सूरह आलि इमरान ३:१५४*

''शासनाची सत्ता अल्लाह शिवाय कोणाची नाही. त्याची आज्ञा आहे की, त्याच्या स्वत:शिवाय तुम्ही इतर कोणाचीही भक्ति करू नका. हीच थेट सरळ जीवनपध्दती आहे. पण बहुतेक लोक जाणत नाहीत.'' *सूरह युसूफ १२:४०*

ह्या आणि दुसऱ्या आयती हेच स्पष्ट करतात की, सर्वंकष सत्ता ईश्वराचीच असली पाहिजे, ज्याने आम्हाला निर्माण केले. त्याला आमच्या गरजांची पूर्ण जाण आहे. कारण त्याला अदृष्याचे पूर्ण ज्ञान आहे. कारण त्याला 'अदृष्य' अशक्य नाही. कुरआनोक्ती आहे -

''तुम्हाला ते योग्य वाटत नाही. परंतु शक्य आहे की, जी गोष्ट तुम्हाला नापसंद असेल, परंतु तीच तुमच्यासाठी अधिक चांगली असेल. आणि हे ही शक्य आहे की, जी गोष्ट तुम्हाला पसंद असेल ती तुमच्यासाठी वाईट असेल. अल्लाह जाणतो आणि तुम्ही जाणत नाही.'' *सूरह अल् बकरा २:२१६*

तुम्हाला हे थोडे विचित्र वाटेल. अल्लाहने आम्हाला स्वातंत्र्य तर दिले. मात्र त्याच्यावर निराळ्या प्रकारे बंधने घातली. हे कसे ? स्वातंत्र याचा अर्थ असा नाही. की मनुष्याने ईश्वराची बंधने तोंडून मनमानेल तसे वागावे.

स्वातंत्र्याचा अर्थ मनाला वाटेल तसे वागावे असा असेल तर ते

स्वातंत्र्य नव्हे तर स्वैराचार आहे. आणि याचा अर्थ असाही आहे की जगातील कोणताही देश स्वतंत्र नाही. स्वातंत्र्याच्या खरा अर्थ असा आहे की, मानवाने मानवावर लादलेल्या गुलामगिरीतून मानवाने मुक्त व्हावे व जो आपला खरा पालनकर्ता ईश्वर आहे, त्याचे दास्यत्व स्वीकारावे. हेच खरे स्वातंत्र्य आहे. आणि कुरआन त्याच स्वातंत्र्याकडे येण्याचे आवाहन करते.

लौकिक जगाने तयार केलेल्या कायद्यापेक्षा कुरआनने घालून दिलेला कायदा वेगळा आहे. लौकिक जगाचे कायदे मानवाच्या बुध्दिची निर्मिती असते. मात्र मानवाचा त्याने निर्माण केलेल्या कायद्यावर पूर्ण पणे विश्वास नसतो. त्यामुळे काळाबरोबर त्याचे कायदेही बदलत असतात. मात्र कुरआनच्या कायद्यात असे बदल होत नाहीत, कारण कुरआनचे कायदे शास्वत जीवनासाठी असतात. या बाबतीत कुरआन आदेश देत आहे.

"लोकहो ! जे काही तुमच्या पालनकर्त्या कडून तुमच्यावर अवतरले गेले आहे. त्याचे अनुसरण करा. आणि आपल्या पालनकर्त्याला सोडून अन्य कोणाचे अनुसरण करू नका. पण तुम्ही उपदेश कमीच मानता !"

सूरह अल् आअराफ ७:३

"आता जे ज्ञान तुमच्यापाशी आलेले आहे. ते असतांना देखील, तुम्ही जर लोकांच्या इच्छेच्या मागे चाललात तर अल्लाह विरुध्द तुमचा कोणी संरक्षक व मदतगारही नाही. व त्याच्या पकडीतून तुम्हाला कोणी वाचवू शकणार नाही."

सूरह अर्‌रअद १३:३७

सर्वोच्च कायदा

अल्लाह व त्याचे प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आदेश कुरआनच्या दृष्टीकोनात सर्वश्रेष्ठ आहेत. कोणीही मुसलमान त्याच्या विरुध्द वर्तन करू शकत नाही. त्याला तसा अधिकार असत नाही. एवढेच नाही तर त्याला (अल्लाह आणि यांच्या आदेशाला न जुमानणारा) अश्रध्द ठरविले जाते. त्या बाबत कुरआनचे म्हणणे स्पष्ट आहे.

"कोणत्याही श्रध्दावंत पुरुषाला व कोणत्याही श्रध्दावंत स्त्रीस, हा अधिकार नाही की, जेव्हा अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) यांनी एखाद्या बाबतीत निर्णय दिला असेल, तर मग आपल्या त्या बाबतीत स्वतः निर्णय घेणे, त्याच्या अखत्यारित असेल आणि जो कोणी अल्लाह व त्याचे पैगंबर यांची अवज्ञा करील, तर तो उघडपणे मार्ग भ्रष्ट अश्रध्द गणला जाईल." *सूरह अल् अहज़ाब ३३:३६*

१२) इस्लामी राज्याचे अधिकारी आणि त्यांची कर्तव्ये

कुरआनने राजनीतिसाठी जो कायदा आम्हास दिला आहे तो ऑरिस्टॉटल प्रणित नाही. ग्रीस मध्ये त्या काळी मतदारांची संख्या (बहुमताची) मोजून कायद्यास मान्यता दिली जात असे. मात्र कुरआनने जो कायदा घालून दिला आहे. त्यास खिलाफत असे म्हटले जाते. याचा अर्थ असे एक गणतंत्र की ज्याचा प्रमुख खलिफा असे. हा खलिफा ईश्वराचा व कुरआनचा कायदा अमलात आणण्यास बांधिल असे. त्याच्या मदतीला विधानसभा (प्रतिनिधिमंडळ) असे. त्या विधान सभेत ईश्वराच्या व कुरआनच्या आज्ञेविरुध्द कायदा पास होणार नाही, हे पाहणे खलीफाची जबाबदारी असे.

खलिफा बाबत कुरआन आदेश आहे -

''आणि (आठवण करा) जेव्हा तुमच्या पालन कर्त्याने दूतांना सांगितले की, ''मी पृथ्वीवर एक खलिफा (माझा प्रतिनिधी) बनविणार आहे.''

सूरह अल बकरा २:३०

''विसरू नका की, तुमच्या पालनकर्त्यांने 'नूह' प्रेषितांच्या लोकांनतर तुम्हाला त्याचे उत्तराधिकारी (वारस) बनविले.'' *सूरह अल् आअराक ७:६९*

''त्याने मूसां (अ.) उत्तर दिले. ''जवळ आहे ती वेळ की तुमच्या पालनकर्त्यांने तुमच्या शत्रूचा नाश करावा. आणि तुम्हाला जमिनीवर उत्तराधिकारी (वारस) बनवावे. मग पाहू की तुम्ही कसे आचरण करता !''

सूरह अल् आअराफ ७:१२९

''आणि त्यांच्यानंतर आम्ही तुम्हाला भूतलावर त्यांची जागा दिली आहे. जेणे करून पाहावे, तुम्ही कशी कृत्ये करता.'' *सूरह युनूस १०:१४*

विधान सभेची गरज त्या वेळी निर्माण होते, जेव्हा, एखादी नवी समस्या, ज्या बाबत कुरआन आणि हदीस मध्ये नियम वा मार्गदर्शन नसेल त्या वेळी खलिफाला स्वत:च्या इच्छेने एखादा कायदा करता येत नाही. त्या वेळी खलिफावर विधान सभेची मदत घेणे बंधनकारक ठरते. विधान सभेत जे विधान (कायदा-नियम वगैरे) बनेल त्याची अंमलबजावणी फक्त खलिफाने करावयाची आहे. या बाबत ही कुरआनचा आदेश स्पष्ट आहे.

"आणि आपले व्यवहार सल्ला मसलतीने चालवितात." *सूरह अश्शूरा ४२:३८*

कोणाही अत्याचारी व व्यभिचारी माणसाला 'खलिफा' बनविता येणार नाही. त्या बाबत कुरआन आदेश आहे -

"आठवण करा, जेव्हा अल्लाहने इब्राहिम कडून काही गोष्टी मध्ये परीक्षा घेतली, आणि जेव्हा तो परीक्षेमध्ये पूर्ण उतरला. तेव्हा अल्लाहने त्यांना म्हटले "मी तुला सर्व लोकांचा नेता म्हणून नियुक्त करीत आहे" तेव्हा इब्राहिमने विचारले, "आणि माझ्या संतती साठी हेच अभिवचन आहे ?" तेव्हा अल्लाहने उत्तर दिले, "माझे अभिवचन अत्याच्यार्‍यांसाठी नाही."

सूरह अल् बकरा २:१२४

जो न्यायी आहे, आणि ईश्वरीय नियमांना योग्य प्रकारे लागू करू शकतो, तोच 'खलिफा' बनू शकतो. स्वार्थ परायण व्यक्ति खलिफा बनू शकत नाही. कुरआन निर्देशन करत आहे -

"कोणत्याही अशा व्यक्तिची आज्ञा पाळू नका. ज्याच्या हृदयाला आम्ही आमच्या स्मरणातून बेसावध केले आहे. ज्याने मनमानी (अल्लाह शिवाय इतर) अनुसरण अंगिकारले आहे. आणि त्याची कार्यपध्दती मर्यादा ओलांडून गेली आहे." *सूरह अल् कहफ १८:२८*

अज्ञानी (जो ईश्वरीय आदेशाला जाणत नाही. अंमलात आणित नाही) खलिफा बनू शकत नाही. असा कुरआनचा आदेश आहे.

"आणि आपली संपत्ती जिला तुमचे जीवन साधन बनविले आहे, ती नादान लोकांच्या हवाली करू नका." *सूरह अन् निसा ४:५*

"त्यांना विचारा, "जाणणारे आणि न जाणणारे दोघे कधी एक समान होऊ शकतील कां ?" *सूरह अज़्ज़ुमर ३९:९*

वाईट गोष्टी ज्याला कधीही स्पर्श करू शकणार नाहीत. तोच 'खलिफा' होण्यास पात्र आहे त्याने सामान्य माणसापेक्षा जास्त सदाचारी व जास्त ईमानदार असले पाहिजे.

१३) आचार संहिता

१) जीवन सुरक्षा

"कोणाचीही हत्या करू नका. जिला अल्लाहने निषिध्द ठरवले आहे. परंतु सत्यानिशी आणि जी व्यक्ति अन्यायाने ठार केली गेली असेल त्याच्या वारसास आम्ही किसास (बदला) चा हक्क दिला आहे." *सूरह बनी इस्राईल १७:३३*

२) धन सुरक्षा

"आणि तुम्ही आपसामध्ये दुसऱ्याची संपत्ती अवैधपणे गिळंकृत करू नका. किंवा आपल्या अधिकाऱ्यापुढे ते ह्या हेतूने सादर करू नका, की तुम्हाला त्या संपत्ती मधील काही भाग हेतु पुरस्सर हकनाकपणे खाण्याची संधी मिळेल."

सूरह अल् बकरा २:१८८

३) मान सुरक्षा

"हे लोकहो ! ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे. त्यांनी पुरुषांनी दुसऱ्या पुरुषांची टिंगल उडवू नये. शक्य आहे की ते त्यांच्यापेक्षा उत्तम असू शकतील. आणि स्त्रियांनी सुध्दा दुसऱ्या स्त्रियांची टिंगल उडवू नये, शक्य आहे की त्या त्यांच्यापेक्षा उत्तम असतील. आपसात एकमेकांना टोमणे मारू नका. आणि एकमेकांचा उल्लेख वाईट नावाने करू नका." *सूरह अल् हुजूरात ४९: ११ ते १२*

४) घरगुती जीवन

"हे लोकहो ! ज्यानी श्रध्दा ठेवली आहे, त्यांनी दुसऱ्याच्या घरात परवानगी शिवाय प्रवेश करू नये." *सूरह अन् नूर २४: २७*

५) शिवी गाळी अल्लाहला पसंद नाही.

"अल्लाह हे पसंत करीत नाही की, माणसाने शिवी गाळी करता तोंड उघडावे." *सूरह अन् निसा ४: १४८*

६) कल्याणासाठी संघटना

"सद्वर्तनाचे आवाहन करणारी, चांगुलपणाच्या आदेश देणारी एक संघटना आवश्यक आहे. त्या मुळे साफल्य लाभेल." *सूरह आलि इमरान ३:१०४*

७) धर्म स्वातंत्र्य

"धर्माच्या बाबतीत कोणावरही जोरजबरदस्ती नाही."

सूरह अल् बकरा २: २५६

"मग तू काय त्यांना भाग पाडतील. त्यांनीं श्रध्दावंत बनावे. तसे करू नको."

सूरह युनूस १०:९९

८) दुसऱ्या धर्माला (त्यांच्या देवदेवतांना) शिविगाळ नको.

"मुसलमानांनो, ते लोक अल्लाह शिवाय ज्याचा धावा करतात त्यांचा उपहास करू नका."

सूरह अल् अन्आम ६:१०८

९) दुसऱ्या व्यक्तिच्या गुन्ह्याबाबत कोणालाही शिक्षा नाही.

"प्रत्येक व्यक्ति जे काही कमावते, त्याला जबाबदार ती स्वत:च आहे. कोणीही ओझे उचलणारा दुसऱ्याचें ओझे उचलत नसतो."

सूरह अल् अन्आम ६:१६४

१०) न्याय करण्यापूर्वी संपूर्ण चौकशी करा.

"जर कोणी अवज्ञाकारी तुमच्या पाशी एखादी बातमी घेऊन आला, तर चौकशी करून घेत चला. एखादेवेळी असे घडू नये की, तुम्ही एखाद्या समूहाला न कळत हानी पोहोचवावी आणि मग कृतीवर पश्चाताप करावा."

सूरह अत् हुजूरात ४९:६

"अशा एखाद्या गोष्टी मागे धावू नका, जिचे तुम्हास ज्ञान नसेल."

सूरह बनीइस्त्राईल १७: ३६

११) राज्याच्या नजरेत सर्व सारखेच

"फिरऔनने भूतलावर दुर्वतन केले. आणि तिच्या निवासियांना गटागटात विभागले. त्या पैकी एका गटाला तो अपमानित करीत असे. त्यांच्या मुलांना ठार करीत असे व त्यांच्या मुलींना जिवंत ठेवीत असे खरोखरीच तो हिंसाचारी होता."

सूरह अल् कसस २८:४

१२) विवश आणि लाचारांचा हक्क

"आणि त्यांच्या मालमत्तेस हक्क होता, याचकांचा आणि वंचितांचा ज्यांना तो मिळाला नाही."

सूरह अज् जारियात ५१:१९

१४) कुरआन आणि नैतिक मूल्ये

जगातील सर्व धर्माच्या धार्मिक ग्रंथांनी शिष्टाचाराची शिकवण दिली आहे. कुरआनतही ती आहे, यात काही नवल नाही. परंतु जेव्हा आम्ही इतर धर्मग्रंथाचे अध्ययन करतो तेव्हा असे वाटते की यात काही त्रुटी आहेत परंतु त्यात काही दोषास्पद नाही.

जे धर्म आणि त्याचे उद्गाते या जगात अवतीर्ण झाले. ते त्यांच्या काळाचे, त्यांच्या समाजाचे प्रतिनिधी होते. फलतः त्यांच्या विचारावर काळाचे व त्या ठिकाणच्या सामाजिक नियम व परंपराचे, त्यांच्या विचारावर बंधन पडले. त्यामुळे त्यांच्या शिकवणीस - मार्गदर्शनास मर्यादा पडल्या. ते संपूर्ण मानव जातीस अनंत काळासाठी मार्गदर्शन करू शकले नाहीत.

हजरत ईसा, हजरत मूसा, राम, कृष्ण, महावीर स्वामी, गौतमबुध्द व शंकराचार्य आणि अशाच अनेक विद्वांनाच्या ग्रंथांचे शिकवणूकीचे अध्ययन केल्यास, आपल्या लक्षात येईल की, त्यांचे उपदेश त्यांच्या काळातील सर्वोत्कृष्ट उपदेश होते.

परंतु कुरआन हा ईश्वर प्रणित शेवटचा ग्रंथ आहे. त्या मधील शिकवण ही कालसापेक्ष नसून ती कालातीत आहे. कुरआन हे कुठल्याही काळा पुरते देशापुरते मर्यादित नाही. ते जगाच्या अंताच्या शेवटच्या दिवसापर्यंत मार्गदर्शन करण्यासाठी अवतरले आहे. फलतः या ग्रंथात शिष्टाचाराचे (चांगल्या वर्तनाचे) सर्वंकष व पुर्णांशाने मार्गदर्शन आले आहे. मी असे कदापि म्हणणार नाही की कुरआनमध्ये काल सीमित असे काही आले नाही. कुरआनने जी शैली स्वीकारली आहे, ती सामाजिक बंधनापासून मुक्त आहे. आणि म्हणूनच, गेली चौदाशे वर्षोपूर्विचा ग्रंथ आजच्या काळासाठीही उपयुक्त असून तो आजच अवतरल्या सारखे वाटते.

१५) मुक्ति मार्ग

कुरआनोक्ती आहे -

''हे लोक हो ! ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे, मी दाखवू तुम्हाला तो व्यापार ! जो तुम्हाला यातना दायक प्रकोपा पासून वाचवील. श्रध्दा ठेवा. अल्लाह व त्याच्या पैगंबरावर आणि प्रयत्नांची पराकाष्टा (जिहाद) करा. अल्लाहच्या मार्गात आपल्या द्रव्यांनिशी व आपल्या प्राणानिशी. हेच तुमच्या साठी उत्तम आहे, जर तुम्ही समजून घेतले. अल्लाह तुमचे गुन्हे माफ करील. आणि तुम्हाला अशा उद्यानात दाखल करील. ज्याच्या खालून कालवे वाहत असतील. आणि चिरंतन निवासाच्या स्वर्गात तुम्हास उत्तम घर प्रदान करील. हेच मोठे यश आहे.'' *सूरह अस् सफ ६१: १० ते १२*

''माणसामध्ये अशीही एखादी व्यक्ति असते. जी आपल्या जीवाचे मोलही अल्लाहसाठी समर्पित करतो. अशा सेवकावर अल्लाह अत्यंत प्रसन्न असतो.''

सूरह अल् बकरा २:२०७

''सरते शेवटी ते त्या आदेशाला पूर्णतः विसरून गेले. ज्याची त्यांना आठवण करून दिली होती. आम्ही त्या लोकांना वाचविले जे वाईटा पासून रोखत होते. आणि उरलेल्या सर्व लोकांना जे अत्याचारी होते. त्यांच्या अवज्ञेपायी कठोर प्रकोपात पकडले.'' *सूरह अल् आअराफ ७:१६५*

''आणि आम्ही वाचविले त्या लोकांना, ज्यांनी श्रध्दा ठेवली होती. आणि अवज्ञेपासून दूर राहत होते.'' *सूरह अन्नम्ल २७:५३*

''त्यांना सफलता देणाऱ्या कारणामुळे अल्लाह त्यांना मुक्ति देईल. त्यांना काही इजाही पोहोचणार नाही. आणि ते दुःखी होणार नाहीत.''

सूरह अज़्ज़ुमट ३९:६१

जे आपल्या पालनकर्त्याच्या आदेशाची अवमानना करीत नाहीत, सतत त्याच्या (ईश्वराच्या) चिंतनात मग्न असतात, एका क्षणासाठीही त्याला विसरत नाहीत, त्यानाच सफलता प्राप्त होते, असे कुरआनने वेळोवेळी घोषित केले आहे.

१६) कल्याणाचा मार्ग

कुरआनने म्हटले आहे -

"ज्या लोकांनी श्रध्दा ठेवली आणि ज्याने सत्कृत्ये केली. ते निश्चितच सर्व श्रेष्ठ आहेत. त्यांचा बदला, त्यांच्या पालनकर्त्यांशी (जवळ) चिरंतन निवासाचे स्वर्ग आहेत. ज्याच्या खालून कालवे वाहत असतील. ते त्यात सदासर्वदा राहतील. अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न झाला व ते अल्लाहशी राजी झाले आहेत. हे असे आहे, त्या माणसासाठी ज्याने पालन कर्त्यांच्या कोपाचे भय बाळगले." *सूरह अल् बय्यिन ९८:७ ते ८*

"जो कोणी सत्कर्म करील स्वतःसाठीच चांगले करील. जो दुष्कर्म करील त्याचे अरिष्ट त्याच्यावरच येईल. आणि तुझा पालनकर्ता दासासाठी अत्याचारी नाही." *सूरह हामीऽऽम असस्सजदा ४१:४६*

"तुम्ही इतरांना सन्मार्गाचा अंगिकार करण्यास सांगता परंतु स्वतःला मात्र विसरता. वास्तविक तुम्ही ग्रंथाचे वाचन करीत आहात, काय तुम्ही बुध्दिचा मुळीच उपयोग करीत नाही." *सूरह अल् बकरा २:४४*

"जे पुण्यकार्यात असतात व सदाचारी असतात. त्यांची अवहेलना केली जाणार नाही. अल्लाहच्या प्रकोपाला जे भिऊन वागतात त्यांना अल्लाह चांगलेच ओळखतो." *सूरह आलिइमरान ३:११५*

"आणि कसलाही अत्याचार व हक्क मारला जाण्यासाठी भीति नसेल. त्या व्यक्तिला जी सत्कृत्ये करील व त्याच बरोबर श्रध्दावंत असेल."

सूरह तॉहा २०:११२

कुरआन नुसार चांगुलपणा व वाईटपणा समान असू शकत नाहीत. म्हणून चांगूलपणाने वाईटपणा घालवून टाका.

वरील कुरआनच्या आयती मध्ये चांगली कामे करण्यासाठी उत्तेजन देण्यात आलेले आहे. ती चांगली कामे म्हणजे कोणती 'चांगली' कामे ते पुढे सांगितले आहे. मात्र एवढे लक्षात घ्या की, ईश्वराची आज्ञा पाळणे हाच सर्वोच्च धर्म होय. त्याच बरोबर, वाईट गोष्टी पासून दूर राहिले पाहिजे ज्यास अल्लाहने प्रतिबंध केला आहे.

कुरआन स्पष्टोक्ती आहे -

"श्रध्दावंत तर एक दुसऱ्यांचे भाऊ आहेत. म्हणून आपल्या भावांच्या दरम्यान संबंध सुरक्षित करा. अल्लाहच्या प्रकोपाचे भय बाळगा. आशा आहे की तुमच्यावर दया केली जाईल." *सूरह हामीऽऽम अस्सजदा ४९:१०*

"लोकहो ! आम्ही तुम्हाला एका पुरुषापासून व एका स्त्री पासून निर्माण केले. मग तुमची राष्ट्रे आणि जाती बनविल्या. जेणे करून तुम्ही एकमेकास ओळखावे. वास्तविक अल्लाह जवळ तुमच्या पैकी जास्त प्रतिष्ठित तो आहे, जो तुमच्या पैकी जास्त ईश परायण आहे. निश्चित अल्लाह सर्व काही जाणणारा आहे." *सूरह अल् हुजूरात ४९:१३*

कुरआनने वेळोवेळी आग्रह धरला आहे की, आम्ही आपसात प्रेमाचा व्यवहार करावा. छळ-कपट, भांडण तंटे या पासून दूर रहावे. हे सर्व ईश्वराच्या इच्छे विरुध्द आहे. मानवाला निर्माण करण्याचा तो हेतु खचितच नव्हता. कुरआनच्या दृष्टीकोनात जात पात याला महत्व नाही. आपण सर्व मानव एकाच आई-वडिलांची संतती आहोत. कोणी कोणापेक्षा उच्च अथवा नीच नाही. ज्याचे कार्य चांगले असेल त्यातच श्रेष्ठत्व प्रदान केले आहे. मानवाच्या जन्म कुळावरून उच्च नीचता ठरत नाही. ईश्वराने अनेक वंशात निरनिराळी वैशिष्टये दिली आहेत. पण त्याचा उच्च, निचत्वाशी काही संबंध नाही. प्रत्येक वंशाची वैशिष्टये फक्त एकमेकांना ओळखण्याची चिन्हेच आहेत.

कुरआनने लोकांना सावध करून एकमेकात प्रेम भाव दृढ करण्याचा आदेशच दिला आहे. एकमेकांच्या जीवावर उडू नका. या पूर्वी बनीइस्त्राईल यहुदी लोकानाही सावध केले होते. जसे -

"याच कारणास्तव आम्ही बनीइस्त्राईल करिता हे फर्मान लिहिले होते की, "ज्याने एखाद्या माणसाला खुनाबद्दल, अथवा पृथ्वीतलावर उपद्रव पसरविण्या व्यतिरिक्त अन्य कारणाने ठार केले तर आणि भूमि वर त्याने जणू सर्व मानवाला ठार केले. आणि ज्याने कोणाला जीवदान दिले, त्याने जणू काही सर्व मानव जातीला जीवन प्रदान केले." परंतु त्यांची अवस्था अशी आहे की, आमचे प्रेषित वरचेवर त्यांच्या पाशी उघड उघड आदेश घेवून आले. तरी सुध्दा ह्यांच्यात मोठ्या संख्येने पृथ्वी वर अतिरेक करणारे लोक आहेत." *सूरह अल् माईदा ५:३२*

जे लोक मानवाच्या सुखाच्या केवळ गप्पा मारतात, त्यांनी आता सावध झाले पाहिजे. कारण त्याची (ईश्वराची) शिक्षा फार कडक आहे.

१७) क्षमा भाव

क्षमा हे मानवाचे भूषण आहे. त्यामुळे सर्व दुर्गूण झाकले जातात. परंतु क्षमेचे भूषण धारण करण्याची पात्रता फार थोड्या लोकात दिसून येते. कारण ती मानवाच्या अंत:करणात वास करत असते. अशा परिस्थितीत क्षमेची भावना निर्माण होणे कठीणच असते. मानवाच्या मानसिक शक्तिच्या समुद्र मंथनातून क्षमेचा जन्म होतो. या मंथनातून फार कमी मानव यशस्वी होतात. जे यात यशस्वी होऊ शकत नाहीत. त्यांचा या मंथनात नि:पात होतो. शक्तिचा गर्व काळा सर्पच जणू गर्वाने मानव काळ्या सर्पापेक्षा जास्त भयानक होतो. या साठी क्षमेला, क्षमारूपी आभूषणाचा स्वीकार करण्याचा संदेश कुरआनने दिला आहे.

"हे नबी ! त्यांचे अपराध माफ करा. त्यांच्या साठी क्षमेची प्रार्थना करा."

सूरह आलि इमरान ३:१५९

"हे पैगंबर (स.) ! मृदुता आणि क्षयाशीलतेचा अंगिकार करा. भले पणाचे उद्‌बोधन देत राहा. आणि आडाण्याशी विवाद टाळा."

सूरह अल् आअराफ ७:१९९

कुरआनने प्रेषित (स.) यांच्या माध्यामातुन मानव जातीस क्षमा करण्याचे आवाहन केले आहे. कोणी अशी शंका घेईल की, प्रेषित (स.) क्षमाशील नव्हते कां ? नाही ! तसे कदापि नाही ! प्रेषित तर क्षमा व सौजन्याचे मूर्तिमंत प्रतिक होते. आपणास ती गोष्ट माहित असेलच !

ज्या मक्केकरांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांचा तेरा वर्ष अनन्वित छळ केला, एवढेच नव्हे तर त्यांना मातृभूमी सोडण्यास विवश केले. परंतु प्रेषित (स.) यांनी जेव्हा मक्का विजय मिळविला, तेव्हा सर्वांना अभयदान दिले. क्षमा केली. तसेच त्या युहुद्यांची कथा प्रसिध्द आहे. जो प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या द्वेषाने

आंधळा होऊन, झोपले असता, नागवी तलावर घेऊन त्यांच्या उशाजवळ उभा राहिला.परंतु त्याचेच भीतिने हात कापू लागले व त्याच्या हातातील तलवार खाली पडली. तलवारीच्या आवाजाने प्रेषित (स्व.) जागे झाले. त्यांनी खाली पडलेली तलवार उचलून घेतली. आता तलवार प्रेषितांच्या(स्व.) हातात होती. त्यांच्या मनात असते तर त्याच तलवारीने मारेकऱ्याचा वध करू शकले असते. प्रेषितांनी त्या मारेकऱ्यास क्षमाच केली. फलतः त्या मोरकऱ्याने प्रेषितांच्या पायावर लोळण घेतली. अशा प्रकारे प्रेषितही क्षमेच्या आभूषणाने अलंकृत झाले होते.

थोडक्यात कुरआनने प्रेषित (स.) यांच्या माध्यमातून क्षमेचा स्वीकार करण्याचा सर्व मानवास, उपदेश केला आहे.

''एक चांगला शब्द, आणि क्षमापूर्ण वर्तन त्या दान पुण्या पेक्षा श्रेष्ठ आहे. (जे दान घेण्याऱ्यावर उपकार केले असे दर्शवून याचकास दुःखी करतात.)''

सूरह अल् बकरा २: २६३

''जे कोणत्याही स्थितीत आपली संपत्ती खर्च करतात. मग ते बिकट स्थितीत असोत वा चांगल्या स्थितीत.जे राग गिळून टाकतात. व दुसऱ्याचे अपराध माफ करतात. असे सदाचारी लोक अल्लाहला प्रिय आहेत.''

सूरह आलि इमरान ३:१३४

''वाईट कृत्याचा बदला तेवढ्याच प्रमाणात आहे. मग जो कोणी माफ करील, आणि सुधारणा करील. त्याचा मोबदला अल्लाहकडे आहे. अल्लाह अत्याचाऱ्याला पसंद करीत नाही.'' *सूरह अशशूरा ४२:४०*

१८) शांती मार्ग

शांततेस इस्लामने स्पष्ट पणे अधिक महत्व दिले आहे. खालील आयती वरून आपल्या लक्षात येईल.

"त्यांच्या पालनकर्त्याजवळ त्यांच्या करिता शांतीचे निवासस्थान आहे. आणि तो त्यांचा संरक्षक आहे. हे त्याच्या कर्माचे फळ आहे."

सूरह अल् अन्आम ६:१२७

"तुम्हावर कृपा आहे. तुम्ही जगात ज्या प्रकारे संयम पाळला." तर किती छान आहे हे परलोकाचे घर." *सूरह अर्रअह १३:२४*

"आणि हे पैगंबर (स.) जर शत्रूचा कल, तह व शांततेकडे असेल तर तुम्ही देखील त्या साठी तयार व्हा. आणि अल्लाहवर विश्वास ठेवा. तो सर्वकाही ऐकणारा व जाणणारा आहे." *सूरह अल् अन्फाल ८:६१*

"कृपावंताचे (अस्सल) दास ते आहेत. जे जमिनीवर नम्रपणे चालतात. आणि अडाणी त्यांच्या तोंडी लागले तर म्हणतात की तुम्हाला सलाम (व पुढे चालू लागतात)." *सूरह अल् फुरकान २५:६३*

"आणि जे लोक आपल्या पालनकर्त्याच्या अवज्ञेपासून अलिप्त राहिले होते. ते जथ्या जथ्याने स्वर्गाकडे नेले जातील. येथ पावेतो की, जेव्हा ते तेथे पोहोचतील. आणि त्याची दारे अगोदरच उघडली गेली असतील. तेव्हा त्याचे व्यवस्थापक त्यांना म्हणतील की, "सलाम असो तुमच्यावर, फारच चांगले राहिलात. तुम्ही दाखल व्हा आत नेहमीसाठी." *सूरह अज़्ज़ुमर ३९:७३*

"अल्लाहने इच्छिले असते तर, त्यांना तुमच्यावर लादले असते. आणि ते देखील तुमच्याशी लढले असते. म्हणून जर ते तुमच्या पासून अलिप्त झाले.

आणि लढाईपासून दूर राहिले. आणि तुमच्याकडे सलोखा आणि शांतीचा हात पुढे केला तर, त्यांच्या वर हात उचलण्याचा कोणताच मार्ग अल्लाहने तुमच्या साठी ठेवला नाही." सूरह अन् निसा ४:९०

या आयतीत शांतीपूर्वक जीवन व्यतीत करण्याचा आदेश दिला आहे. काही लोक अविचार पूर्वक म्हणतात की, कुरआन युध्द करण्यास प्रोत्साहन देते. हे सत्य असले तरी, युध्द कोणत्या परिस्थितीत करावे या बद्दल मर्यादाही आहेत. युध्द कोणत्या परिस्थितीत करावे या बद्दल स्पष्ट खुलासा केला आहे. जर शत्रुने आपल्या देशावर हल्ला केला तर आम्ही तमाशा पाहत बसू कां ? नाही तसे कदापि होणार नाही, तर आम्ही हातात तलवार घेऊन वीरश्रीने त्याला चारी मुंड्या चीत करू.

सत्य तर हे आहे की, कुरआन ज्या मार्गाकडे अंगुली निर्देश करते, त्या मार्गावर जग चालू लागेल तर लवकरच मानवाला शांती मिळेल.

१९) प्रेम भावना

कुरआनचे मार्गदर्शन खालील प्रमाणे

"आणि त्याच्या संकेत चिन्हापैकी ही आहे की, त्याने तुमच्यासाठी तुमच्या मधून पत्नीं बनविल्या. जेणेकरून तुम्ही त्यांच्या पासून संतोष प्राप्त करावा. आणि तुमच्या दरम्यान प्रेम आणि करुणा उत्पन्न केली. निश्चितच यात बरीच संकेतचिन्हे आहेत, त्या लोकासाठी जे मनन आणि चिंतन करतात."

सूरह अर् रुम ३०:२१

या आयतीत अशी एक गोष्ट सांगितली आहे जिला प्रत्येक माणसाला दररोज सामोरे जावे लागते. (ती आपल्या पत्नी विषयी आहे.) जी तुमच्या मुलांची 'माता' व गृहराज्याची 'महाराणी' असते. (जरा विचार करा) एक अनोळखी मुलगी, जिचा कालपर्यंत आपणाशी कसलाही संबंध नव्हता. ती जोडीदार म्हणून तुमच्या घरी येते. तिचा तुमच्याशी दृढ संपर्क येतो. दोन हृदये आणि ती एक शरीरात धडधडू लागतात. एकमेकासाठी आयुष्य ओवाळून टाकण्याची अनावर इच्छा का निर्माण होते ? यास कुरआन 'ईश्वरीय देणगी' असे म्हणते. ईश्वराने आम्हाला निर्माण करून, कीडा मुंगी प्रमाणे सोडले नाही, तर आमच्यासाठी मानवासाठी एका कुटूंबाची योजना केली. त्या मुळे एक मानव दुसऱ्या मानवासाठी दयेचा व्यवहार करू लागला. कुरआन स्पष्टोक्ती आहे -

"लोक हो ! आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगा, ज्याने तुम्हाला एका जीवापासून निर्माण केले. आणि त्याच जीवापासून त्याची सहचारिणी बनविली. आणि त्या दोघापासून पुष्कळ पुरुष आणि स्त्रिया बनविल्या व जगात पसरविल्या. त्या अल्लाहचे भय बाळगा. ज्याचा वास्ता देऊन आपल्या हक्काची मागणी करता. आणि नातेसंबंध विच्छेद करण्यापासून दूर रहा. खात्री बाळगा की, अल्लाह तुम्हावर लक्ष ठेवून आहे." *सूरह अन् निसा ४:१*

या आयती द्वारे आपणास अशी शिकवण दिली जात आहे की, मानवाने दुसऱ्या मानवाबरोबर प्रेम आणि आपुलकी चे वर्तन करावे. म्हणून जे लोक आपसात फूट पाडतात त्यांना मोठे नुकसान होणार आहे. पाहा -

"आठवण करा, बनी इस्त्राईल कडून आम्ही दृढ वचन घेतले होते की, अल्लाह शिवाय अन्य कुणाचीही भक्ति करू नका. मातापित्याशी, नातेवाईककांशी, अनाथ गोरगरिबांशी चांगले वागा. लोकांना चांगल्या गोष्टी सांगा."

सूरह अल् बकरा २:८२

"आणि लोकांशी तोंड फिरवून बोलू नकोस, पृथ्वीवर ऐटीत (गर्वाने) चालू नकोस. अल्लाह कोणत्याही गर्व करणाऱ्या व्यक्तिस पसंद करीत नाही."

सूरह लुकमान ३१:१८

"लोकहो ! तुम्हाला सांगितले जाईल की, आपल्या बैठकी मध्ये दुसऱ्यांना जागा उपलब्ध करून द्या. तर (त्यांना) जागा द्या. ईश्वर तुमच्या साठी विस्तृत जागा उपलब्ध करून देईल. आणि जेव्हा तुम्हाला सांगितले जाईल की, उठत जा. तर उठा." *सूरह अल् मुजादला ५८:११*

ईश्वराने मानवाला दयेच्या बंधनात बांधून ठेवले आहे. त्यातच मानवाची सफलता (यश) सामावली आहे. वरील आयत हेच स्पष्ट करते. तो समाज अत्यंत कमनशिबी म्हणावा लागेल ज्याने दये ऐवजी क्रूरतेचा स्वीकार केला आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांची महत्ता वर्णन करतांना कुरआन म्हणतो ते (स.) फार दयाळू होते. त्यांच्या रूपाने अल्लाहने मानवासाठी स्वतःची कृपाच मानवाच्या कल्याणासाठी.पाठविली आहे.

२०) अशीही भक्ति, कुरआन आणि कुरआनच

हजरत अब्दुल्ला बिन मुबारक हे आठव्या शतकातले फार मोठे विद्वान होते. त्यांना प्रेषितांची शेकडो वचने (हदीस) स्मरणात होती. चार गुरुजवळ त्यांचे शिक्षण झाले होते. सर्व जगाने त्यांच्या विद्वत्तेला मान्यता दिली होती. त्यांचा मृत्यू इ. स. ७८७ मध्ये झाला. त्यांचे निवासस्थान 'मर्व:' हे होते. त्यांनी त्यांच्या जीवनातील एक अद्‌भूत घटना सांगितली आहे. ती त्यांच्याच भाषेत खाली दिली आहे.

"मी हज केल्यानंतर मदिनेकडे तीर्थदर्शना साठी निघालो होतो. रस्त्यात एक काळी वस्तू दिसली. मी जवळ जाऊन पाहिले की, एक काळी चादर पांघरलेली ती वृध्दा होती. मी तिला सलाम केला तर तिने उत्तर दिले की -

"दयालू पालन कर्त्या कडून 'सलाम' आहे. मी म्हणालो, (कुरआन)

"ईश्वर आपल्यावर कृपा करो. आपण येथे काय करीत आहात."

"ज्याला ईश्वरच चुकीचा मार्ग दाखवेल, त्याला कोण मार्ग दाखविल?" (कुरआन)

मी समजलो वृध्देचा रस्ता चुकला आहे. म्हणून त्यांना विचारले, "कोठे जाऊ इच्छिता?"

त्या म्हणाल्या "ईश्वराची खूप प्रशंशा थोरवी आहे ज्याने एका रात्रीतच, आपल्या प्रेषितांना (स्व.) मक्का ते बैतुल मुकद्दस पर्यंत नेऊन आणले." (कुरआन)

मला वाटले, या वृध्देने हज केले आहे आणि आता बैतुल मुकद्दस ची यात्रा कूर इच्छिते मी त्यांना विचारले.

"तुम्ही येथे किती दिवसापासून थांबला आहात त्या उत्तरल्या, "तीन रात्री पासून" (कुरआन)

मी म्हणालो, "तुमच्या जवळ भोजन सामुग्री दिसत नाही मग जेवणाचे काय ?"

त्या म्हणाल्या, "तोच मला भोजन आणि पाणी देतो" (कुरआन)

मीपुन्हा विचारले, "नमाजसाठी वजू (शुचिर्भूत होणे) कशी करता?"

त्या म्हणाल्या, "जर पाणी नाही मिळाले तर मातीने शुचिर्भूत व्हावे." (कुरआन)

मी म्हणालो, ''माझ्या जवळ जेवण आहे, तुम्हाला आवश्यकता आहे का ?''

''मग रात्र येई पर्यंत रोजा पूर्ण करा.'' त्या म्हणाल्या (कुरआन)

''हा रमजान चा मदिना नाही'' मी म्हणालो.

''जो स्वच्छेने रोजा ठेवतो, तो चांगले करतो. कारण अल्लाह बदला (फळ) देणारा आहे. आणि जाणणारा आहे'' (कुरआन)

त्या म्हणाल्या.

''यात्रेत रोजा तोडला तर चालतो'' मी म्हणालो.

त्या उत्तरल्या, ''तुम्ही रोजे करा. ते तुमच्यासाठी चांगले आहे. जर तुम्हाला हे कळते ?'' (कुरआन)

मला आश्चर्य वाटले. मी म्हणालो, ''तुम्ही माझ्या सारखे सरळ-सहज का बोलत नाही ?''

''तो (ईश्वर) काही बोलत नाही. पण त्याच्या जवळ तत्पर संरक्षक आहेत. (जे प्रत्येक घटना नोंदीत असतात).'' (कुरआन)

''तुम्ही कुठल्या कबिल्याचे'' मी विचारले.

त्या म्हणाल्या, ''ज्या गोष्टीचे तुम्हास ज्ञान नाही, त्याचा विचार करू नका. कारण कान, डोळे व हृदय या सर्वांच्या बाबतीत तुमच्याकडे चौकशी केली जाईल.'' (कुरआन)

त्यावर मी म्हणालो, ''जर तुम्ही म्हणाल तर मी माझ्या उंटनीवर (सांड) बसवून तुमच्या कबिल्यात पोहोचवतो.''

त्या म्हणाल्या, ''तुम्ही जे सत्कृत्य कराल, ते अल्लाह जाणतो'' (कुरआन)

मग मी माझी उंटनी त्या वृध्देपर्यंत नेऊन खाली बसविली त्यावर त्या म्हणाल्या -

''सांगा, हे मुहम्मद ! श्रध्दावंतांना की, त्यांनी आपली नजर खाली करावी.'' (कुरआन)

मी माझी नजर जमिनीकडे वळविली आणि म्हणालो, ''आता स्वार व्हा.''

त्या उंटावर स्वार होत असतांना उंटनी बिथरली त्यावर त्या वृध्देने खालील आयत म्हटली.

"जे काही कष्ट (त्रास) तुला होत आहे, ते तुझ्या कर्माचे फळ आहे."
(कुरआन)

"थोडे थांबा, म्हणजे मी उंटनीला नीट बांधतो." मी म्हणालो.

त्या म्हणाल्या, "आणि आम्ही सुलेमानला समजावून सांगितले."
(कुरआन)

मगमी उंटनीनीट बांधलीआणिम्हणालो, "आताआपणस्वारव्हा."

"ईश्वर किती गुणवान - चांगला आहे ज्याने आमच्या साठी याना सेवक बनविले." (कुरआन)

अब्दुल्ला बिन मुबारक म्हणतात, मी उंटनीचा लगाम धरून गतीने पुढे चालू लागलो" त्यावर त्या म्हणाल्या -

"आपण थोडे हळू चाला आणि थोडे हळू बोला" (कुरआन)

त्या नंतर मी गती कमी केली आणि काव्य (शायरी) म्हणत चालू लागलो. त्यावर त्या म्हणाल्या, "कुरआनतील जे क़ाही येते, ते म्हणा." (कुरआन)

मी त्यांना म्हणालो, "ईश्वराने तुम्हाला चांगुलपणा दिला आहे." त्या म्हणाल्या,

"ही गोष्ट विद्वान माणसेच समजू शकतात" (कुरआन)

थोडे मार्गक्रमण केल्यावर मी त्यांना विचारले,

"तुमचे पति जीवंत आहेत काय ?"

"हे श्रध्दावंतांनो असे प्रश्न करू नका आणि ज्याची उत्तरे मिळाल्यावर तुम्ही दु:खी व्हाल" (कुरआन)

आता मी त्या वृध्देच्या बोलण्याने दंग झालो. काहीही विचारले, तर त्या त्याचे उत्तर, कुरआन मधील कुठलीना कुठली, 'आयत' म्हणून देत असत. कुरआनच्या आयती शिवाय त्यांच्या मुखातून अन्य कुठलाही 'चकार शब्द' काढीत नसत. अखेर यातील गूढ काय ? या विचारात मी भूकपणे पण विचार करीत पुढे चालत होतो. तेव्हा कबिल्यातील काहीजण भेटले. त्यांच्याकडे बोट करू मी विचारले.

"हे बुढी माँ ! हे तुमचे कबिलेवाले आहेत. यांच्यापैकी तुम्हास कोण ओळखतो ?"

त्या म्हणाल्या, ''धन आणि संतती हे जगाचे भूषण आहे'' (कुरआन)

माझ्या लक्षात आले, त्यांची मुले या कबिल्यात आहेत. ''त्यांची नावे काय आहेत.'' मी पुन्हा विचारले.

''अल्लाहने इब्राहिमला आपला मित्र बनविले'' (कुरआन)

''अल्लाह मूसा बरोबर बोलले'' (कुरआन)

''हे यह्या, हा ग्रंथ निष्ठेपूर्वक हातात घे'' (कुरआन)

त्या वृध्देच्या मुलांची नावे, इब्राहिम, मूसा व यह्या आहेत हे माझ्या लक्षात आले. मी ती नावे घेऊन हाक मारली. मला आश्चर्य वाटले, चंद्रासमान तेजस्वी चेहऱ्याची तीन मुले माझ्याकडे येत होती.

ती वृध्दा त्या तीन मुलांना उद्देशून म्हणाली-

''तुमच्या पैकी कोणीतरी हे नाणे घेऊन बाजारात जा आणि स्वादिष्ट असे भोजन विकत आणा.'' (कुरआन)

त्या तिघापैकी एक जण उठला आणि भोजन घेऊन परत आला. आणि ताट माझ्या समोर ठेवले. त्यावर ती वृध्दा म्हणाली, ''भूतकाळात जे काही (सेवा) कार्य केले. त्याच्या बदल्यात जे हवे ते खा.'' (कुरआन)

आता मला राहवले नाही. मी अस्वस्थ होऊन म्हणालो,

''लोक हो ! तुमचे जेवण तो पर्यंत घेऊ शकत नाही जो पर्यंत तुम्ही या वृध्देबाबत मला सर्व काही सविस्तर पणे सांगणार नाही. आश्चर्य आहे, त्यांच्या मुखातून कुरआनच्या आयती शिवाय काहीच बाहेर पडत नाही. त्या सर्व प्रश्नांची उत्तरे कुरआनच्या आयती द्वारेच देतात. दुसरे काही त्या बोलतच नाहीत हे कसे ?

मुलांनी सांगितले की, ''त्या आमच्या आई आहेत. चाळीस वर्षापासून कुरआनतील आयती शिवाय त्या काही बोलत नाहीत. कारण त्या ईश्वराच्या नाराजीस फार भितात. त्यांना अशी भीति वाटते की, त्यांच्या तोंडातून एखादी अशी गोष्ट निघू नये, ज्या मुळे अल्लाह नाराज होईल.''

ते ऐकून मी अत्यंत आश्चर्य चकित झालो, कारण आजपर्यंत मी एवढी विद्वत्ता असलेला विद्वान पाहिला नव्हता.

दुसरा भाग

२१) विश्वासाच्या शीतल छायेत

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे निधन होताच, इस्लामी जगतात एकच खळबळ माजली. अनेक टोळ्यांनी इस्लामचा त्याग केला. अनेकांच्या श्रध्दा डळमळू लागल्या. ज्यांनी फक्त तेवीस वर्षात अरबी जगाचे रूप परिवर्तन केले, डाकू आणि चोरांना ईश्वर परायण बनविले, गुराखी आणि शेतकऱ्यांना बादशहा बनविले, गर्विष्ठांच्या गर्वाचे हरण केले, अत्याचाऱ्यांना न्यायाची शिकवण दिली व व्यभिचार करणाऱ्यांचे वर्तन सुधारले. अशा व्यक्तिचे निधन कसे होऊ शकते ? यावर भोळ्या मुसिलमांना विश्वास ठेवणे अवघड वाटू लागले. हजरत उमर (र.) यांचाही प्रेषित (स.) मृत्यूवर विश्वास बसला नाही. लक्षात घ्या की स्वतः प्रेषितांनी हजरत उमर (र.) यांचा महामानव म्हणून गौरव केला होता. ते (उमर) ज्या रस्त्याने जातात, त्या रस्त्यावर सैतानही फिरकत नसत. ते त्यांना टाळून दुसऱ्या रस्त्याने जात. असे ज्ञानी उमर (र.) सुध्दा प्रेषितांचा मृत्यू होऊ शकतो, हे मानावयास तयार नव्हते. त्यांच्या दृष्टीने प्रेषितांचा मृत्यू म्हणजे चमत्कारच वाटत होता.

हजरत उमर (र.) हातात चमकती तलवार घेऊन बाहेर आले. ''प्रेषित (स.) मृत्यू पावू शकत नाहीत. तसे जे म्हणतील, त्यांचे मी या तलवारीने तुकडे तुकडे करीन असे म्हणू लागले.

त्या वेळी अशीच एक व्यक्ति उभी राहते. त्या व्यक्तिला पूरेपूर विश्वास होता की, मदिनेतील मुसलमान कधी अश्रध्द होणार नाहीत. त्याला हजरत उमर (र.) यांचीही भीति वाटत नव्हती वा त्यांच्या तलवारीची. त्याचा पुरेपूर विश्वास होता की, त्याने ज्या ईश्वरावर श्रध्दा ठेवली आहे व जो सर्वव्यापी आहे, तो त्याची रक्षा करेलच करेल. म्हणून प्रेषित (स.) यांच्या विरहाने व्याकूळ व संतापदग्ध

झालेल्या उमर (र.) नावाच्या भयंकर गर्जना करणाऱ्या समुद्रा समोर उभे राहून तो जाहीर पणे बोलू लागला -

"हे लोकहो ! जे हजरत मुहम्मद (स.) यांच्यावर श्रध्दा ठेवतात त्यांनी ऐकावे. आज प्रेषित मुहम्मद (स.) यांचे निधन झाले आहे. आणि जे ईश्वरावर श्रध्दा ठेवतात, ते जीवंतच असतात. त्यांना मृत्यू नामशेष करीत नाही. असे म्हणून त्याने कुरआनची खालील आयत म्हणण्यास सुरूवात केली.

"मुहम्मद (स.) या शिवाय काही नाहीत की ते केवळ एक प्रेषित आहेत. त्यांच्या पूर्वी इतर प्रेषित देखील होऊन गेले आहेत. मग काय जर ते मरण पावले अथवा त्यांना ठार केले गेले तर तुम्ही लोक मागच्या पावली परताल ? लक्षात ठेवा ! जे परत फिरले ते अल्लाहचे काहीही नुकसान करू शकणार नाहीत. परंतु जे अल्लाहचे दास बनून राहतील, तो त्यांना त्याचा मोबदला देईल." *सूरह आलि इमरान ३:१४४*

वरील घोषणा जाहीरपणे करणारे कोण होते, माहित आहे ? ते होते अबू बकर (र.) त्यांची घोषणा व कुरआनची आयत ऐकताच, हजरत उमर (र.) यांनी आपली तलवार म्यान केली. हजरत उमर (र.) म्हणाले की, "ही आयत मी किती तरी वेळा ऐकली, परंतु आज मात्र ही आयत, आत्ताच अल्लाहकडून अवतरली आहे. असे मला वाटू लागले आहे."

ही होती अबू बकरची निष्ठा. आता अशा श्रध्दावंता सारख्या माणसांची या जगात टंचाई निर्माण झाली आहे काय ?

२२) इतिहासाची सोनेरी पाने

हजरत अबू बकर (र.) यांनी दोन वर्ष व काही महिने खलिफाचे काम केले. त्या नंतर त्यांचे निधन झाले. तरीही या छोट्या कालावधीत पुन्हा संपूर्ण अरबस्थान इस्लामचे अनुयायी बनले. या छोट्याशा काळात त्यांनी केलेली सेवा अत्यंत बहुमूल्य ठरली. जेव्हा त्यांच्या नंतर हजरत उमर (र.) इस्लामचे खलीफा बनले तेव्हा सर्व प्रकारच्या संकटापासून देश मुक्त झाला होता. देशात शांती आणि समाधान पसरले होते. त्या मुळे हजरत उमर (र.) यांना अरबस्थाना बाहेरच्या समस्यावर मात करता आली.

हजरत उमर (र.) मूळचेच साहसी आणि वीर होते. हजरत उमर (र.) साहस आणि शौर्य यांचे मूर्तिमंत प्रतिक मानले जात होते. त्यांनी ईस्लमवर श्रध्दा जाहीर केल्या नंतर इस्लामला भरभक्क म शक्ति प्राप्त झाली. शत्रू फक्त पाहतच राहिले.

अशा स्वाभाविक वीरतापूर्ण स्थितीत उमर (र.) खलीफा बनले आणि खुत्बा देण्यासाठी व्यासपीठावर (मिंबर वर) चढले. ईश्वराची प्रशंसा व प्रेषित (स.) यांना सलाम करून खुत्बा द्यावयास सुरूवात केली.

''लोक हो ! तुम्ही माझ्या खांद्यावर शासनाचे जे ओझे ठेवले आहे, त्याला पूर्ण करण्याची मी पराकाष्टा करीन. तुम्हा सर्वांना मी प्रार्थना करतो की, जेव्हा मी तुम्हास योग्य हुकूम देईन तेव्हा तो तुम्ही पाळा.

हजरत उमरचे बोलणे पूर्ण होण्या पूर्वीच एका कोपऱ्यातून एक म्हातारी उठून उभी राहिली आणि म्हणाली,

''हे उमर, तू हा अंगावर असलेला कुर्ता (शर्ट सदृष्य) कसा बनवला ते सांगणार नाहीस तो पर्यंत तुझे म्हणणे आम्ही ऐकणार नाही. कारण लुटीच्या मालात जेवढे कापड सर्वांच्या वाट्यास आले, त्यात कुर्ता बनू शकत नव्हता.''

हे म्हातारीचे परखड बोल ऐकताच मशिदीत एक निरव शांतता पसरली. लोकांच्या मनात तर्क वितर्क सुरु झाले. सर्वांना हे माहित होते की उमर हे फार क्रोधिष्ट आहेत. आता म्हतारीचे कांही खरे नाही, असे सर्वांना वाटू लागले.

परंतु लोकांच्या सर्व शंका कुशंका चूकींच्या निघाल्या. आता हजरत उमर (र.) पूर्वीचे रागीट उमर नव्हते. ते आता शासक आणि संरक्षक होते. त्यांना आता इस्लामी 'बैतुल माल' (खजिना) मधील एका एका पैशाचा दोन ठिकाणी

हिशोब द्यावा लागणार होता. त्यात एकदा जनतेसमोर व दुसऱ्या वेळी ईश्वरा समोर जो सर्वांचा पालनकर्ता आहे. हजरत उमर (र.) हे काही विसाव्या शतकातले राष्ट्रपती किंवा प्रधानमंत्री नव्हते, जे खुर्ची मिळताच सर्व काही विसरून जातील. यांना जनतेचा धाक आणि अल्लाहचे भय याचा विसर पडतो. हजरत उमर (र.) हे असे शासक होते की, ज्यांना या जीवना पेक्षा शाश्वत जीवनाची चिंता होती. त्या शाश्वत जीवनासाठी या जगातील धन दौलत त्यांच्या उपयोगी पडणार नाही. तर त्यांचे नेक काम, सचोटी आणि प्राणी मात्रावर केलेली दयाच फक्त उपयोगी पडेल. यावर दृढ विश्वास होता. हजरत उमर (र.) यांचा ईश्वरावर अत्यंत विश्वास होता जो सर्व साक्षी आहे.त्याच्या पासून एक कण मात्रही गोष्ट लपून राहत नाही. म्हणून हजरत उमर (र.) त्या म्हातारीच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी थांबले. त्यांनी जाहीर केले की, त्या म्हातारीच्या प्रश्चाचे उत्तर माझा मुलगा 'अब्दुल्ला' देईल.

हजरत अब्दुल्ला उठून उभे राहिले. ते म्हणाले, "लोकहो ! लूटीच्या कापडा पैकी जो हिस्सा माझ्या वडिलांना मिळाला होता. तो त्यांच्या कुर्त्यासाठी कमी पडत होता. म्हणून माझ्या वाटणीचा हिस्सा मी वडिलांना दिला. त्यांनी दोन्ही हिश्शाच्या कापडापासून कुर्ता तयार केला."

हजरत अब्दुलांचा खुलासा ऐकताच 'अल्लाहो अकबरचा' नारा मशिदीत निनादला. म्हातारीही भीतिने गारठून गेली. परंतु हजरत उमर (र.) यांनी तिला अभय दिले. उलट त्यांनी तिच्या धाडसा बद्दल कौतुक केले व तिने प्रश्न विचारल्या बद्दल त्यांना झालेला आनंद त्यांनी प्रकट केला. ते म्हणाले -

"जो पर्यंत मुस्लिमात असले लोक (निर्भिड) जीवित आहेत, तो पर्यंत उम्मत (मुस्लिम समाज) कल्याणकारी रस्त्यानेच जाईल." तसेच ते असेही म्हणाले की,

"माझ्या कडून काही चुकीचे वर्तन होत असल्यास तुम्ही मला जाणीव करून द्या म्हणजे मी ही मार्गभ्रष्ट होणार नाही."

असे होते मुस्लिमांचे दुसरे खलिफा हजरत उमर (र.) त्यांच्या ताब्यात 'कैसर' आणि 'किसरा' यांचा अमाप खजिना होता. परंतु त्यातील एक पैसाही त्यांनी कधी स्वत:साठी खर्च केला नाही. जो सर्वांबरोबर मिळेल तेवढ्याचाच त्यांनी स्वीकार केला. हीच इस्लामची आदर्श शिकवण आहे ज्यामध्ये राजा आणि प्रजा यात कसलेच अंतर नव्हते.

हे आपण समजून घेणार कां ?

२३) कुरआन आणि मार्गदर्शन

चौदाव्या शतकातील 'कुरआन' आज विसाव्या शतकात आमचे कसे मार्गदर्शन करू शकेल ? असा प्रश्न वारंवार विचारला जातो. असे म्हणणारे बहुसंख्येने आमचे मुस्लिमेतर बंधू आहेत. त्यात त्यांची चूक नाही. कारण त्यांना कुरआनची वास्तविकता काय आहे, हेच मुळी माहित नाही. कारण त्यांनी कुरआनचे अध्ययन केलेले नसते.

याचा संपूर्ण दोष स्वतःला कुरआनचा अनुयायी समजणाऱ्यांचा आहे. आम्ही त्यांना विचारू इच्छितो की, त्यांनी कुरआनचा उपदेश मुस्लिमेतर बांधवांपर्यंत कां पोहचवला नाही. इस्लामच्या अनुयायींनी कुरआनला खाजगी मालमत्ता समजली आहे काय ? ही त्यांची चूक झाली आहे तिचा ते स्वीकार करोत अथवा न करोत.

पण जेव्हा कुरआनचे अनुयायीच म्हणू लागतात की, 'चौदाव्या शतकातील कुरआन' विसाव्या शतकात आम्हाला कसे मार्गदर्शन करणार ? तेव्हा माझ्या मनाला अत्यंत आश्चर्य वाटते. मन अस्वस्थ होते, 'अरे ! कुरआन त्याच्या अनुयायांनाच किती अनोळखी आहे ? किती दुर्लक्षित आहे ? आम्ही किती असमर्थ आहोत ?'

कोणी आजारी पडले तर कुरआनातील काही भाग वाचून आजाऱ्यावर फुंकावे, कोणी मृत झाला तर, त्याच्या कबरेवर काही कुरआनचा भाग वाचावा, व नमाज साठी उभे राहिलो असता काही आयती म्हणाव्यात, एवढाच कुरआनचा उपयोग शिल्लक राहिला आहे काय ? जे कुरआन, सर्व जगाला शांतीचा संदेश देण्यासाठी, जीवनासाठी पूर्णपणे सुयोग्य तसेच कायदानीति देण्यासाठी मानवाला त्या द्वारे परिपूर्ण करण्यासाठी अवतरले आहे. त्याचा उपयोग आम्ही फक्त 'फाकफूक' करण्यासाठी वापरत आहोत, हे पाहून मनाला तीव्र वेदना होतात.

'अरेरे ! या पेक्षा मोठा जुलूम कुरआनवर आणखी असू शकेल काय?'

असे म्हणणारे काही निर्बुध्द मुसलमानच आहेत असे नव्हे, तर

चांगले शिकले सवरलेले, डॉक्टर वकीलही, अडाणी मुस्लिमांची 'री' ओढतांना पाहून, अत्यंत वाईट वाटते.

या वर जेव्हा आम्ही विचार करू लागतो तेव्हा, लक्षात येते की हे लोक कुरआनपासून शेकडो मैल दूर आहेत. त्यांनी कधी कुरआन वाचलेच नाही. त्यांच्यात आणि अडाणी शेतकऱ्यात काही फरक नाही. त्यांनी कुरआनची एकही आयत वाचली नाही. मग त्याचा अर्थ तरी कसा समजेल ? आणि हे लोक जे बोलतात ते त्यांचे स्वतःचे मत नसते तर जे कुरआन विरोधक असतात, त्याच्याच भाषेत ते बोलत असतात, जे नेहमी कुरआनवर टीका करीत असतात. ही टीकाकर मंडळी जेव्हा अमेरिका आणि लंडन येथे जातात, तेव्हा तेथील ख्रिश्चन धर्माच्या लोकांचे कुरआनवरील आरोप ऐकतात. त्यांने ते प्रभावित होतात. त्यांचेही खरे आहे म्हणा, कारण त्यांच्या कडून या लोकांना डाक्टरेट आणि वकिलीची प्रमाण पत्रे मिळणार असतात.

त्यासाठी आम्ही त्या लोकांना विनंती करू इच्छितो की, त्यांनी प्रथम स्वतः कुरआन समजून घ्यावे. कारण कोणताही धर्म समजून घेतांना स्वतः त्याचे सखोल अध्ययन विद्वानांच्या मदतीने करणे जरूर असते. धर्म समजून घेतल्या नंतर आरोप करणाऱ्यांच्या आरोपाचा खरे खोटे पणा तपासून पाहता येईल. ते किती खरे आणि किती खोटे बोलतात हे नंतर कळेल.

उदाहरणार्थ जर कोणी 'वेद' समजून घेण्यासाठी कोण्या पादरीकडे अथवा अरबी जाणणाऱ्या विद्वानाकडे गेला तर ते त्याला वेद समजावून सांगणे केव्हाही अशक्यच आहे. त्याच प्रमाणे कुरआन समजून घेण्यासाठी कोणा अरबी विद्वानाची मदत घ्यावी लागेल जो त्याचा अर्थ तुम्हास समजावून सांगू शकेल. मग आपल्या लक्षात येईल की, कुरआन या विसाव्या शतकातही शांतीचा संदेश देत आहे. आम्हाला आशा आहे की, आमचे बंधू या विनंतीस मान देतील. आणि कुरआनच्या मूळ शिकवणीस समजून घेतील.

२४) हजरत उमर (र.) आणि म्हातारी

''हे आई ! तुम्ही माझ्याकडे खलीफा म्हणून पाहू नका. मी तुमचा सेवक आहे. तुमची प्रत्येक गरज भागविली जाईल. मला खलीफा या साठी बनविले गेले नाही की मी माझ्या स्वतःच्या सुखसमाधानासाठी चैनीची साधने एकत्र करावीत. मला तर दुसऱ्यांना सुख देण्यासाठी खलीफा बनवले आहे. तुम्हाला कोणती गरज आहे ? तुमची प्रत्येक गरज पूर्ण केली जाईल.''

हजरत उमर (र.) यांनी त्यांच्या खजीनदाराला पत्र लिहून ते त्या म्हाताऱ्या बाई जवळ दिले. त्यात त्यांनी त्या म्हाताऱ्या बाईच्या सर्व गरजा पूर्ण करण्याचे आदेश दिले होते.

'दमिश्क' ईद निमित्त सजवले जात होते. नवे रंगीबेरंगी कपडे घालून मुले शहरातील बाजारात हुंदडत आनंदाने फिरत होती. चोहोकडे गडबड उडाली होती. लोकांचे चेहरे आनंदाने फुलून गेले होते. दमिश्कला कुरआन मध्ये वर्णिलेल्या स्वर्गाचे स्वरुप आले होते.

सकाळी सकाळीच नमाज पढण्यासाठी लोकांची 'इदगाह' कडे रीघ लागली होती. रंगी बेरंगी कपड्यातील लोकांची हालचाल पाहून सकाळी सकाळी रंगीबेरंगी फुलांची बाग वाऱ्याच्या झुळकीवर हेलकावल्या सारखे वाटत होते. सर्व वातावरण सुगंधमय झाले होते. आणि लोक अल्लाहच्या कृपेच्या मस्तीत चालतांना दिसत होते.

अमीरूल मोमीनीन हजरत उमर (र.) आपल्या मुलाबाळांच्या समवेत ईदगाह कडे चालले होते. इदगाहकडे निघालेले अन्य लोक व हजरत उमर (र.) यांच्यात फार फरक होता. तो असा की, हजरत उमरचा कुर्ता जुना आणि अनेक ढिगळे लावलेला होता. मुले मात्र त्यांच्या नेहमीच्या शाळेच्या पोषाखात होती.

असे होते, आठव्या शतकातील महान सम्राट अमीरूल मोमीन हजरत उमर (र.) शासक जेवढा मोठा होत जातो तसे त्याचे कर्तव्य व जबाबदाऱ्या वाढत जातात. आणि तो ईश्वरा समक्ष आपल्या कृत्याला जबाबदार असतो.

आज आमच्या समोर मुख्य समस्या अशी उभी राहिली आहे की आपल्या सभोवती लूटमार चालू आहे. ती दूर करण्याचा एकमेव उपाय हा आहे की, लोकांच्या मनांत ईश्वराचे भय निर्माण होणे आवश्यक आहे. तसे ते निर्माण केले पाहिजे. त्याला ईश्वरा समोर एकेका पैशाचा हिशोब द्यावयाचा आहे. ही जाणीव लोकांच्या मनात जागी करणे आवश्यक आहे.

२५) हजरत उमर (र.) आणि पिठाची पोती

एका अंधाऱ्या रात्रीची ही कथा आहे. हजरत उमर (र.) नेहमीच्या प्रथे प्रमाणे मदिनेमध्ये फिरत निघाले होते. त्याच्या सोबत त्याचा गुलाम 'अस्लम' हा ही होता. दूर कोठेतरी जळती शेकोटी दिसली. ती आग पाहून हजरत उमर (र.) अस्लमला म्हणाले, "रात्री एखादा काफिला तेथे उतरल्या सारखा दिसतो. चला तेथे जाऊन त्यांना काही अडचणी आहेत का ते पाहू."

हजरत उमर (र.) आणि अस्लम तेथे जाऊन पाहतात तो काय ? तेथे एक स्त्री आणि अनेक मुले होती. मुले जोर जोराने रडत होती आणि विस्तवा वर एक मडके ठेवले होते.

खलीफा जवळ आले. त्यांनी नम्रपणे विचारले, "मी आत येऊ शकतो का ?"

त्या वर ती स्त्री म्हणाली, "चांगल्या हेतुने येणार असाल, तर या."

खलीफा आणि अस्लम त्यांच्या जवळ गेले. "तुम्ही येथे काय करीत आहात." हजरत उमर (र.) यांनी विचारले. ती स्त्री म्हणाली, "आमचा काफिला पुढे निघून गेला आहे. म्हणून आम्ही रात्री येथे मुक्काम केला आहे."

"परंतु मुले का रडत आहेत ?" हजरत उमर (र.) म्हणाले "भूखे मुळे ती रडत आहेत." ती स्त्री म्हणाली, "या हंडीत काय शिजत आहे ?" उमरनी पुन्हा विचारले.

"कुठले काय ? तीत फक्त पाणी आहे. मुले हंडीत काहीतरी शिजत आहे या भ्रमाने गप्प बसून हळू हळू झोपी जातील. मात्र मी ईश्वराजवळ तक्रार करून त्या उमरचा बदला घेईन." ती स्त्री बैतागाने म्हणाली.

"परंतु तुमची ही अवस्था उमरला कशी ठावूक होणार ?" उमर (र.) यांनी विचारले.

"इतका बे खबर खलिफा आम्हाला कसा चालेल. त्याला सर्वांची खबर असणे आवश्यक नाही कां ?"

त्या नंतर हजरत उमर (र.) अस्लम गडबडीने म्हणाले, चल लवकर. ते धावत पळत राज्याच्या बैतुलमालच्या गोदामा मध्ये दाखल झाले. तेथे हजरत उमरनी एक पोते आटा-पीठ आणि खाण्यापिण्याचे अन्य साहित्य गाठोड्यात बांधले. ते अस्लम म्हणाले, "हे उचलून माझ्या डोक्यावर ठेवण्यास मदत कर."

त्यावर अस्लम म्हणाले, "नाही, अमिरुल मोमीन ! हे ओझे तर मी माझ्या शिरावर घेईन." त्यावर उमर म्हणाले, "अरे अस्लम, तू कयामतच्या दिवशी माझ्या गुन्ह्याचे ओझे उचलणार आहेस कां ? म्हणून माझ्या शिरावर हे ओझे उचलून दे."

त्या नंतर दोघे पळत निघाले. ते दृष्य मोठे विलोभनीय होते. एका मोठ्या इस्लामी राज्यांचा सम्राट डोक्यावर ओझे घेऊन पुढे पळत आहे. आणि त्यांचा सेवक रिकाम्या हाती, त्यांच्या मागे पळत आहे.

दोघे त्या स्त्री-मुलाजवळ आले, हजरत उमर (र.) यांनी पिठाचे पोते खाली ठेवले व हंडीत कालावणाचे साहित्य टाकले. ती स्त्री स्वयंपाकासाठी पुढे आली. तिला थांबवून हजरत उमर (र.) म्हणाले, "ईश्वराच्या बंधू भगिनी, तुम्ही दूर सरका. मी स्वतः स्वयंपाक करून तुम्हाला भोजन करवणार आहे." असे म्हणून त्यांनी पीठ मळले. चूलीत फुंकर घातली. चोहोकडे धूरच धूर झाला होता. हे सर्व अस्लम पाहत होते. ते म्हणतात -

"मी माझ्या डोळ्यांनी पाहिले, हजरतच्या डोळ्यात धुरामुळे पाणी आले होते. त्याच्या दाढीतून जणू धूर निघत होता. स्वयंपाक झाल्यावर ते म्हणाले. "आता मुलांना वाढा." जेव्हा मुले पोटभर जेवली. तेव्हा ते जावयास उठले अस्लम त्यांच्या बरोबर उठले.

ती स्त्री आशिर्वाद देत म्हणाली, ''ईश्वर तुमचे कल्याण करो. उमर (र.) ऐवजी तुम्हीच खलीफा होण्यास अधिक पात्र आहात.''

त्यावर हजरत उमर (र.) म्हणाले, ''असो, काही बिघडले नाही. तुम्ही जेव्हा सकाळी अमिरुल मोमीनच्या दरबारात जाल, तेव्हा मी तिथेच असेन'' असे म्हणून ते पळतच परत फिरले. आपण पाहिले आहेच की हजरत उमर (र.) व अस्लम जबाबदारी न पाडल्यामुळे अल्लाहच्या भीतिने ते पळत गेले होते. या वेळी मात्र त्यांच्या मनात खुशी-आनंद होता. कारण फार मोठी जबाबदारी त्यांनी पार पाडली होती.

असे होते इस्लामी राज्याचे सम्राट हजरत उमर (र.) त्यांच्या जीवनातील या घटना आमच्या समस्यांचे निराकरण कर्णार नाहीत काय ? होय, त्यांच्या चरित्राच्या मार्गदर्शनाने आमच्या सर्व समस्या नक्कीच सोडविल्या जातील. परंतु आज स्वत:च्या पायापुरते पाहण्याची वृत्ती व स्वार्थलोलुपतेने आम्हास आंधळे केले आहे. आमच्या स्वत:च्या सुखापुढे आम्हास दुसऱ्याच्या सुखाची पर्वा नाही. आम्हाला तर आत्मतुष्टी तच आमचे सौख्य सामावले आहे असे वाटते. आम्हाला स्वर्ग मिळाला की बस्स ! दुसरे नरकात जाईनात. आम्हाला काय त्याचे !

अशीच वृत्ती आज आमच्या शासकांची आहे. इस्लामी तत्वज्ञान-कुरआन याच गोष्टीचे प्रथम खंडन करू इच्छिते. आणि त्या साठी आम्ही पुन्हा सातव्या शतकाचे विचार अमलात आणले तर, आमच्या समस्यांचे निराकरण होईल असे वाटते.

२६) हजरत उमर (र.) आणि भेसळीचे दूध

ती रात्र अंधारी होती. चोहोकडे नीरव शांतात पसरली होती. एका हातावरचे ही दिसत नव्हते. एक एक पाऊल पुढे टाकणे कठीण जात होते. त्यात भर म्हणून रस्त्यावर काटेकुटे व लहान झुडुपांची दाटी झालेली. त्यात पावले अडखळत होती. विचार करूनच पावले टाकावी लागत होती.

त्या काळी रस्त्यात विजेचे खांब नव्हते की, सिमेंटचे रस्ते नव्हते. फुटपाथही नव्हते रस्त्यावर गस्त घालणारे. पहारेकरी अथवा रक्षकही नव्हते. तेथे सदैव संकटाशी सामना करावा लागत असे. हां ! पण, एक गोष्ट मात्र तेथे प्रकर्षाने जाणवत होती. त्या वेळच्या लोकांच्या हृदयात इस्लामचा दिव्य प्रकाश भरून राहिला होता.

अशा निर्जन व निरव सडकेवरून हजरत उमर (र.) मदिनेच्या रस्त्यातून एकटेच फिरत होते. जेव्हा पासून ते खलिफा म्हणून निवडले गेले होते. तेव्हा पासून त्यांनी रात्रीची सोय आणि आराम यांचा त्याग केला होता. काही वेळ ते ईश्वराची प्रार्थना करीत व ईश्वराजवळ आशिर्वाद मागत. त्या नंतर उरलेला वेळ जनतेच्या सेवेत व्यतीत करीत. जेणे करून दिवसभर श्रम करून थकलेल्या जनतेस रात्री विश्रींती मिळेल.

त्या अंधाऱ्या रात्रीची ही घटना आहे. हजरत उमर नेहमी प्रमाणे मदिनेच्या गल्लीबोळात फिरत होते. अचानक एका घरातून काही आवाज ऐकू येऊ लागले. त्यांना वाटले कोणीतरी उपाशी असावे, त्या मुळे त्याला झोप येत नसावी. असा विचार करून त्या माणसाची चौकशी करावी व त्यास मदत करावी, या हेतुने, त्या माणसाच्या दारात जाऊन उभे राहिले.

आतून बोलण्याचे आवाज येवू लागले. एक म्हातारी बोलत असावी. हजरत लक्षपूर्वक ऐकू लागले.

''बेटी, दुधात थोडे पाणी घाल. म्हणजे सकाळी अधिक पैसे मिळतील.''

''नाही आई, असे करण्यास सांगू नका, अमीरूल मोमीन यांनी घोषणा केली आहे की, दुधात पाणी मिसळू नका.''

''अग वेडे ! अमीरुल मोमिनना हे थोडेच कळणार आहे.'' म्हातारी म्हणाली.

"पण आई, अमीरूल मोमिन नाही, पण ईश्वर तर पाहतो आहे ना?" मुलीचा आवाज आला.

हजरत उमर (र.) हा संवाद दरवाज्या बाहेरून ऐकते होते. त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

सकाळ झाली हजरत उमर (र.) यांनी त्या मुलीच्या घरी निरोप पाठवून त्या मुलीचा हात आपल्या मुलासाठी मागितला नकाराचे कारणच नव्हते. काही दिवसातच ती खेडवळ मुलगी हजरत उमर (र.) यांची सून बनून, त्यांच्या घरात आली.

त्या अबोध मुलीने, अमीरूल मोमीनच्या आदेश मोडू नये. अशी शिकवण देणारी कोणती शक्ति होती ? ती शक्ति होती इस्लामच्या सर्वश्रेष्ठ आदेशाची. अल्लाहच्या संविधानाची. इस्लाम स्वीकारल्यावर मनुष्य केवळ मानवाला जबाबदार नसतो. तर त्याला सर्व शक्तिमान पालनकर्त्या ईश्वरासमोर जबाब द्यावा लागतो. कारण त्या सर्व शक्तिमान ईश्वराने आमच्यासाठी मानवासाठी एक परिपूर्ण जीवन व्यवस्था दिली आहे.

आम्ही प्रत्येक दिवशी वर्तमान पत्रात वाचतो की, अमुक मंत्र्याने लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केला. तमक्या पोलीस अधिकाऱ्याने इतकी लाच खाऊन आरोपी सोडून दिला. एका व्यापाऱ्याने करोडो रूपयाच्या सोन्याचे स्मगलिंग केले. सरकार त्यावर नियंत्रण ठेवण्याचा सतत प्रयत्न करते. पण पुन्हा संधी मिळताच लाच खोरी उफाळून येते. म्हणून आम्ही आपणा समोर ईश्वराचे संविधान ठेवीत आहोत. मानवाने त्याचा स्वीकार केल्यास मानवतेचा कायापालट होईल. ती आहे, "ईश्वराची भीति ईशपरायणता"

जसे मनुष्य भर बाजारात दुष्कृत्ये करण्यास घाबरतो. तसा रात्रीच्या अंधारात ईश्वराच्या कापासही तो भितो. आणि ईश्वराचे कोपभाजन होण्यापेक्षा सन्मार्गाने चालणेच पसंद करतो.

असे आहे मुस्लिम संविधान ईश्वराच्या भीतिच्या छायेत मानवतेचा गळा कापला जात नाही. उलट या समाजातील व्यक्ति स्वत: जवळचे सर्व धन नाहीसे झाल्यावरही अध्यात्मिक उच्च आनंदाचा लाभ घेऊ शकते.

लोक विचारतात की, 'हे ईश्वरीय संविधान कोणते? मी म्हणतो मुसलमानांच्या दुर्भाग्याचा हा काळ आहे. काय हे संविधान त्यांच्यात घरात ठेऊन ते त्या प्रमाणे वागत नाहीत. इतिहास साक्षी आहे की जेव्हा या संविधानास (कुरआन व ईश्वरीय मार्गदर्शन) स्वीकारले गेले तेव्हा तेथे स्वर्ग अवतरला.

२७) हजरत उमर (र.) आणि समानता

अमीरुल मोमीन विश्रांती गृहात विश्रांती घेत होते. गस्सानचा शेवटचा बादशहा आपल्या अगंरक्षक सह मदिनेत आला. जरी त्याने इस्लाम स्वीकारला होता, तरी त्याचा बादशाही थाटमाट कमी झाला नव्हता. त्याने हिऱ्यामोत्याचे दागदागिने अंगभर परिधान केले होते. रत्नजडित मुकुट डोक्यावर धारण केला होता. जमीनीवर मागे लोळणारा लांब कुर्ता. पुढे मागे रक्षकांचा समूह, जसा कोणी विजयी बादशहा पराजित भूमित प्रवेश करीत होता.

त्याने येताच हजरत उमर (र.) यांना सलाम केला. आणि इस्लामवर निष्ठा असल्याचे जाहीर केले. त्या नंतर त्याने तीन दिवस मदिनेत मुक्काम केला. त्यानंतर हजरत उमर (र.) यांची परवानगी घेऊन मक्केकडे प्रयाण केले.

तेथे गेल्यावर तो काबागृहाकडे प्रार्थनेसाठी गेला. प्रथेप्रमाणे त्याने काबागृंहाची परिक्रमा सुरू केली. मागे सदरा लोळत होता. त्याच्यां मागून येणाऱ्या एका मागासवर्गीय मगासलेल्या 'बद्दू' (गावंढळ) जातीच्या इसमाचा पाय त्याच्या झग्याच्या मागे लोंबणाऱ्या भागावर पडला. गस्सानच्या बादशहाला हा अपमान वाटला. त्याने गर्वाने त्या बद्दूला एक चापट लगावली.

बद्दू इसमास आपली चूक नसतांना चापट मारल्याचे वाईट वाटले. तो मक्केहून मदिनेस आला. त्याने आमीरूल मोमीन समोर न्याय मागितला. तो म्हणाला, "परिक्रमेच्या वेळेस प्रचंड गर्दी असते. त्या गर्दीत कोणाच्या कपड्यावर पाय सहज पणे पडू शकतो. यात कसलीही हेतु पुरस्सरता नसते. माझा काही गुन्हा नसतांना गस्सानच्या बादशहाने मला चापट मारली. मला न्याय द्यावा."

हजरत उमर (र.) यांनी, गस्सानच्या बादशहा विरुध्द तक्रार आल्या मुळे व तीत तथ्य वाटत असल्याने, गस्सानच्या बादशहास दरबारात हजर राहण्याचा हुकूम दिला.

गस्साना बादशहा हुकूमाप्रमाणे दरबारात हजर झाला बद्दू ही दरबारात हजर होता. ह. उमर (र.) म्हणाले, "काबागृहाला परिक्रमा घालताना कपड्यास पाय लागणे हा अपमान नाही. परंतु तुम्हास बद्दू ला मारण्याचा काही अधिकार नव्हता. त्यामुळे तुम्हास मारण्याचा बदला द्यावा लागेल. तुम्ही बद्दूची समजूत घाला अथवा एक चापट बद्दूला मारण्यास आम्हाला सांगावे लागेल.

हा न्याय ऐकताच गस्सानच्या बादशहाचा गर्व साफ गळाला. त्याला हे कळत नव्हते की एका बादशहाचा बदला कसा घेतला जाईल ? त्या मुळे हा न्याय त्याला स्वतःचा अपमान वाटला. त्याने विचार करण्यासाठी तीन दिवसाची मुदत मागून घेतली.

या घटनेने मदिनेत खळबळ माजली. काही लोकांनी गस्सानच्या बादशहाची बाजू घेऊन हजरत उमरकडे रदबदली ही केली. पण हजरत उमर (र.) आपल्या न्यायावर ठाम राहिले. त्या नंतर तीन दिवसात केव्हातरी गस्सानचा बादशहा गुपचूप मदिना सोडून निघून गेला.

हजरत उमरनी एक बादशहा आणि, बद्दू या मागासवर्गीय जमातीतला सामान्य माणूस, यांना न्यायालयात एकाच पातळीवर उभे केले. त्यांना समान दर्जा दिला. याचा मतितार्थ आपण लक्षात घेतला का ? हजरत उमर (र.) यांना इस्लामचा न्याय व शिकवण, सर्व जनतेस द्यावयाची होती. ते करतांना त्याचा काय परिणाम होईल. याची त्यांनी थोडीही पर्वा केली नव्हती. इस्लाम मध्ये सर्व मानव समान आहेत. कोणाचे कोणावर प्राधान्य नाही. ईश्वराच्या नजरेत सर्व समान आहेत. जर त्याच्या दृष्टीत कोणी लहानथोर असलेच तर, ईश्वराला सर्वाधिक भिणारेच श्रेष्ठ आहेत. 'ईश्वराची भीति' ही मानवाच्या उच्च नीच तेची 'मोजपट्टी' ईश्वराने इस्लामला दिली आहे. येथे वंश कुटुंब, गरीब-श्रीमंत काळा-गोरा हे इस्लाम मध्ये महत्वाचे नाही.

हजरत मुहम्मद (स.) याच कारणासाठी, एकदा म्हणाले होते - ''जर मुहम्मद (स.) यांची मुलगी फातिमा चोरी करील तर तिलाही इस्लामी न्याया प्रमाणे हात कापण्याची सजा द्यावी लागेल.''

हजरत आएशा म्हणतात - ''मी आपणास (प्रेषित मुहम्मद (स.) यांना) सर्वात जास्त दयाळू आणि माफ करणारे पाहिले. पण जेव्हा न्यायाचा प्रसंग येईल तेव्हा ते कोणाचीही बाजू घेत नसत.''

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी मरणापूर्वी काही दिवस अगोदर जाहीर केले होते की, ''ज्या कोणास मी मारले असेल अतवा शिवी दिली असेल, तर त्याने माझ्याकडे येऊन त्याचा बदला घ्यावा.''

२८) प्रिय पुत्राच्या नावे पित्याचे पत्र

इस्लामचे चौथे खलिफा व प्रेषित मुहम्मद (स.) यांचे जावाई हजरत अली यांनी, त्यांचे पुत्र हजरत हसन (र.) याना पत्र लिहले ते खाली देत आहोत.

प्यारे बेटे,

जगात येणारी संकटे, जगातील मानवाची कृतघ्न वृत्ती आणि आखिरतचा (प्रलयाचा) दिवस जवळ आल्याच्या जाणीवेने मला चोहोकडून कोंडल्यासारखे अडचणीत आल्यासारखे वाटत आहे. तरीही मी त्याची पर्वा करीत नाही. पण आता एकाच शंकेने माझे काळीज कुरतडले जात आहे, ती म्हणजे आखिरत च्या दिवशी मला मिळणारी असफलता. त्या मुळे इतर सर्व बाबी सोडून माझा शेवटचा दिवस कसा सफल होईल याचकडे सारे लक्ष लागले आहे. त्या मुळे मी माझे मृत्यूपत्र तुझ्या नावे लिहीत आहे. कारण तू माझा प्राणच आहेस. तुझ्यावर जर संकट येणार असेल, तर ते माझ्यावर यावे म्हणून मी अल्लाह जवळ प्रार्थना करेन.

प्रिय मुला, मी तुला वारस ठरविले आहे. तू ईश्वराला शरण जा. त्याची आज्ञा पाळ. त्याच्या (ईश्वराच्या) भक्तिला सोडू नको. कारण ईश्वरापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही.

प्रिय मुला,

मनाला उत्तम विचाराने जागृत ठेव. कठीण तपश्चर्या कर. ईश्वरावरील विश्वास पक्का कर. स्वतःला ईश्वर चरणी लीन कर. हीच युक्ती तुझे जीवन प्रकाशित करेल मृत्यूची सदैव आठवण ठेवून मृत्यूवर मात कर. येणाऱ्या संकटाची कल्पना करून, नेहमी सावध राहा. प्राप्त काळात सहजा सहजी मिळणाऱ्या रंगीबेरंगी लौकिक सुखाच्या आहारी जाऊ नकोस. गतकाळातील झालेल्या बर्बादीची जाण करून घे. बर्बाद झालेल्या इमारतीच्या पडक्या अवशेषाकडे पाहा. तेथे राहणारे कोठे गेले याचा विचार कर. आता ते परतून येणार नाहीत याचीही जाणीव मनात जागृत ठेव. तुझ्या लक्षात येईल की, त्यांचे नांदते, गाते जग उध्वस्त झाले आहे. लक्षात ठेव तूही एक दिवस त्यांच्या सारखाच जाणार आहेस, परतून न येण्यासाठी. स्वतःचे आचरण सच्छिल ठेव. लौकिक सुखासाठी पारलौकिक सुखाची विक्री करू नकोस.

प्रिय पुत्रा,

तू चांगल्या कल्याणकारक गोष्टींचा उपदेश करशील तर तू चांगला माणूस बनशील. वाईट-दुर्गुण युक्त गोष्टीस शब्दाने व कृतीनेच दूर कर. वाईटा जवळही फिरकू नकोस. ईश्वराच्या मार्गाने जात असतांना दुष्ट शक्तिच्या विरोधास जुमानू नकोस. सत्यासाठी मात्र कठीणात कठीण परीक्षा घेणाऱ्या प्रसंगास धैर्याने सामोरा जा. तसे करशील तर तुला अमाप शक्ति व सहनशीलता ईश्वर प्रदान करेल. मग तुझ्यावर कोणीही विजय प्राप्त करू शकणार नाही. मी तुझ्यावर ज्यामुळे प्रसन्न होईन त्या बाबी खालील प्रमाणे -

तू ईश्वराला सतत भीत रहा. ईश्वराचीच आज्ञा पालन कर. जे ईश्वर भक्तित स्वत:ला लीन करून घेतात, त्यांचाच आदर्श समोर ठेव. आज जसा तू स्वत:कडे पाहतोस, विचार करतोस, तसेच ती माणसे एके काळी ते स्वत:कडे पाहत होती. विचार करीत होती. (चुकीचे वागत होते) सरते शेवटी ते ही सरळ मार्गाने चालण्यास बाध्य झाले. त्यांनी अयोग्य गोष्टींचा त्याग केला.

प्रिय मुला,

हे तू चांगल्या प्रकारे जाणले पाहिजे, लक्षात ठेवले पाहिजे की, ज्याच्या हातात आमचा मृत्यू आहे, त्याच्याच हातात आमचे जीवनही आहे. जो जन्माला घालतो तोच आम्हास मृत्यूही देतो. जो संकटात टाकतो तोच संकटातून आमचा उध्दार करतो. म्हणून तू स्वत:ला ईश्वराच्या स्वाधीन कर. मनात पक्की खूण गाठ बांध की, या जगाचे स्थैर्य अल्लाहने घालून दिलेल्या नियमांच्या अधीन आहे. जर तुला एखाद्या बाबतीत काही कळत नसेल तर, त्याला तू स्पष्ट नकार दे. त्याचे कारण असे आहे की, तू जन्मला तेव्हा अज्ञानीच होतास. मग तुला हळू हळू ज्ञान मिळत गेले, आणि आणखी किती शिकावयाचे आहे, हे ही तुला माहित नाही.

प्रिय मुला,

ईश्वरा बाबत जे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आम्हास जे ज्ञान दिले, तसे अद्याप कोणीही ज्ञान देवू शकला नाही. म्हणून तू त्यांनाच (प्रेषित (स.)) स्वत:चा मार्गदर्शक बनव. आखिरत (शेवटच्या) च्या दिवसासाठी तूच तुझे प्रतिनिधी म्हणून त्यांचीच निवड कर.

ज्या लोकांनी या जगाला जाणले, ते या जगाचा निरोप घेताना व्याकूळ होत नाहीत. घाबरत नाहीत. नापिक, खडकाळ जमीन सोडून, सुपिक हिरव्यागार पिकांनी बहरलेल्या शेताकडे स्वर्गाकिडे जाणाऱ्या माणसासारखी ही अवस्था असते. तो मार्ग कठीण असतो हे खरे आहे, पण ते ती सर्व संकटे सहन करतात. आपल्या जवळच्या नातलगांचा विरह ते सहन करतात. ईश्वराच्या मार्गात होणाऱ्या दुःखास ते दुःख मानीत नाहीत. त्यांचे प्रत्येक पाऊल उच्च ध्येयाकडे पडत असता त्यांना अनुभूत सुखाची प्राप्ती होत असते. परंतु या नश्वर जगास जे चिकटून राहतात, या क्षुद्र जगाचा विरह ज्यांना सहन होत नाही, त्यांची अवस्था मात्र सुपिक हिरव्यागार प्रदेशा कडून खडकाळ नापीक जमिनीकडे जाणाऱ्या यात्रेकरू सारखी असते. शेवटी निष्फळ धडपडीत दुःखाने तो आक्रोश करू लागतो. कारण त्याने रंगिबेरंगी लौकिक जगाची अपेक्षा केलेली असते. मी खात्रीपूर्वक सांगतो की, तो ईश्वराचा मार्ग नसतो.

प्रिय पुत्रा,

तुझ्या समोर कठीण घाट आहे. तो तुला पार करावयाचा आहे. तो घाट सडपातळ माणूस सहज पार करू शकेल. पण ज्याचे शरीर अवजड आहे (भौतिक सुखाच्या ओझ्याने जो जडावला आहे) त्याला पुढे जाण्यासाठी पाय उचलणे जड जाते. तू मात्र लक्षात ठेव हा घाट पार करण्यासाठी स्वतःला भौतिक सुखाच्या ओझ्याने जड होऊ देऊ नकोस. कारण हा घाट संपल्यावरच स्वर्ग किंवा नरक आहे. म्हणून तू आत्ता पासूनच मनाचा निश्चय करून भौतिक जगात गुंतू नकोस म्हणजे शेवटच्या दिवशी (प्रलयाच्या दिवशी) दुःखी होणार नाहीस.

प्रिय मुला,

तुझा जन्म न्यायाच्या दिवसासाठी झालेला आहे तो या नश्वर जगात गुंतून राहण्यासाठी नाही. तू आता अशा जागेवर आहेस की, जिथे मनाची द्विधा अवस्था होते. खर तर याच वेळी शेवटच्या दिवसासाठी सफलतेसाठी धडपड (प्रयत्न) करण्याची हीच वेळ आहे. त्या तयारी साठी तुला फारच थोडा वेळ दिला आहे. मृत्यू तुझा पाठलाग करीत आहे. तू कितीही पळालास, तुझी दमछाक होईल, परंतु मृत्यू तुझी पाठ सोडणार नाही. एके दिवशी मृत्यूची तुम्ही शिकार होणार आहात. म्हणून सावधान! असे न होवो की, तुम्हाला पश्चाताप करायलाही अवसर मिळू नये. आणि असे झालेच तर तू स्वतःचीच हत्या केल्या सारखे होईल.

सावधान ! सावधान !! स्वार्थाने अंध होऊन तुला मृत्यू न येवो. तुझ्या आणि ईश्वराच्या मध्ये कोणासच मध्यस्थ म्हणून स्वीकारू नको. कारण तुझा हिस्सा (करणीचे फळ) तुला मिळणारच आहे. ईश्वराने तुला थोडे जरी दिले तरी तेच खूप आहे.

लक्षात ठेव, अत्याचारी माणसाच्या अत्याचारा मुळे मन छोटे करू नकोस. अत्याचारी स्वतःचेच नुकसान आणि तुझे कल्याण करीत असतात.

प्रिय मुला,

अन्नाचे दोन प्रकार असतात. पहिला प्रकार म्हणजे तू ज्याला शोधतोस ते व दुसरा प्रकार तो 'जे अन्न तुम्हाला शोधित येते ते. तू जर अन्नाला शोधित फिरण्याचे सोडले तर अन्नच तुला शोधित येईल. या जगात तुझे काम एवढेच आहे. (अन्नाला शोधित फिरू नको) त्या मुळे तुझा शेवटचा दिवस गोड होईल. जगाचा (लौकिक सुखाचा) जे त्याग करतील, त्याला हे जग गळ्यातला ताईत बनवते. यात्रेस जाण्यापूर्वी सोबतच्या यात्रेकरूंची पारख कर. आणि एखाद्या ठिकाणी मुक्काम करण्यापूर्वी शेजारी पारखून घे.

प्रिय पुत्रा,

मी आता म्हातारा होत आहे, हे माझ्या लक्षात आले. म्हणून हा उपदेश करण्याची घाई करीत आहे. मला भीति वाटत होती की हे लिहण्यापूर्वीचे मला मृत्यू गाठेल. अथवा शरीराप्रमाणे मन ही कमजोर होईल. किंवा तू या लौकिक जगास भूलून, मायेत अडकशील. तुम्हा तरुणांची मने काही न पेरलेल्या जमिनी सारखी असतात. त्यात चांगले किंवा वाईट बी पेरले तरी ते उगवते.

प्रिय पुत्रा,

तुझे हे जग आणि शेवटचा दिवस ईश्वराच्या मर्जीवर सोपवितो. आणि ईश्वर चरणी प्रार्थना करतो की तू दोन्ही जगात सफल व्हावास.

(नहजुल बलागाच्या आधारे)

२९) ती तिच्या कृत्यामुळे पश्चाताप करू लागली

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे जावाई हजरत अली हे इस्लामचे चौथे खलिफा होते. त्यांच्या बालपणा पासूनच त्यांची देखरेख अल्लाहचे प्रेषित (स.) यांनीच केली. त्यांच्याच मांडीवर ते लहानाचे मोठे झाले. फलतः त्यांचे जीवन सर्वसामान्यासाठी आदर्श ठरले.

इस्लामी जगताचे सर्वेसर्वा झाल्या नंतर ही ते त्यांच्या आदर्शावर कायम राहिले. आपण ईश्वराला जबाबदार आहोत, ही जाणीव त्यांच्या मनात सदैव जागृत असे. त्याच जाणीवेने ते आपली जबाबदारी ओळखून वागत असत. म्हणून सरकारी खजिन्यातून वेतन घेतानाही ते आवश्यक तेवढेच वेतन घेत. ते घेण्यातही काटकसर करीत. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांचा संसार निर्धन माणसा सारखा झाला. कधी घरच्या स्त्रियांनी एवढ्यात आमचे भागत नाही असे उद्गार काढले तर, ते म्हणत "मुस्लिम खजिन्यावर आमचा फक्त एवढाच हक्क आहे की, आम्ही जेमतेम जिवंत राहू शकू."

एकदा त्यांच्या भाबीं (वहिणी) (हजरत जाफर यांच्या पत्नी, जे मुटाच्या युध्दात हुतात्मा झाले होते.) यांनी अलींना जेवणाचे आमंत्रण दिले. त्यांनी ते आमंत्रण आनंदाने स्वीकारले. त्यांच्या भाबींचा त्या मागे हेतु होता की, ते भोजनास आले असता. अन्नधान्य कमी पडते, अशी तक्रार करावी. हजरत अली आमंत्रणा प्रमाणे भोजनास आले. त्यांना भोजन वाढले गेले. त्या वेळी भाबी त्यांना म्हणाल्या, "हे आमीरूल मोमीन, आम्हाला खजिन्यातून जे अन्नधान्य मिळते, ते कमी पडते. आपण हे वाढविले तर बरे होईल."

त्यावर हजरत अली म्हणाले, "भाबीजी, मला हे सांगा की, तुम्हास अन्नधान्य कमी पडते, मग तुम्ही माझी 'दावत' कशी केली?"

"हे अमीरुल ! मोमीन बैतुलमाल मधून आम्हाला जे अन्नधान्य मिळते, त्यातून दररोज एक चिमूटभर पीठ मी काढून ठेवीत असे. तेव्हा कुठे एका महिन्यानंतर तुमची 'दावत' करू शकले."

"याचा अर्थ एक चिमूटभर पीठ तुम्हाला जास्त मिळत आहे. ते कमी केले तरी तुमचे भागू शकते." हजरत अली म्हणाले.

हे ऐकताच भाबींना अलींना भोजनास बोलावल्याचा पश्चाताप झाला. कारण दुसऱ्याच दिवसापासून बैतुलमाल मधून येणारे पीठ एक चिमूटभर कमी आले. पुन्हा कधी ती चिमूट जास्त पाठविली गेली नाही.

ही इस्लामी इतिहासातील एक अत्यंत छोटी पण बोलकी घटना आहे. जी वाचून विचार केल्या शिवाय आम्ही पुढे जाऊ शकत नाही. या घटनेच्या अनुषंगाने आम्ही काही शिकू शकतो की नाही ? अशा छोट्या छोट्या घटनाद्वारे आम्ही धडा घेतल्या शिवाय आम्ही काही जगत कल्याणाचे काम करू शकणार नाही.

'कांति' या दिल्लीच्या एका साप्ताहिकाच्या एका अंकात बातमी होती की कोणा एंका मंत्र्याने पाच हजाराची दारू पिऊन, त्याचे बील शासनाच्या माथी मारले. कोणी दुसऱ्याने दोन हजार बील, तर कोणी एक हजार,

आम्ही विचार करू लागलो, या देशात जनता भूकेने व्याकूळ झाली आहे. शरीर झाकण्यासाठी लंगोटी पुरते ही कापड त्यांना उपलब्ध नाही. गवताची साधी झोपडी मिळत नाही. म्हणून जनता झाडाच्या सावलीचा आश्रय शोधत आहे. आणि आमचे शासक, सरकारी खजिना पाण्याप्रमाणे वापरत आहेत. राज्य कोशातील पैसा दारू सारख्या व्यसना पायी वाहत आहे. सामान्य जनता आणि शासक यांच्यामध्ये स्वार्थाची भिंत रचली गेली आहे. त्या मुळे सामान्य जनतेचा आक्रोश शाशक पर्यंत पोहोचत नाही.

आता आमचे वाचक या दोन्ही घटना समोरा समोर ठेऊन विचार करू लागतील. त्यातील अंतर व महत्व त्यांच्या सहज लक्षात येईल. उपाशी तापाशी जनेतला आता तुम्ही संदेश देऊ शकता. जगात् आणखी अशीही व्यवस्था आहे की, जिचा स्वीकार करताच मानवाचा काया पालट होतो. मानव आपल्या प्रत्येक कृत्यासाठी एका मोठ्या सत्तेला (ईश्वरीय) जबाबदार असतो. मग आम्ही त्याचा अनुभव घेऊन कां पाहू नये.

३०) उमर बिन अब्दुल अजीज खलीफा बनतात

अजून इस्लामच्या स्थापनेला आणि शिकवणीला एक शतकही झाले नव्हते. तो पर्यंत मुस्लिमामध्ये लौकिक जगाची सुखासीन जगण्याची वृत्ती वाढू लागली होती. त्यांना ही संपत्तीची हाव सुटली. विशेषत: सम्राटांमध्ये हा रोग सांसर्गिक रोगा सारखा पसरू लागला. ते जनतेला गुलाम समजू लागले. राज्याचे धन स्वत:चे खाजगी संपत्ती समजून ती पाण्यासारखी खर्च करू लागले. रक्षक आणि पहारेकरी (स्वत:च्या संरक्षणासाठी) नेमून त्यावरही भरपूर धन खर्च करू लागले. बादशहा कैसर आणि किसरा प्रमाणे मोती आणि रत्ने यांनी जडविलेल्या सिंहासनावर विराजमान होऊ लागले. त्यांच्या मनातून ईश्वराची भीति दूर झाली. त्यांचा स्वार्थ वाढू लागला.

लोकांची लौकिक जीवनाची आवड वाढू लागली त्या मुळे हे घडू लागले. लोकांचा इस्लामच्या नीति नियमाशी नाम मात्र संबंध उरला. लोक कुरआन वाचत तर होते पण त्याच्या उपदेशाचे पालन करीत नव्हते. नमाजच्या वेळेत मशीद गच्च भरलेली असे मात्र नमाजचा परिणाम त्यांच्या जीवनावर झालेला दिसून येत नव्हता. थोडक्यात स्वार्थ आणि लौकिक जगालाच सर्वजण खरे जीवन मानू लागले होते.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या हिजरत नंतर ६६ वर्षे झाली होती. तीस वर्षापर्यंत मदिना इस्लामची राजधानी होती. ती बदलून 'दमिश्क' येथे नेण्यात आली होती. आता ते शहर इस्लामी राज्याची राजधानी होती. दमिश्कच्या जामा मशिदीत मानवांची गर्दी लोटली होती. जणू समुद्राला भरती आली होती. आज एक खास बातमी जाहीर करण्यात येणार आहे, असे राज्याकडून जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे प्रत्येकजण जामा मशिदीकडे निघाला होता.

सर्व लोक एकत्र झाल्याचे पाहून खलिफांचा मुख्य सल्लागार 'रजा बिन हैवा' व्यासपीठावर उभा राहिला. त्याच्या हातात मोहरबंद पाकीट होते. तो लोकांना संबोधून बोलू लागला.

''हे पत्र खलिफा सुलैमान यांनी दिले आहे. या पत्रात त्यांच्या नंतर, अमीरुल मोमीन म्हणून एका व्यक्तिची नेमणूक केली आहे. तुम्ही सर्वजण नव्या नेमलेल्या खलिफांच्या हातावर बैयत (शपथ) करण्यास तयार आहात कां ?

होय ! होय ! सर्व नागरिकांच्या मशिदीत आवाज निनादला.

'रजा बिन हैवा' लिफाफा उघडू लागले. मशिदीत सुई पडली तर तिचा आवाज ऐकू यावा, अशी शांतता पसरली. प्रत्येक जण आता आमचा खलीफा कोण बनतो, या विचारात बुडून गेले. खलीफा सुलेमानचे नातेवाईक, मुले, पुतणे आणि इतरांच्या हृदयाची धडधड वाढली. एका क्षणा नंतर या इस्लामी जगताचा मालक कोण बनतो ? हे इस्लामी जग आफ्रिका व स्पेन पर्यंत व दुसरीकडे, रशिया, चीन आणि सिंध पर्यंत पसरले होते.

'रजा बिन हैवा' पत्र उघडून वाचू लागले. सलाम ! मी माझ्या नंतर एका व्यक्तिला आपला खलिफा नेमले आहे. हे सर्व मी जनतेच्या कल्याणाच्या हेतुनेच केले आहे. मला आशा आहे तुम्हाला माझी निवड पसंद पडेल. ते आहेत, 'उमर बिन अब्दुल अजीज.'

उमर बिन अजीज यांचे नाव ऐकताच संपूर्ण मशिद 'अल्लाहो अकबर' घोषाने निनादली. लोक आनंदाने पुन्हा पुन्हा अल्लाहो अकबरचे नारे देऊ लागले. हजरत उमर बिन अब्दुल अजीज ईश भक्ती आणि दयाळू पणासाठी लोकांना परिचित होते. त्यांचे वडील अब्दुल अजीज मिश्रचे इजिप्तचे गव्हर्नर होते. त्यामुळे हजरत उमरचे सर्व शिक्षण राजकुमारा बरोबर झाले होते. त्यांच्या घरी धन संपत्तीला तोटा नव्हता. त्याचे अंथरूण गुलाब पुष्पांनी सजविले जात असे. त्यावर अत्तराचे फवारे मारले जायचे. परंतु सकाळी जेव्हा सेविका त्यांच्या शयनगृहात जात तेव्हा त्या आश्चर्य चकित होत. कारण हजरत उमर, गुलाबाने आच्छादिलेल्या अंथरूणावर झोपलेले नसत. कारण ते संपूर्ण रात्र नमाज पढत असत.

लोक त्यांच्या बाबत म्हणत की, त्यांचे आजोबा (आईचे वडील - नाना) अमिरुन मोमीन हजरत उमरचे गुण घेऊन ते जन्माला आले आहेत. हजरत उमर तेच, ज्यांनी मागे कथेत सांगितलेल्या 'दुधात पाणी घालण्यास नकार देणाऱ्या मुलीस ज्यांनी सून करून घेतले होते. त्या मुलीचे हजरत उमर बिन अजीज नातू होते. या मुळे हजरत उमरचे गुण हजरत उमर बिन अजीज यांच्यात उतरले होते. हे योग्य वाटते असो.

आता लोक उमर बिन अब्दुल अजीजकडे गेले. त्यांनी त्यांना पकडून व्यास पीठावर उभे केले.

परंतु उमर बिन अब्दुल अजीज सारखे - ('इन्ना लिल्लाही व इन्ना इलैही राजीउन') संकट कालीन म्हणावयाचे स्तोत्र, सारखे म्हणत होते.

खिलाफतीच्या ओझ्यातून स्वतःस मुक्त करण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु आता इलाज नव्हता. जे काही घडणार होते, ते घडून गेले होते. नंतर सर्व जनतेने हजरत उमरच्या हातावर हात ठेऊन शपथ घेतली.

बैयत पूर्ण झाल्यावर, रजा बिन हैवा ने हजरत सुलेमानच्या मृत्यूची वार्ता सर्वांना सांगितली. आणि हजरत उमर अब्दुल अजीज हे खिलाफतीचे ओझे खांद्यावर घेऊन जड पावलाने घरी येऊन एका कोपऱ्यात बसून राहिले.

त्यांची पत्नी फातिमा आपल्या पतीला असे उदास बसलेले पाहून घाबरून गेली. तिने चिंतीत आवाजात विचारले, ''आज आपण इतके चिंतीत आणि उदास कां ?''

''काळजी करू नको तर काय करू? आज माझ्या डोक्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. त्याचा विचार मनात आला की, माझ्या हृदयाचा थरकाप होतो. वाटंते, ही जबाबदारी आपण फार पाडू किंवा नाही !'' उमर म्हणाले.

''अहो पण असे कोणते ओझे तुमच्या शिरावर पडले आहे ? फातिमांनी विचारले.

उमर म्हणाले, ''खिलाफतीचे''

हे ऐकताच फातिमांचा चेहरा आनंदाने फुलून आला. ''अहो ही का चिंतेची बाब आहे. ही तर खूप आनंदाची आणि खुष करणारी बातमी आहे.'' फातिमा म्हणाल्या.

परंतु फातिमाना हे माहित नव्हते की, उमर बिन अब्दुल अजीज, या खिलाफतीच्या जबाबदारीस फार मोठे ओझे समजत आहेत. त्यांच्या समोर आफ्रिका आणि स्पेन पासून ते रशिया, चीन आणि सिंध येथील प्रत्येक व्यक्तिचा विचार होता. अनाथ आणि अपंगाची आठवण होत होती. एखाद्या सिंधच्या सामान्य शेतकऱ्याने अल्लाह जवळ, 'अमीरुल मोमीननी माझ्या शेतात शेजारच्या शेतकऱ्याच्या शेळ्या चरत होत्या. तरी त्यांनी लक्ष दिले नाही, अशी तक्रार केली तर, मी काय उत्तर देणार ?

असे होते मुस्लिमांचे नवे खलिफा ज्यांनी पुन्हा पुऱ्या शतकानंतर योग्य मार्गाने चालणाऱ्या खलिफाचा उच्चतम आदर्श निर्माण केला होता.

३१) एक ग्लास पाणी

हारुन रशीद बनू अब्बासियाचे पाचवे खलिफा होते. ते १८ डिसेंबर ६९ मध्ये सिंहासनावर विराजमान झाले. त्यांच्या वर्तनात काही दोष होते. तसेच काही सद्‌गुणही होते. साहस आणि शौर्यात त्यांची कोणीही बरोबरी करू शकत नव्हते. शत्रूशी झुंजण्यासाठी बाहेर पडले की, विजय श्री त्यांनाच माळ घालीत असे. पराजयाचे त्यांनी कधीही तोंड पाहिले नव्हते. एका वर्षी युध्दात विजय मिळवावा व दुसऱ्या वर्षी 'हज' ची यात्रा करावी, असा त्यांचा प्रघात होता. ज्या वर्षी ते हजला जात नसत त्या वर्षी ते स्वखर्चाने तीनशे ईशभक्तांना 'हजला' पाठवित असत.

इस्लामी धर्माने हजला अत्यंत महत्व दिले आहे. ईश्वराने 'हजचा' स्वीकार केला. तर त्याचे पारलौकिक जीवन सुधारते. त्याला स्वर्गाचा मोबदला मिळतो.

हारून रशीदचे राज्य खूप मोठे होते. इस्लामच्या इतिहासात हारून रशीद आणि त्याचा मुलगा मामून रशीद याच्या प्रचंड राज्याच्या विस्तारा एवढे कोणाचेही राज्य झाले नाही. हारून रशीदच्या नावाला फ्रान्सचा बादशहा देखील घाबरत असे.

असे जरी असले तरी तो ईश्वर भक्तांचा खूप आदर करीत असे. त्यांना स्वतःच्या दरबारात बोलावून त्यांचा उपदेश ऐकत असे. कधी कधी ईश्वराच्या भीतिने ते भयभीत होत असे. त्या भीतिने ते रात्र रात्र रडत असे. त्यांची दाढी अश्रुंनी भिजून चिंब होत असे.

एकदा हारून रशीदनी 'इब्ने समाक' यांना उपदेश देण्यासाठी दरबारात बोलाविले. इब्ने समाक हे त्यांच्या काळातले फार मोठे विद्‌वान होते. ईश्वरा शिवाय ते अन्य कोणालाही भीत नसत.

इब्ने समाक राज्य दरबारात न भिता बेधडक जात असत आणि त्या राजाच्या चुकीचे माप त्याच्या पदरात टाकून, त्याच्या वर्तनाबद्दल नाराजी जाहीर करीत असत. त्यांना पक्का विश्वास होता की, जगणे आणि मरणे फक्त ईश्वराच्या अधीन आहे. ते मानवाच्या हातात नाही. म्हणून ते ईश्वराशिवाय कोणालाही भीत नसत.

असे ते इब्ने समाक हारून रशीदच्या दरबारात आले. आणि त्याला उपदेश करू लागले.

"हे अमीरूल मोमीन, उद्या तुम्हास अल्लाहला तोंड दाखवावयाचे आहे. तो तुमचा न्याय करणार आहे. मग तुमच्या 'करणी' प्रमाणे स्वर्ग अथवा नरक याचा निर्णय तो घेईल. स्वर्ग आणि नरकाशिवाय मानवाला तिसरे स्थळ अल्लाहने निर्माण केलेले नाही."

हारून रशीद ऐकत होते. त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यांची दाढी अश्रुंनी ओलीचिंब झाली.

हारून रशीदची ही अवस्था पाहून, त्यांचा वजीर, 'फजल बिन रब्बी' यास अत्यंत राग आला. तो इब्ने समाकना म्हणाला, "हे इब्ने समाक, तुम्हाला माहित नाही काय ? अमीरूल मोमीनचे स्थान स्वर्गातच निश्चित असेल."

इब्ने समाकनी वजीराच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही. त्यांना माहीत होते, दरबारी लोक स्वतःच्या स्वार्थासाठी राजा पुढे गोंडा घोळत असतात. त्यांच्या मनात भाकरीच्या तुकड्या पुरतेच शासकाचे प्रेम असते. तो तुकडा मिळेनासा झाला तर उलटायलाही कमी करत नाहीत. आज अशा स्वार्थी लोकांचे प्रमाण जगात वाढले आहे. त्याचेच जास्त दुःख वाटते.

इब्ने समाक पुढे बोलू लागले. "हे आमीरुल मोमीन, हे लोक जे तुमच्या पुढे पुढे करीत आहेत. त्यांचा उद्या तुम्हाला कसलाही उपयोग नाही. म्हणून तुम्ही, त्यांच्या कडे लक्ष देऊ नये हे बरे !

"जी काही 'उद्या' साठी तयारी करावयाची आहे त्याची तयारी सुरू करा."

हे ऐकताच हारून रशीद भीतिने अर्ध मेला झाला. त्याच्या डोळ्यातून पुन्हा अश्रू वाहू लागले. त्या वेळी त्यांने त्याच्या सेवकास पाण्याचा ग्लास मागितला. सेवकाने पाण्याचा ग्लास हारून रशीदच्या हातात आणून दिला. हारून रशीद पाण्याचा ग्लास तोंडास लावणार तोच इब्ने समाक मोठ्याने म्हणाला.

"आमीरुल मोमीन, थांबा ! मला असे सांगा की जर तुम्ही रुक्ष वाळवंटात, जिथे पाणी मिळू शकत नाही, तिथे तहानेने व्याकूळ झालात, तर या एक ग्लास पाण्यासाठी काय मूल्य द्याल ?"

हारून रशीद म्हणाले, "माझे अर्धे राज्य देईन."

"छान ! आता तुम्ही पाणी पिऊ शकता." इब्ने समाक म्हणाले. पाणी प्याल्यावर हारून रशीदना इब्ने समाक त्यांना विचारतात,

"हे आमीरुल मोमीन ग्लासातील पाणी तर तुम्ही प्यालात, या नंतर जर तुमची लघवी बंद झाली, तर तुम्ही काय कराल ? त्यासाठी तुम्ही किती खर्च करायला तयार व्हाल ?

"राहिलेले अर्धे राज्य" हारून रशीद म्हणाले

हे आमीरुल मोमीन, आता विचार करा ! ज्या राज्याची किंमत फक्त एक ग्लास पाणी आहे. त्यावर मानवाने गर्व कां करावा?"

एवढे बोलून इब्ने समाक दरबारातून निघून गेले. पण इकडे हारून रशीद बेहोष झाले. काही लोकांना भीति वाटली की, हारून रशीदचा स्वर्गवास होतो की काय ? त्यांच्या चेहऱ्यावर पाणी शिंपडले गेले. तेव्हा त्यांचे डोळे उघडले गेले.

खरं तर त्याच्या अंतरात्म्याचे डोळेच उघडले. आतापर्यंत ते अंधारात चाचपडत होते. त्यांचा त्यांना पश्चाताप झाला.

त्या नंतर हारून रशीद यांच्या जीवनाचा मार्ग आमूलाग्र बदलला. त्यांनी स्वतःला ईश्वर भक्तित झोकून दिले. रात्र भर ते झोपत नसत. रात्रीतून १००/१०० रकआत नमाज पढत. जनतेला सुदृढ न्यायाची व्यवस्था केली. थोडक्यात त्यांच्या काळात शेळी आणि वाघ एका पाणवठ्यावर पाणी पिऊ लागले. गरीब आणि फकिरा साठी राज्याचा खजिना मुक्त केला. त्या शिवाय स्वतःच्या खिशातून एक हजार दिरहम (तत्कालीन नाणे) दान पुण्यात खर्च करू लागले.

निश्चितच ! त्यांनी स्वतःच्या शेवटच्या दिवसासाठी भरपूर कमावले असेल!

३२) हसन बसरींचे एक वैचारिक पत्र

प्रामाणिक आणि ईश्वराची भीति बाळगणारे खलिफा ईश्वर भक्तांचा खूप आदर करीत असत. त्यांना आपल्या दरबारात बोलावत असत व त्यांची सेवा करीत असत. स्वतः त्यांच्या घरीही जात. त्यांना शक्य होईल तेवढ्या भेट वस्तुही देत. मानव जेवढा लौकिक संसारात गुरफटून जाईल तेवढा तो ईश्वरापासून दूर जाईल. लौकिक जगात गुंतूनही ईश्वराची आठवण ठेवणे फारच कठीण आहे. या साठी संत आणि ईशभक्तांच्या सोबत काही काळ घालवणे योग्य होईल. संता बरोबर राहून राजकारणी व्यक्तिने त्यांच्या कडून उपदेश ग्रहण करावा. त्यांची सेवा करावी त्यांच्या अन्न, वस्त्र व निवारा इत्यादिंची सोय करावी. त्याचे आशिर्वाद मिळवावेत.

हे मर्म, हजरत उमर बिन अजीज यांना समजले होते. त्या मुळे त्यांच्या दरबारात नेहमी विद्वान ईशभक्त आणि साधू-संतांचा मेळावा जमलेला असे त्यांच्या सहवासाचा लाभ ते घेत असत.

ते संत-विद्वान हजरत उमर यांना शेवटच्या दिवसाची सतत आठवण करून देत. त्यामुळे हजरत उमर लौकिक कार्य करतांना त्यांचे मन ईश स्मरणात गुंग असे. त्यांच्या भोवती रंगीबेरंगी जीवन असतांना त्यांचे नेत्र, शेवटच्या (आखिरत) दिवसाच्या भीतिने अश्रू ढाळीत असत. शेवटच्या दिवसाचे यश हेच खरे यश आहे.

हजरत हसन बसरी हे त्या काळातील एक थोर ईशभक्त आणि विद्वान होते. सर्व इस्लामी जग त्यांना ओळखीत होते. त्यांचा आदर करीत होते. एकदा एक सामान्य माणूस बसऱ्यात आला. त्याने विचारले, ‘‘या शहरात सर्वात विद्वान कोण आहे ?’’

लोकांनी त्याला उत्तर दिले, ‘‘हसन बसरी.’’

त्या सामान्य माणसाने विचारले, ‘‘ते कसे ?’’

‘‘हसन बसरी, आमच्या सामान्या सारखे लौकिक जीनवामागे धावत नाहीत तर ते लौकिक सुखापासून शेकडो मैल दूर आहेत. पैशा अडक्याचे त्यांना प्रेम नाही. ते विद्वान आहेत. त्यांच्याकडून आम्ही ज्ञानाची अपेक्षा करीत असतो.’’ लोक म्हणाले.

आमीरूल मोमीन हजरत उमर (र.) हे ही बसरीचा आदर करीत असत. एकदा हजरत उमरनी त्यांना उपदेश करण्याची विनंती केली. तेव्हा हसन बसरींनी खलिफांना खालील पत्र लिहिले.

''हे आमीरुल मोमीन ! अल्लाहने खलिफाला, चुकीच्या मार्गाने जाणाऱ्यास, सरळ मार्गावर आणण्यासाठी व जुलूम करणाऱ्या लोकांना वठणीवर आणण्यासाठी, नेमले आहे. ईश्वराने खलिफाला, निर्बल लोकांसाठी शक्ति, दलितासाठी ढाल व चिंताग्रस्त लोकांना आनंद देण्यासाठी खलिफा बनविले आहे. खलिफा एक प्रकारे त्या गुराख्या सारखा आहे. जो आपल्या गुरांना उत्तम चारा देतो. त्यांची हत्या होण्यापासून वाचवितो. हिंसक पशू पासून त्यांचे रक्षण करतो. उन्हातान्हा पासून त्यांचे रक्षण करतो.

''हे आमीरूल मोमीन ! खलिफा आई वडिलांच्या ठिकाणी असतो. ते जसे आपल्या संततीवर कृपा करतात, मोठे झाल्यावर शिक्षणाची व्यवस्था करतात, त्यांच्या साठी पैसा मिळवतात. आणि मरतात तेव्हा त्यांच्यासाठी मागे संपत्ती ठेवून जातात.

''हे आमीरूल मोमीन ! खलिफा त्या आई सारखा असतो, जी अत्यंत कष्टाने मुलाचा पोटात सांभाळ करते. त्याला वेदना सहन करून जन्म देते. त्याला आपल्या रक्ताचे दूध बनवून पाजते. ते आनंदी असते तेव्हा ती खुष असते. ते जेव्हा आजारी होते, त्याला त्रास होतो तेव्हा ती दुःखाने व्याकूळ होते.

''हे आमीरूल मोमीन ! खलिफा हा अनाथांचा संरक्षक असतो. दुःखीतांना तो धाडस देतो. लहानांच्या शिक्षणाची व्यवस्था करतो. वयस्क असतील त्यांच्या गरजा भागवितो.

''हे आमीरुल मोमीन ! तुमचे सामाजिक जीवनात तेच स्थान असते. जे हृदयाचे मानवी शरीरात असते जो पर्यंत हृदय ठीक काम करते, तो पर्यंत शरीर आरोग्यपूर्ण राहते. जर हृदयच बिघडले तर शरिराची दुर्दशा व्हावयास उशीर लागत नाही.

''हे आमीरुल मोमीन ! खलिफा ईश्वराची वाणी मार्गदर्शन स्वीकारतो आणि लोकांना तसा उपदेश करतो. तो स्वतः शिकतो आणि शिकवतो ही. तो ईश्वराची उपासना स्वतः करतो आणि तशी उपासना प्रजेकडून करवून घेतो. उपासना करण्यास उत्तेजन देतो. तुम्ही अल्लाहच्या सच्च्या सेवका सारखे वागा. आपल्या परिवाराचे (प्रजेचे) रक्षण करा.

''हे आमीरूल मोमीन ! ईश्वराने वाईट कामे करण्यास प्रतिबंध केले आहे. जर खलिफाच वाईट वागू लागले तर जनतेची दशा काय होईल ?

''हे आमीरूल मोमीन ! मृत्यूची आठवण ठेवा. विचार करा त्यावेळी तुमचा कोणी मित्र नसेल. कोणी तुमचे संरक्षण करणाराही असणार नाही. तुमचा पैसा-अडकाही त्या वेळी तुमच्या उपयोगी पडणार नाही. तुम्हाला ज्या घरात (कबरीत) ठेवले जाईल ते फार छोटे व अंधारे असेल. तेथे दिवाही असणार नाही. तेथे तुम्हास एकटे सोडून सर्व लोक निघून जातील. त्या वेळी उपयोगी पडेल अशी कृत्ये करा. जेव्हा तुम्हाला न्यायासाठी शेवटच्या दिवशी उठविले जाईल. तुमच्या कृत्याचा हिशोब घेतला जाईल. तेव्हा लक्षात घ्या. त्या दिवसाच्या तयारी साठीच हे जीवन तुम्हाला मिळाले आहे. याच काळात जे मिळवावयाचे आहे ते सत्कृत्य व ईश्वर निष्ठा या द्वारे मिळवा.

''हे आमीरून मोमीन ! अडाणी आणि मूर्खा सारखे न्यायदान करू नका. तसेच जनतेवर अत्याचार करू नका. निर्बलावर सबलांना अत्याचार करण्यास मोकळे सोडू नका. ते कोणावरही दया करणारे नसतात. जर अत्याचाऱ्यांना मोकळे रान दिले तर त्याचे ओझे तुम्हासच उचलावे लागेल, आणि दुर्बलावर अत्याचार होईल तो वेगळाच. त्याचेही ओझे तुम्हासच उचलावे लागेल. तुम्ही त्या लोकांचा पाठपुरावा करू नका. जे तुम्हास ईश्वरीय कोपात ढकलू इच्छितात, आणि स्वत: चैन करू इच्छितात. त्याने त्या अत्याचारी लोकांचे भले होईल आणि तुमचा शेवटचा दिवस सुखाचा होणार नाही.

''हे आमीरूल मोमीन ! आपल्या शक्तिचा गर्व करू नका. ज्या दिवशी तुमच्या बरोबर कोणी असणार नाही जेव्हा तुम्ही आपल्या स्वामी समोर नाक रगडून रगडून क्षमा मागत असाल. त्या दिवशी तुम्हास कोणीही मदत करणार नाही.''

''हे आमीरूल मोमीन ! मी इतर विद्वानां सारखा तुम्हाला उपदेश करू शकणार नाही. परंतु मी मनात काही न ठेवता सर्व खुल्या मनाने सर्व काही लिहिले आहे. यातील काही कटु वाटण्याची शक्यता आहे. पण आपण आपल्या मित्राचे कडू औषध, जे मित्र मित्राच्या कल्याणासाठी सदिच्छेने देतो, असे समजून घ्यावे.''

वस्सलाम
हसन बसरी

हे एका विद्‌वान संतांचे पत्र आहे. आणि ते आठव्या शतकात लिहिले आहे. ते एका महान सम्राटाला लिहिले आहे.

आमचे शासक या पासून बोध घेतील कां ?

३३) नग्न तलवारीच्या छायेत

हा इराकचा गव्हर्नर हज्जाज बिन युसूफचा दरबार आहे. तो मोठ्या ऐटीत सिंहासनावर बसलेला आहे. दररोज शेकडो स्त्री पुरुषाची त्याच्या समोर कत्तल केली जात आहे. त्याचा सर्व राजमहल मानवतेच्या पुण्य रक्ताने लांछित झाला आहे. अशा कठीण प्रसंगातही ईश्वर भक्तांची उणीव नाही. ते इस्लामच्या छत्रछायेखाली सुखरूप आहेत. असे ईश्वर भक्त हज्जाजच्या अत्याचाराने भयभीत झाले नाहीत. त्यांचा ईश्वरावर पूर्ण भरवसा आहे. ते फक्त त्याचीच मदत मागतात. त्यांचा प्रलयाच्या दिवसावर विश्वास आहे. त्या दिवशी आपल्या कृत्याचा अल्लाह समोर हिशोब द्यावा लागणार आहे, या भीतिने येणारी संकटे सहन करतात. त्याच बरोबर जगातील अत्याचार दूर करण्याची प्रार्थना ईश्वरा जवळ करीत असतात.

अशा ईश भक्तांमध्ये सईद बिन जुबैर हे एक होते. त्याची विद्वत्ता आणि पवित्र धार्मिक आचरण या मुळे सर्व मक्केत ते प्रसिध्द होते. लोक त्यांना आपला धर्मगुरू मानत होते. म्हणून तो हज्जाज त्यांना मार्गातून हरवून मनमानेल तसे राज्य करू इच्छित होता. त्यासाठी निरनिराळे हातकंडे वापरीत होता.

'पहिला हातकन्डा' (डाव पेच)

हज्जाज - तुझे नाव काय ?

सईद - माझे नाव सईद बिन जुबैर आहे.

(सईद चा अर्थ आहे भाग्यवान)

हज्जाज - नाही, खरे तर, तुझे नाव शकी बिन कुसैर असेल.

(शकी म्हणजे भाग्यहीन)

सईद - माझी आई माझ्या नावा बद्दल तुझ्या पेक्षा चांगल्या प्रकारे जाणते.

हज्जाज - तू आणि तुझी आई दोघेही भाग्यहीन आहात.

सईद - अपरोक्ष गोष्टी (अज्ञात बाबी) फक्त ईश्वरच जाणतो.

हज्जाज - या जगात तुझ्यासाठी नरक निर्माण केला जाईल.

सईद - जर स्वर्ग आणि नरक तुझ्या हातात असते तर मी तुलाच ईश्वर मानले नसते काय ?

हज्जाज - मुहम्मद (स.) बाबत तुझे काय मत आहे ?

सईद - ते अल्लाहचे पैगंबर (दूत-प्रेषित) व आमचे मार्गदर्शक आहेत.

हज्जाज - 'अली' बाबत तुझे काय मत आहे. सध्या अली स्वर्गात आहे की नरकात ?

सईद - जेव्हा तू त्या मध्ये दाखल होशील व तेथील लोकांना ओळखशील तेव्हा तुला कळेल 'अली' कोठे आहेत ते.

हज्जाज - चार खलिफा, अबू बक्र, उमर, उस्मान व अली बाबत तुला काय म्हणावयाचे आहे.

सईद - याला उत्तर देण्याची जबाबदारी माझी नाही.

हज्जाज - तुझी या पैकी कोणावर अधिक श्रध्दा आहे ?

सईद - ज्याला त्याचा ईश्वर पसंद करतो तो.

हज्जाज - ईश्वर कोणाला अधिक पसंद करतो.

सईद - हे फक्त ईश्वरालाच माहीत. कारण तोच गुप्त आणि उघड गोष्टी जाणतो.

हज्जाज - तू हसत कां नाहीस ?

सईद - माणूस कसा हसू शकतो ? तो माती पासून बनवला गेला आहे. आणि माती हे अग्नीचे भक्ष आहे.

हज्जाज - आम्ही कां हसतो ?

सईद - तुमचे मन अद्याप आजारग्रस्त आहे म्हणून.

हा, सज्जाद ने सईदवर घातलेल्या हातकंड्याचा डावपेचाचा पहिला प्रकार होता. त्याने विचार केला होता की, सईदला सहजासहजी पेचात पकडू शकू. पण सईद इतके कच्चे नव्हते की त्याच्या डावपेचाला सहज बळी पडू शकतील. त्या घमेंडखोर व अत्याचारी हज्जाजला हे माहित नव्हते की, सईद यांना जागृत मन आणि विद्वत्ता पूर्ण भाषा (जीभ) ईश्वराने दिली आहे.

'दुसरा हातकन्डा'

हज्जाजच्या आज्ञेने सोने, चांदी व रत्नांचा ढीग दरबारात एका बाजूला केला आहे. सर्वांग सुंदर राजमहाल व रत्नांचा ढीग हे पाहून कोणाचे मनास हाव सुटणार नाही ? मोठमोठे योगी आणि ईशभक्तही या धनसंपत्ती मागे वेडे होऊन धावतांना आपण पाहिले आहे. ऐश्वर्य आणि धन पाहून माणूस पाघळला नाही असे कधी होते कां ? असो.

त्या सुंदर महालात एका भिकाऱ्याला घेऊन पाहरेकरी येतात. भिकाऱ्याचे कपडे ठिगळा ठिगळा चे आहेत. त्याच्या चेहऱ्यावरून तो कित्येक दिवसाचा उपाशी असावा असे वाटत होते.

एक दुर्दशा झालेला भिकारी, समोरच सोने, चांदी आणि रत्नांचे ढीग, मग त्या भिकाऱ्याच्या मनात कोणते विचार येत असतील ? परंतु नाही ! हा भिकारी कोणी स्वार्थी लालची फकीर नव्हता. उलट या भरल्या जगाची उपेक्षा करून, परमेश्वरी कृपेसाठी भिकारी बनलेले हे 'सईद बिन जुबैर' होते.

हज्जाज - हे पहा सईद, हे किमती हिरे, सोने व चांदीचे ढीग तुला भेट देतो आहे.

सईद - हे गव्हर्नर ! आम्ही भौतिक जगाला लाथ मारली आहे. त्याचा पुन्हा कसा स्वीकार करणार ?

हज्जाज - तुझे वाटोळे हावो, तुझा नाश होवो.

सईद - ज्याला ईश्वराने, नरकापासून वाचविले व त्याला स्वर्ग प्रदान केला आहे, त्याचा नाश कसा होईल ? (कुरआन)

हज्जाज - बस्स कर सईद. मी माझा आणखी अपमान सहन करू शकणार नाही. बरे आता सांग तुला कोणत्या पध्दतीने मृत्यू दिला तर आवडेल.

सईद - ज्या प्रकारे तू ईश्वराजवळ मृत्यू मागशील त्या प्रमाणे.

हज्जाज - सईद तू आता माफी मागीतली तर बरे होईल. कारण तू माझ्या ताब्यात असल्या ने केव्हाही कत्तल करु शकतो.

सईद - नाही हज्जाज मी तुझ्या ताब्यात नाही. मी तर ईश्वराच्या ताब्यात आहे. माझे जगणे मरणे फक्त ईश्वराधीन आहे.

आता मात्र हज्जाच रागाने आंधळा होतो. तो क्रोधाने त्याच्या शिपायांना आज्ञा देतो.

''याला ताबडतोब घेऊन जा आणि त्याची कत्तल करा.''

शिपाई सईद यांना पकडून बाहेर नेत असता सईद यांना राहवले नाही. त्यांना हसू आले. जेव्हा ही बातमी हज्जाज याला कळली. तेव्हा त्याने सईद यांना विचारले

''सईदला कत्तल करण्यास नेत आहेत तरी हसतोस याचे कारण का ?''

सईद - घमेंडखोर हज्जाज, मी या साठी हंसतो आहे की, ईश्वराने तुझ्या कत्तलीचाही हुकूम दिला आहे.

हज्जाज - बस्स फार झाले. ताबडतोब कत्तल करा.

सईद - ''मी आपला चेहरा ईश्वराकडे वळवितो, जो आकाश व पृथ्वीचा स्वामी आहे. मी त्याचा आज्ञाधारक आहे.'' (कुरआन)

असे म्हणून सईद काबा (मक्का) कडे तोंड करून बसले.

हज्जाज - याचे शीर जमीनीवर टेकवा.

सईद - ''या मातीनेच आम्ही (तुम्हास) निर्माण केले आहे. पुन्हा तुम्हास यातच (मातीत) परत घालू. आणि प्रलयाच्या दिवशी मातीतूनच उठवू.'' (कुरआन)

हज्जाज - ही बडबड बंद करा. मारेकऱ्यास आज्ञा दिली, याची गर्दन उडवा. मग पाहता पाहता क्षणातच सईदचे प्राण उडून गेले.

३४) ही तुमची पत्नी आहे

उमवी खलिफा 'अब्दुल मलिक बिन मखान' चा दरबार भरला होता. त्याचे रक्षक नागव्या तलवारी हातात घेऊन एका ओळीत उभे होते. मात्र दरबारचे वातावरण मृत्यूची अवकळा पसरल्या सारखे होते. दरबारी मान खाली करून खलिफाच्या आज्ञेची वाट पाहत होते. नजर उचलून पाहण्याचे साहस कोणातच नव्हते.

इतक्यात खलिफाचे शिपाई एका शेखला घेऊन दरबारात दाखल झाले. शेखच्या चेहऱ्यावर लांब पांढरी दाढी विराजमान होती. पांढरी दाढी चमकदार चांदी प्रमाणे चकाकत होती. म्हातारपणा मुळे चेहऱ्यावर सुरकुत्यांचे जाळे पसरले होते.चेहरा मात्र चतुर्दशीच्या चंद्राप्रमाणे प्रकाशित व शोभायमान दिसत होता. त्यांच्या कपाळावर एक काळा घट्टा पडलेला होता. त्या मुळे चंद्रावर दिसणाऱ्या डागामुळे, चंद्र जसा शोभायमान होतो, तसा त्यांचा चेहरा खुलून दिसत होता. परंतु शेखच्या कपड्याकडे पाहिले असता ते भिकारी असावेत असे वाटत होते. त्यांच्या कपड्याला जागोजागी ठिगळे लावलेली होती. डोकीवरील पागोटे धुळीने माखले होते. पायातील पादत्राण झिजून जीर्ण जीर्ण झाले होते. मात्र त्याचा चेहरा स्पष्टपणे फकिरा सारखा वा साधू सारखा पवित्र दिसत होता.

शेख ना पाहताच सर्व दरबार आदराने उठून उभा राहिला. अब्दुल मलिकही सिंहासनावरून उतरून त्यांच्या स्वागतासाठी सामोरा आला. शेखना आदराने सलाम केला. आणि एका आसनावर बसविले.

शेख - तुम्ही मला बोलावले ? तुम्हास माहित नाही काय ?

मागील चाळीस वर्षापासून मी मस्जिद-ए-नबवी आणि घराशिवाय कोठे गेलो नाही. फक्त वर्षातून एकदाच ईश्वराच्या आज्ञेने 'हज' ला जातो.

खलिफा - हुजूर चुकीची माफी असावी. आम्ही तुम्हास एका कामासाठी त्रास दिला आहे.

शेख - मी फकीर माणूस, दिवस रात्र मी मशिदीत घालवतो. माझा बादशहा शी काय संबंध ?

खलिफा - हुजूर चूक माफ करावी. मी माझा मुलगा वलीदचे लग्न आपल्या मुलीशी करू इच्छितो. हे ऐकताच शेखचा चेहरा रागाने काळानिळा झाला. ते म्हणाले,

माझ्या मुलीचे लग्न भविष्यात खलिफा होणाऱ्या तुमच्या मुलाशी ? नाही, असे कदापि होऊ शकणार नाही ? मला माहित आहे, तुमचा मुलगा मोठा योध्दा आहे. शौर्य आणि बहादुरी त्याच्या रक्तातच आहे. परंतु त्याच्या अत्याचाराने सगळी धरती त्राही झाली आहे. अशा अत्याचारी खलिफास मी माझा जावाई बनवू इच्छित नाही.

हे शेखचे बोलणे ऐकून खलिफाचा राग उफाळून वर आला. त्याचे डोळे रागाने लाल झाले. सर्व दरबारीही थरथर कापू लागले. आता दरबारात रक्ताच्या नद्या वाहतील, असे वाटू लागले.

त्यावर खलीफा म्हणाला, "शेख तुम्ही कोणासमोर बोलता ते माहित आहे ना !"

शेखनी शांतपणे उत्तर दिले, होय मला माहित आहे. सत्यवादिता हाच माझा धर्म आहे."

"शेख, पुन्हा विचार करा. हे लग्न करण्यातच तुमचे कल्याण आहे. तुमची भलाई आहे." खलिफा म्हणाले.

"मला या जगतातील कल्याणाची भलाईची किंचितही गरज नाही." असे म्हणून शेख उठले व घरा कडे निघून गेले.

शेखचे नाव सईद बिन मुसय्यिब होते. मदिनेतील सर्वश्रेष्ठ विद्वान होते. संपूर्ण मदिनेत त्यांच्या शब्दाला मान असे. सर्व जण त्यांचा आदर करीत असत.

खरे पाहिले असता, अब्दुल बिन मलिक मरवान शेखना धोका देऊ इच्छित होता. त्याच्या मुलाशी खलिदशी शेखच्या मुलीशी विवाह करून, त्याच्या नंतर खलिफा होणाऱ्या वलिदला मदिनेच्या लोकांचा पाठिंबा मिळवू इच्छित होता. हे तो शेखच्या सहाय्याने करणार होता.

शेख खलिफाच्या दरबारातून निघून सरळ घरी आले. तेथे थोडी विश्रांती घेतली. त्या नंतर ते मस्जिद-ए-नबवी मध्ये गेले. ते तेथे त्यांच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यास बसले.

शेख - अबू बर्रा, तुम्ही तीन दिवस कां गैरहजर होता ?

अबू बर्रा - माझ्या पत्नीचे देहावसान झाले. तिच्या दफन क्रियेत व शोकात तीन दिवस गेले.

शेख - मग तुम्ही दुसरे लग्न केले कां ? अबू बर्राच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. गळा भरून आला. ते म्हणाले, "मी एक निर्धन विद्यार्थी आहे. मग माझ्या बरोबर लग्नास कोण तयार होईल.

शेख - तुमच्या जवळ किती रक्कम आहे ?

अबू बर्रा - तीन दिरहम

शेख - मी माझ्या मुलीचा विवाह तुझ्या बरोबर करू इच्छितो. तुम्ही माझ्या मुलीस स्वीकाराल काय ?

अबू बर्रा - माझे अहो भाग्य हुजूर. मी आपल्या आज्ञे बाहेर नाही.

शेख - निकाहचा खुत्बा पढवतात. "दोन 'दिरहम' माहेरच्या बदल्यात मी माझ्या मुलीचा विवाह तुमच्याशी करून देतो. बोला तुम्हास कबूल आहे."

अबू बर्रा - "जी हा ! कबूल आहे."

त्या नंतर जमलेले लोक आपापल्या घरी निघून गेले.

अबू बर्रा स्वतःच्या दारी, अंथरूणावर पडून आज घडलेल्या घटनावर विचार करीत होता. पण त्याला खरे वाटत नव्हते की त्याचे लग्न झाले आहे. आणि ते सुध्दा शेख सारख्या धार्मिक नेत्याच्या मुलीशी. ती मुलगी सुध्दा इस्लामी जगतात विद्वान म्हणून प्रसिध्द होती. मोठ मोठे विद्वान तिच्याकडे विद्या शिकण्यास येत असत. विचार कर करून तो हैराण होत होता की, "खरच मी त्या विदूषीचा पती आहे.?"

इतक्यात दरवाजातून हाक आली. अबू बर्रा तो दचकला. नाव विचारल्या वरून येणाऱ्याने नाव सांगितले, 'सईद'. त्याच्या काहीच लक्षात आले नाही. तो विचार करू लागला की, इतक्या रात्रीचे त्याच्याकडे येणारा हा 'सईद' कोण ? 'सईद बिन मुसय्यिब' हे नाव काही केल्या त्याच्या लक्षात येईना. कारण चाळीस वर्षापासून शेखना कोणाच्या घरी जाताना पाहिले नव्हते. ते कधीही मस्जिद-ए-नबवी आणि त्यांचे घर या शिवाय ते कोठेही जाताना दिसत नसत.

शेवटी अबू बर्राने दार उघडले. त्याच्या समोर शेख-सईद बिन मुसय्यिब उभे होते.

अबू बर्रा आश्चर्यचकित जाला. त्याला वाटले. शेखना त्यांच्या मुलीशी माझे लग्न लावून दिल्याची चूक जाणवली असावी. आता पश्चाताप व्यक्त करावयास आले असावेत. इतक्यात शेख म्हणाले, "अबू बर्रा तुमचे लग्न झाले आहे. आता तुम्ही पती पत्नींनी वेगळे राहावे हे मला पसंद नाही. ही पहा तुमची पत्नी!" शेखनी अबूबर्राच्या हातात त्यांचय मुलीचा हात दिला. आणि निघून गेले.

असा आहे इस्लामी इतिहास. त्याच्यावर आम्हास गर्व आहे. परंतु आज गैर मुस्लिम आमची दुर्दशा पाहून आमच्या धर्मास बदनाम करीत आहेत. यात त्यांचीच फक्त चूक नाही. याचे कारण आम्ही इस्लाम पासून दूर जात आहोत. जर मुस्लिमांनी इस्लामचा खऱ्या अर्थाने स्वीकार केला तर त्या प्रकाशाने सर्व जग प्रकाशित होईल. आम्हास मुस्लिम बंधू कडून अपेक्षा आहे की, त्यांनी पुन्हा एकदा इस्लाम आणि इस्लामी इतिहासाचे अध्ययन करावे. त्याच्या आदेशा प्रमाणे जीवन व्यतीत करावे. ईश्वर त्यांच्या कामना पूर्ण करो. (आमीन)

३५) मदिनेत रमजानचे स्वागत

रमजान महिण्याच्या आगमनासाठी खूप धूमधाम होती. दुकान दारांनी दुकाने सजविली होती. रस्ते आणि गल्लीबोळात नागरिकमावत नव्हते. एवढी गर्दी होती ! सर्व मदिना शहर प्रकाशाने न्हाऊन निघाले होते. कोणा महान पुरुषाच्या स्वागताची जंगी तयारीच असावी, असे वाटत होते. ज्यांच्याकडे रेडिओ होते, त्यांनी ते सुरु केले होते. जणू एखाद्या नव्या बातमीची उत्सुकतेने वाट पहात होते.

रेडिओवर नेहमीप्रमाणे कोणी बी.बी.सी. च्या बातम्या ऐकत नव्हते, अमेरिकन संस्कृती वरील चर्चाही ऐकत नव्हते. किंवा इस्त्राईले केलेल्या अत्याचाराच्या बातम्या ऐकण्याची कोणाला इच्छा नव्हती. सर्वांनी आपले रेडिओ (सौतुल इस्लाम) इस्लामी आकाशवाणी, मक्केवर सेट केले होते.

थोड्याच वेळात 'रियाद' च्या गव्हर्नरचा आवाज रेडिओ वर ऐकू येऊ लागला. ते सौदी अरबच्या बादशहाला सदिच्छा देत होते.

"ईश्वर, आपणास रमजानचा महिना शुभ जाईल असे करो. भविष्यात आपणास आनंदित होण्याचे अनेक अवसर प्राप्त होवोत."

हे ऐकताच, लाहन मुले आनंदाने नाचू लागली. लोक एकमेकास 'रमजान शुभ होवो', अशा सदिच्छा देऊ लागले. मस्जिद-ए-नबवी मध्ये लाल बल्ब जळू लागला. 'सला' पहाडावरून तोफांचे आवाज निनादू लागले. त्यांचा आवाज संपूर्ण मदिना शहरात घुमू लागले. एवढेच नव्हे तर मदिनेपासून दूर असणाऱ्या खेड्यातही, 'रमजान' आल्याची खबर पोहोचली. ही सगळी धुमधाम चालू होती, इतक्यात मशिदीतून 'ईशा' च्या (रात्रीच्या पहिल्या प्रहरची नमाज) नमाजची बाँग वातावरणात निनादू लागली. आज या बाँगे मध्ये नेहमी पेक्षा जास्त आकर्षण वाटत होते. जे ही बाँग ऐकत होते. तेथेच स्तब्ध उभे राहत होते. आणि मंद स्वरात 'अल्लाहो अकबर, अल्लाहो अकबर' चा घोष करीत होते.

त्या नंतर रस्त्यावरून फिरणारे एक, एक करून. मशिदीच्या रोखाने

जावू लागले. जो रस्ता थोड्या वेळा पूर्वी गजबजलेला होता, तो आता निर्मनुष्य झाला होता. दुकाने उघडी होती. त्यातील दिवे जळत होते. पण मालक आणि ग्राहक यांचा पत्ता नव्हता. दुकानातील माल उघडा पडला होता. ही जणू अल्लाहउद्दीनच्या दिव्याची जादू-ई-करामत होती. हे दृष्यच मुळी हृदयाला आकर्षिक करणारे होते. मला मधूनच शंका आली, मी स्वप्नात तर नाही ?

हे दृष्ट पाहिल्यावर मी मस्जिद-ए-नबवी मध्ये गेलो. तो तेथील गर्दी पाहून आणखीन आश्चर्य चकित झालो. मुंगीलाही शिरकावयाला तेथे जागा नव्हती, इतकी गर्दी होती. आंत आणि मशिदीच्या अंगणात मानवाचा समुद्रच जणू उमडला होता.

कोणी 'नमाज' पढत होते. कोणी कुरआन पठण (तिलावत) करीत होते. कोठे कोणी विद्वान व्याख्यान देत होते. तर काही विद्यार्थी अध्ययनात गुंग होते. अर्थात सर्वजण ईश्वराच्या आराधनेत मग्न होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिव्य प्रकाश पसरला होता.

ईशाच्या नमाजची तयारी सुरू झाली. लोक एका ओळीत (सफह) उभे राहिले. जसे फौजी शिपाई प्रत्येक कृती शिस्तीत करतात. ही शिस्त कोणा पुढाऱ्याच्या सन्मुख नव्हती की कोणा राष्ट्र पुरुषा सन्मुख. तर ही शिस्त त्या ईश्वरासाठी होती, जो प्रत्येकाच्या हृदयात निर्माण होणाऱ्या विचाराचा ज्ञाता होता. नमाजचे नेतृत्व करण्याऱ्या इमामनी, 'अल्लाहो अकबर' म्हणून आपले हात हृदया सन्मुख धरून ईश्वराच्या चिंतनास सुरूवात केली. आता असे दुष्य होते की या लोकांचा या मर्त्य जगाशी कोणताच संबंध नाही.

एका साहबींची साक्ष या बाबतीत अत्यंत प्रत्ययकारी आहे. ते म्हणतात -

''आम्ही जेव्हा प्रेषित मुहम्मद (स.) यांचे जवळ बसत होतो, तेव्हा इतक्या अदबीने बसत असू की, आमच्या डोक्यावर एखादा पक्षी जरी बसला, तरी

त्याला वाटावे, आम्ही जीवित मानव नसून फक्त मानवी पुतळे आहोत.''

पुन्हा अल्लाहो अकबर चा आवाज आला. सर्व लोक रुकू (कमरेत वाकून व गुडघ्यावर हात ठेवणे, नमाज मधील एक क्रिया) मध्ये गेले. त्या मध्ये मोठमोठे जज् (न्यायाधिश) गव्हर्नर आणि मजिस्ट्रेत होते. इन्स्पेक्टर आणि ठाणेदार होते. धनवान व निर्धन होते. बलवान आणि निर्बलाही, म्हातारे आणि अपंग, सर्व प्रकारचे लोक, सर्व जण ईश्वरापुढे नतमस्त झाले आहेत. येथे कसलाच भेद नाही.

ही आहे इस्लामी संस्कृती ! ही आहे इस्लामी समानता !! ही आहे इस्लामी शिकवण !!!

कोणी आहे ? जो इस्लामचे अध्ययन करेल ! कोणी आहे, जो इस्लामचा जीवन मार्ग दाखवून देईल ? कोणी इस्लामचा प्रचार करील असा आहे का ?

आता आणखी पाहा. सर्व लोक आपल्या पालन कर्त्या समोर, त्याच्या चरणावर झुकले आहेत. कोणालाही आपल्या सुंदर कपड्याचे भान नाही. त्यांना आपल्या मोठे पणाचीही कदर नाही. ते लोक जे आतापर्यंत डोके खाली करून मान खाली घालून उभे होते. तेच आता ईश्वराची आज्ञा मिळताच त्याच्या चरणावर लीन होऊन, त्याच्या एकमेवत्वाचे गुणगाण करू लागले आहेत. त्याचे सर्वोच्च पद त्यांनी मान्य केले आहे. गयावया करून त्याचा आशिर्वाद मागत आहेत. प्रामाणिक पणे जीवन जगण्याची प्रतिज्ञा व दुर्गुणाचा त्याग करण्याची ग्वाही देत आहेत.

या प्रकारे तो जनसमुद्र अनेक तास नमाज पढत होता. चार रकात (आवर्तन) 'फर्ज', वीस रकात 'तराबीह' आणि तीन रकात 'वित्र'

दिवसभर हॉटेल्स बंद असतील. चहाची दुकानेही कोठे दिसणार नाहीत. कोणी रस्त्यावर धुम्रपान करतांना दिसणार नाही. भांडण तंटा, शिवीगाळ वगैरे कोठेही दिसणार नाही. संपूर्ण शहर शांततेचे आगर वाटेल.

दुपारच्या नमाजनंतर काही दुकाने उघडतात. बहुतेक लोक,

खाण्यापिण्याच्या वस्तूच खरेदी करतांना दिसातत इतर दुकानात लोक कुरआन वाचतांना दिसतील.

'अस्र' च्या नमाज नंतर शहर पुन्हा गजबजले, मस्जिद-ए-नबवी मध्ये व्याख्याने सुरु झाली. विद्यार्थी अध्ययन मग्न झाले. सूर्यास्त होण्यापूर्वी एक तास अगोदरच मशिदीत गर्दी वाढू लागली. दस्तरखान अंथरले गेले. घराघरातून रोजेदारांच्या रोजाच्या इफ्तारी (समाप्ती) साठी मेवे पाठवले गेले.

सूर्यास्त होण्याची वेळ जसजशी जवळ येऊ लागली. तसतसा लोकांचा उत्साह वाढू लागला. जिकडे पाहावे तिकडे माणसेच माणसे. जणू एका विशाल पुष्प वाटिकेत रंगीबेरंगी फुलांचे 'स्नेह' संमेलनच भरले आहे. नंतर कळले की मस्जिद-ए-नबवी त दूरदूरचे लोक रोजा सोडण्यास येतात.

आता सूर्यास्त झाला आहे. लाल बल्ब लागला. तोफेचा आवाज झाला. मग दिवसभर रोजा करणाऱ्या रोजदारांनी ईश्वराची आज्ञा मिळाल्याचे मानून रोजा सोडू लागले. समाप्त करू लागले. कोठेही गडबड नाही, गोंधळ नाही. १५-२० हजार रोजदार पुरुष आणि स्त्रियांनी शांतपणे रोजा सोडला. फक्त १० मिनिटात रोजा समाप्त करून नमाज साठी तयार झाले.

रमजानच्या पूर्ण महिन्यात मी हे दृष्य डोळ्यात साठवित राहिलो. या दृष्यावर विषयावर मी जसजसा विचार करीत गेलो तेवढाच आश्चर्य चकित झालो. शेवटी मी निष्कर्ष काढला की, मुस्लिम समाज एक सुसंस्कृत, ईश्वरनिष्ठ व शिष्टाचार पाळणारा समाज आहे. म्हणून प्रत्येकाने इस्लामी नीतिचा चांगल्या प्रकारे सखोल अध्ययन केले पाहिजे.

३६) अंतिम इच्छेचे केंद्र

आज पासून १४०० वर्षापूर्वी जगाच्या एका कोपऱ्यात एका क्रांतीचा जनक जन्मला. एक ईश्वर भक्त जन्मला असा एक ईश्वर भक्त की स्वतःच्या दुबळ्या शरीरा व्यतिरिक्त दुसऱ्या कुठल्याही वस्तुचा तो मालक नव्हता. भरीस भर म्हणून त्याच्या शिरावरील मातृ-पितृ छत्रही हिरावले गेले होते.

त्या माणसाने त्याच्या भोवतालची परिस्थिती पाहिली. सभोवती अत्याचार आणि अनाचाराचे प्राबल्य होते, मूर्तिपूजा जोरात होती. क्षणोक्षणी सत्याची, न्यायाची हत्या होत होती.

या दुर्गुणांना पाहून त्याने मानवाच्या उध्दाराचा संकल्प केला. विडा उचलला तो स्वतः निर्बल, निःसहाय्य होता. तरी त्याला त्याच्या पालनकर्त्या ईश्वराचा विश्वास होता. तो मदत करील अशी त्याची खात्री होती.

ही अवस्था फक्त त्याच्याच देशाची नव्हती तर शेजारील इराक आणि रशिया या देशांचीही अशीच वाईट अवस्था होती. माणसे आपसातील युध्दात मग्न होती. आपसात रानटी क्रूर प्राण्यासारखे वर्तन करीत होती. चोरी, दरोडे आणि देवतांच्या मूर्तिपूजेत गुरफटले होती.

त्या काळात आमच्या प्रिय भारताची स्थिती कशी होती ? खडतर तपश्चर्या करून ज्यांनी येथील जनतेस ईश्वरी संदेश पोहचला होता, त्या ऋषी मुनींच्या स्पर्शाने इथला कण कण पावन झाला होता. येथे सद्धर्माची प्रदीर्घ परंपरा होती. परंतु काला बरोबरच येथील ईश वाणी विसरली गेली होती. फक्त रामायण, महाभारत व वेदाचे नाव शिल्लक राहिले होते. त्याची वास्तविक शिकवण बदलली गेली. येथे वेदाच्या एकेश्वर वादा ऐवजी अनेकेश्वरवादाने आपले प्राबल्य वाढविले होते.

अशा अंधःकार युगात एक ईश्वर भक्त एका वैराण भूमित जन्मला. वयाच्या चाळीस वर्षापर्यंत मानवी समस्येवर विचार करीत राहिला. शेवटी ईश्वराच्या दयेने मानवाच्या कल्याणासाठी, प्रलयाच्या दिवसा पर्यंत मार्गदर्शन करण्यासाठी ईश्वराने त्याची निवड केली.

त्याने ईश्वर प्रणित सुधारणांचा जेव्हा प्रसार करण्यास सुरुवात केली. तेव्हा परंपरागत दुर्गुणात लोळणाऱ्या लोकांनी त्यांचा विरोध करावयास सुरूवात केली. त्यांनी त्यांचा छळ करण्यास प्रारंभ केला. त्यांच्या येण्याजाण्याच्या मार्गात काटे अंथरले. त्याच्यावर बहिष्कार टाकला. त्याला वेडा, जादुगार वगैरे अनेक दुषणांनी संबोधित केले. त्याला अनेक प्रकारे बदनाम करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने सर्वकाही सहन केले. अतुलनीय संयम राखला. शेवटी त्याच्या नातलगांनी त्याची हत्या करण्याचे षडयंत्रही चरले. तर त्याने ईश्वरीय आज्ञेने, मातृभूमिचा त्याग करून दुसऱ्या शहरात स्थलांतर केले. जेथे सतत दहा वर्षे ईश्वरीय संदेशाचा मानवात प्रसार केला. व कृतकृत्य होऊन जगाचा निरोप घेतला.

त्याच्यावर ईश्वराने वेळोवेळी संदेश अवतीर्ण केले. ते धर्मपुस्तक चौदाशे वर्षानंतर आजही जसेच्या तसे आहे. हेच त्या क्रांताकारी माणसाच्या सत्यतेचे प्रमाण आहे. आजपर्यंत त्या ग्रंथात एका अक्षराचा बदल झालेला नाही. याच कारणामुळे अरबस्थान नव्हे तर जगातील अनेक देश त्याला ईश्वराचा दूत-प्रेषित -नबी-रसूल व खलिफा ही उपाधी देऊन संतुष्ट होतात. त्यांच्याच शिकवणी नुसार आपले जीवन व्यतीत करतात. त्यांच्या शेवटच्या विश्राम स्थलाचे दर्शन घेण्यासाठी गर्दी करतात.

मी माझ्या मनातील भावनांचे खालील प्रमाणे प्रकटीकरण करतो -

''हे ईश्वराच्या अंतीम संदेष्टया ! तुम्ही जगात अवतीर्ण झाला नसता तर मानव अंध:कारात खितपत पडला असता. त्याला शांतीचा मार्ग सापडला नसता. तो एकमेव ईश्वरा ऐवजी अनेक देवदेवतांची पूजा करती राहिला असता. आणि ईश्वरीय कृपेस प्रलयाच्या (शेवटच्या) दिवसा पर्यंत वंचित राहिला असता. आम्ही आपले हे उपकार कसे फेडणार ? आम्ही निर्बल, असहाय्य, निर्धन आहोत. म्हणून फक्त आमचा सलाम स्वीकारा. आता पर्यंत आपल्या लक्षात आले असेलच ! ते क्रांतीकारक कोण होते ? होय तेच ते ! प्रेषित मुहम्मद (स.) !

३७) अशी ही माणसे !

पहाटेच्या वेळी अंधुक प्रकाश उजळू लागला होता. रात्रीने आपली काळी वस्त्रे आवरती घेतली होती. ताऱ्यांचा प्रकाशही मंदावला होता. आकाशावर एक विचित्र उदासी होती. कोणाचा तरी निरोप घेतांना आकाश आणि ताऱ्यांना दु:खाने व्यापून टाकल्या सारखे वाटत होते.

इतक्यात वातावरणात 'मोअझ्झिन' ची बाँग श्रध्दावंतांना आवाहन करू लागली. ऐकणारे अंथरूणातून उठले. वजू करून मशिदीकडे धावू लागले.

मशिद ईश्वराच्या भक्ताने भरली. तेव्हा आमीरूल मोमीन हजरत उमर (र.) हे त्यांच्या घरातून बाहेर आले. ते मिंबर जवळ नमाज पढविण्यासाठी उभे राहिले. 'अल्लाहो अकबर' असे म्हणून हात बांधून उभे राहिले. लोकांनीही त्यांचे अनुकरण केले.

लोक आता हजरत उमर (र.) कुरआनच्या पठणास सुरूवात करतील म्हणून प्रतिक्षेत होते. पण कुरआनच्या आयती ऐवजी, 'त्याने मला ठार मारले' असा उमर (र.) यांचा आवाज ऐकू आला. लोकांना आश्चर्याचा धक्का बसला. पण जखमे मुळे विव्हळ झालेल्या हजरत उमर (र.) यांनी 'हजरत अबदुर्रहमान बिन औफ (र.)' यांचा हात पकडून नमाज पुढे चालू ठेवण्याची खूण केली. अब्दुर्रहिमान (र.) यांनी नमाज पुरी केली.

नमाज संपल्यावर जखमी हजरत उमर (र.) यांनी इब्ने अब्बासना विचारले, ''माझ्यावर कोणी हल्ला केला ते पाहा.'' अब्बासनी चौकशी करून सांगितले, ''मुगिरांचा नोकर 'अबू लुलू' ने. अबू लुलू चे नाव ऐकताच हजरत उमर (र.) यांना आश्चर्याचा धक्का बसला. ते म्हणाले, ''त्याच्याशी तर मी किती तरी चांगले वागलो, त्याचा बदला त्याने असा दिला?''

जखमी हजरत उमर (र.) यांना उचलून त्यांच्या घरी नेण्यात आले. जखम एवढी घातक होती की, त्यांच्या जगण्याची आशा फार कमी होती. हजरत उमर (र.) यांच्याही ते लक्षात आले. लोक सुध्दा भविष्यातील खलिफा कोण ? यासाठी चिंतीत झाले. नव्या खलिफाच्या निवडी नंतरच मृत खलिफाच्या दफनाची प्रथा होती. हजरत उमर (र.) अद्याप सावध होते. त्यांनी भावी खलिफाच्या निवडी साठी सहाजणाचे मंडळ नियुक्त केले. त्या मंडळात अली, उस्मान, तलहा, जुबैर, इब्ने औफ व अबू वक्कास यांचा समावेश होता. त्यांनी मार्गदर्शन केले की, ''ज्यांच्या नावावर एकमत होईल, तो माझ्यानंतर खलिफा होईल.''

हजरत मुगैरा आणि दुसऱ्या अनेक साहबींनी सुचविले की, ''आमीरुल मोमीन, आपण आपले पुत्र हजरत अब्दुल्लांना खलिफा बनवा. त्यात आम्हाला आनंदच वाटेल.''

हे बांधवांनो ! माझ्या कुटूंबाला धनाची वा खिलाफतीची गरज नाही. आता माझ्या मुलाला खलिफा बनवू नका. मी केलेल्या कृत्यामुळे काही चांगुल पणा मिळणार असेल तर त्याचा मोबदला मला मिळाला आहे. जर चूक झाली असेल तर इतकेच पूरे की, माझ्या कुटूंबातील एक व्यक्ति, अल्लाह समोर उभी राहून कृत्याचा हिशोब देईल.

मग हजरत उमर (र.) दु:खी आवाजात म्हणाले, '' हे प्रभू ! मी तुला प्रार्थना करतो की माझ्या दुराचारणाला व सत्कृत्याला बरोबर (न्याय दे) कर. जर प्रलयाच्या दिवशी खिलाफतीच्या काळातील कृत्यांचा हिशोब देऊन वाचलो, तर मी स्वत:स भाग्यवान समजेन.''

मुसलमानांच्या खलिफाची अशी भावना होती. ते खलिफा झाल्यानंतर, रात्र रात्र झोपत नसत. उपाशी लोकांचा स्वयंपाक करणे, अपंग आणि विधवांच्या घरी झाडझुड करणे ही सेवा ते नित्य करीत. सरकारी खजिन्यातून तेवढेच वेतन घेत जेवढे एका सामान्य माणसाला मिळत असे. त्यांनी त्यांच्या सेवका बरोबर समानतेचा व्यवहार केला. त्यांच्या चरित्राचे हे विशेष सांगताना इतिहास सुध्दा थकला.

हजरत उमर (र.) यांनी प्रत्येक पाऊल उचलतांना ईश्वराला आपण उत्तरदायी आहोत, असा विचार त्यांच्या मनात सदैव जागृत असे. केलेल्या कृत्याचा जाब ईश्वराला द्यावयाचा आहे. हे ते कधीही विसरले नाहीत.

आता आणखीन -

तशा जखमी अवस्थेतही त्यांनी आपले पुत्र अब्दुल्लांना जवळ बोलावले आणि त्यांना म्हणाले, ''बेटा ! हजरत आएशा (र.) कडे जा आणि त्यांना माझा सलाम सांगा, पण लक्षात ठेव'' माझ्या नावामागे आमीरुल मोमीन ही पदवी लावू नको. कारण आता मी मुस्लिमांचा खलिफा नाही. (आता पर्यंत त्यांनी नेमलेल्या मंडळाने 'उस्मानची' खलिफा म्हणून निवड केली होती) तर त्यांना तुम्ही सांगा

की, उमर (र.) आपले दोन्ही मित्रांच्या शेजारी दफन होऊ इच्छितो (अर्थात प्रेषित (स.) आणि हजरत अबू बक्र (र.))

त्या प्रमाणे अब्दुल्लानी हजरत आएशा (र.) यांना तसा निरोप दिला. त्यावर हजरत आएशा (र.) म्हणाल्या, ''खरं तर ते स्थान माझ्यासाठी राखून ठेवले होते. असो त्या स्थानासाठी मी हजरत उमर (र.) यांना प्राधान्य देत आहे.''

अब्दुल्ला परत हजरत उमर (र.) यांचेकडे आले. त्यांनी त्यांना आनंदाची बातमी सांगितली. ते ऐकून हजरत उमर (र.) यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. ते उठून बसले, व म्हणाले.

''प्रेषित (स.) आणि हजरत अबू बक्र (र.) यांच्या शेजारी माझे दफन व्हावे. या पेक्षा कोणतीही गोष्ट मला महत्वाची वाटत नाही.'' त्या नंतर म्हणाले.

''जेव्हा माझा मृत्यू होईल तेव्हा पुन्हा एकदा हजरत आएशा (र.) यांना विचारा की, ''उमर प्रेषित (स.) व अबू बक्र (र.) यांच्या शेजारी दफन होऊ इच्छितो. जर त्यांनी परवानगी दिली तर ठीकच आहे. पण नकार दिला तर साधारण मुस्लिमा प्रमाणे माझे दफन करण्यात यावे.''

तर असे होते हजरत उमर (र.) त्या वेळी त्यांच्या अधिकारात दोन तृतिअंश जग होते. परंतु मृत्यू नंतर ही सहा हात जमिनीसाठी त्यांना हजरत आएशांची परवानगी घ्यावी लागली. त्यासाठी त्यांना दोन दोन वेळा परवानगी मिळवावी लागली. तेव्हा कुठे प्रेषित (स.) व हजरत अबू बक्र (र.) यांच्या शेजारी दफन होण्याचे भाग्य लाभले.

या पृथ्वी तलवार असेही काही शासक होऊन गेले, ज्यांचा प्रत्येक क्षण ईश्वराच्या उपासनेत खर्च होत होता. आपल्या कृत्यासाठी ईश्वरापुढे जबाब द्यावयाचा आहे. ही जाणीव नित्य त्यांच्या हृदयात जागी असे. त्याला इतिहास साक्षी आहे.

विशेष म्हणजे, भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी रामराज्याची कल्पना मांडताना, हजरत उमर (र.) यांच्या खिलाफतीच्या काळाचा उल्लेख उदाहरण म्हणून केला आहे.

३८) एका शतका नंतर

सुरवातीच्या अल्लाहच्या मार्गावर चालणाऱ्या सदाचारी खलिफा नंतर खिलाफतीची सूत्रे हजरत मुआविया कडे गेली. ते उमय्या परिवाराचे प्रथम खलिफा होते. त्यांनी वीस वर्षे खिलाफत चालविली.

जगातील इतर शासकांच्या तुलनेत मुआविया हे खूप चांगले शासक होते. त्यांचे शासन बहुतांशी इस्लामी नियमाधारे चालत होते. जीवनात प्रत्येक घटनेत ते इस्लामच्या नियमानुसार त्यांचे वर्तन असे. ते न्यायी ही होते. असे अनेक चांगले गुण त्यांचे ठायी होते. तरी त्यांनी एक चूक केली.

'त्यांनी त्यांच्या नंतर खलिफा म्हणून स्वतःच्या मुलाची नेमणूक केली.'

याही अगोदर खलिफा नेमण्याची पध्दती होती. खलिफा आपल्या मागे येणाऱ्या खलिफांची नेमणूक स्वतः करत नसत. ती नेमणुक त्याच्या कुटूंबातून केली जात नसे. तर समाजातील ईश्वर निष्ठ, सदाचारी व विद्वान गृहस्थांची नेमणूक त्यांच्या विधानसभेच्या (शुरा) सभासदांच्या सल्लयाने करीत. परंतु मुआवियांनी विधान सभेचा सल्ला न घेता व राज्यात अनेक सदाचारी उपलब्ध असतांना, स्वतःच्याच मुलाची 'यजीद' ची खलीफा म्हणून घोषणा केली.

मुआवियांनी ईश्वरांने घालून दिलेला नियम मोडला. मात्र इस्लाममध्ये एक वाईट प्रथा त्यांनी सुरू केली हे तितकेच खरे. थोडक्यात खलीफा स्वतःला सर्वेसर्वा समजू लागले. सर्व जनेतला गुलाम समजू लागले. जनतेला खाजगी संपत्ती समजू लागले.

असे असले तरी याच वंशाने ईस्लामला लालमभूत होतील अशा खलिफाची भेट दिली. त्या आदर्श खलिफांचे नाव उमर बिन अब्दुल अजीज आहे.

खलिफा झाल्यावर त्यांनी काय करावे ? त्यांनी राज्य परिवारातील सर्व सहस्यांना त्यांच्या जवळील सर्व संपत्ती राज्य कोषात (खजिन्यात) जमा करण्याचा आदेश दिला. कारण ही संपत्ती त्यांना अनुचित मार्गाने मिळाली होती. राज्याच्या खजिन्यातून त्यांनाही सामान्य माणसा इतकेच मिळावी अशी तरतूद केली.

सर्वांना वरील आदेश दिल्या नंतर त्यांनी त्यांच्या घराचे निरीक्षण केले. त्यांची पत्नी फातिमा यांच्याकडे पुष्कळ जडजवाहिर व धनदौलत होती. म्हणून त्यांनी फातिमांना आदेश दिला. सर्व धन दौलत बैतुलमाल मध्ये जमा करावी.

फातिमाचे वडील 'अब्दुल मलिक' एके काळी फार मोठे खलिफा होते. ते इतिहासात शौर्यासाठी प्रसिध्द होते. त्यानी त्यांच्या मुलीचा विवाह हजरत उमरशी लावून दिला. त्यांनी त्यांच्या मुलीसाठी आंदणा मध्ये अत्यंत मोठ्या प्रमाणात धन दौलत दिली होती. मात्र ती संपत्ती बैतुलमाल ची संपत्ती होती. म्हणून हजरत उमरनी बैतुलमाल मध्ये जमा करावयास लावली.

फातिमा स्वतः धनलोभी होत्या. त्यांनी काकू केले. तेव्हा हजरत उमरनी अगदी स्पष्ट शब्दात निर्णय दिला -

''हे बघ फातिमा ! मी तुला मोकळीक देतो, की एक तर संपत्ती निवड किंवा मला तरी निवड. मी इस्लाम राज्याचा खलिफा आहे. अवैध धन आणि खलिफा एकत्र राहू शकणार नाहीत, हे जाणून घे.''

त्या नंतर फातिमाने त्यांच्या जवळचे सर्व धन राजकोषात जमा केले.

उमर बिन अब्दुल अजीज यांनी खलिफा होताच संपूर्ण राज्यव्यवस्था बदलली. दरबारातील रक्षकावर व सुरक्षा कर्मचाऱ्यावर लाखो रूपये खर्च होत होता. खलिफाच्या रथाला (वाहनाला) बारा घोडे जुंपले जात होते. त्या रथात शेकडो रुपयाची गादी होती. ते सर्व त्यांनी बैतुलमाल मध्ये

जमा केले. त्यांनी फक्त 'उंटनी' वाहन म्हणून पसंद केले. राजवाडा सोडून ते त्याच्या जुन्या झोपडीत राहू लागले.

या बदलामुळे त्यांना हज़रत उमर दुसरे खलिफा यांच्या बरोबरीने समाजाने मानाचे स्थान दिले गेले. पहिल्या चार खलिफाना, हजरत अबू बक्र, हजरत उमर, हजरत उस्मान व हजरत अली यांना खुलफाए राशिदीन म्हटले जाई. राशिदीन याचा अर्थ, 'ईश्वराच्या मार्गात जाणारे धार्मिक गृहस्थ असा आहे.

आता त्या चार खुलाफाए राशिदीन मध्ये पाचवे खुलफाए राशिदीन म्हणून समाजाने त्यांचा गौरव केला.

त्यांच्या न्यायपूर्ण शासनाकडे पाहून रोमचा पोप म्हणाला,

"हजरत ईसा नंतर मेलेल्याना जिवंत करण्याचे सामर्थ्य मानवाला असते तर ते सामर्थ्य ईश्वराने उमर बिन अब्दुल अजीज यांनाच दिले असते."

मृत्यू नंतर उमर बिन अब्दुल अजीज यांच्या कबरीवर प्रार्थनेसाठी आशिर्वाद मागणाऱ्या मुस्लिमा बरोबर ख्रिश्चन पाद्री ही होते. जगातील हे एकमेव उदाहरण होते.

या प्रमाणे उमर बिन अब्दुल अजीज यांनी आपल्या वर्तनाने हे सिध्द केले की, कुरआनचा उपदेशच जगात सुख आणि शांती निर्माण करू शकेल. म्हणून निष्ठापूर्वक व प्रामाणिक पणे कुरआनचा आदेश अंमलात आणणे जरूर आहे.

३९) असेही व्यापारी

आज प्रामाणिकपणा दुर्मिळच झाला आहे. बाजारापासून ते शासकीय कचेऱ्या पर्यंत अप्रामाणिक पणाचा कळस झाला आहे. बाजारात दूध, तूपा पासून ते सोन्या चांदी पर्यंत भेसळीचे प्रमाण वाढले आहे. कोणतीही वस्तू शुध्द स्वरुपात मिळणे दुरापास्त झाले आहे. जीवन दायी औषधे सुध्दा नकलीपणा पासून मुक्त नाहीत. कायद्याची पुस्तके फक्त शोभे पुरती उरली आहेत. प्रत्यक्ष व्यवहारात कायद्याचा धाक कोठे दिसत नाही.

इस्लामने मानव जातीस दोन विश्वासाद्वारे आश्वासन दिले आहे. त्या पैकी पहिली बाब ईश्वरावर विश्वास ठेवणे व दुसरी बाब आखरतच्या दिवशी अल्लाह समोर कृत्याच्या चौकशी वर विश्वास ठेवणे या आहेत. त्याच्या धाकाने मानव सत्यापासून ढळू नये, हा अल्लाहचा हेतु होता. इस्लामच्या प्रभातकाळी प्रामाणिक पणाची काय अवस्था होती ते खालील घटना वरून आपल्या लक्षात येईल.

१) एका व्यक्तिने आपला उंट विकावयास आणला. त्या उंटाच्या पायात काही दोष होता. त्याने तो उंट एका व्यक्तिस ३०० दिरहम मध्ये विकला. तेथे एक महात्मा हजरत 'वासिला इब्ने असका' हे हजर होते. त्यांचे लक्ष त्या खरेदी विक्रीच्या व्यवहारावर नव्हते. पण थोड्या वेळानंतर, त्यांच्या लक्षात, तो उंट पायात दोषी असल्याचे आठवले. ते पळतच उंट खरेदी करणाराच्या मागे धावले. त्यांनी त्यास गाठून उंटाच्या पायात दोष असल्याचे सांगितले. त्या माणसाने तो उंट मूळ मालकास परत दिला. त्यावर तो उंट विकणारा म्हणाला,

''तुम्हीमध्ये कशाला पडला तुमच्यामुळे झालेला सौदा रद्द झाला ना?''

त्यावर वासिका इब्ने असका म्हणाले,

प्रेषित मुहम्मद (स.) म्हणाले होते की, ''एखादी वस्तू विकतांना, त्या वस्तूचे दोष खरेदी करणारास न सांगणे, हे योग्य नाही. तुम्हाला वस्तुतील

दोष माहित असतांना लपवणे चूक आहे. मुहम्मद (स.) यांनी, लोकांचे हित पाहावे आणि लोकाबरोबर चांगला व्यवहार करावा, अशी शपथ घेतली आहे.''

२) बसराच्या एका व्यापाऱ्यास त्यांच्या नोकराने निरोप पाठवला. ''या वर्षी ऊसाचे उत्पादन कमी झाले आहे. त्या मुळे साखरेची किंमत वाढण्याची शक्यता आहे. शक्यतो आपण ही बाब गुप्त ठेवावी, जेणेकरून आपणास भरपूर नफा मिळवता येईल.''

मालकाने नोकराच्या सल्यावरून साखरेची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. त्याने ती सगळी साखर एका व्यक्तिस विकली. त्या व्यवहारात त्याला तीस हजार 'दिरहम चा' फायदा झाला.

त्या नंतर त्या व्यापाऱ्याच्या लक्षात आले की, आपण ऊसाच्या उत्पादनाची गोष्ट इतरा पासून लपविली, हे योग्य नव्हते. तो विचार करून तीस हजार 'दिरहम' घेऊन त्या व्यापाऱ्याकडे गेला. त्याने तीस हजार 'दिरहम' त्या व्यापाऱ्या समोर ठेवले व ते घेण्याची विनंती केली. रक्कम परत करण्याचे कारण विचारले असता त्याने खरे कारण सांगितले. तुम्हास ऊसाच्या पिका बाबत अंधारात ठेवणे नैतिक नव्हते, केव्हाही योग्य नव्हते. असा खुलासाही त्याने केला. त्या व्यापाऱ्याने ती रक्कम घेण्यास नकार दिला. तेव्हा तो रक्कम घेऊन परत गेला. रात्रभार तो बेचैन होता. त्याने मन त्याला खात होते. दुसऱ्या दिवशी पहिला व्यापारी साखर खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याकडे गेले. जेव्हा दुसऱ्या व्यापाऱ्याने ती रक्कम स्वीकारली तेव्हाच त्याचे मन शांत झाले.

३) 'हजरत सिर्री सकती' हे थोर महात्मा होते. तसेच ते व्यापारीही होते. त्यांचा नियम होता की व्यवहारात ३% पेक्षा जास्त नफा घ्यावयाचा नाही. एकदा त्यांनी साठ दिरहमचे बदाम खरेदी केले. अचानक बदामाचे भाव वाढले एक दलाल बदामाचा सौदा करण्यास आला. मी हा सौदा एका अटीवर करण्यास तयार आहे. हे बदाम ६३ दिरहम पेक्षा जास्त किमतीस विकू नका. ''अहो पण हा

तर आता १०० दिरहमचा माल आहे'' तो दलाल म्हणाला. ते दलालास म्हणाले, ''मी माझा नियम मोडू शकत नाही, मला जादा नफा नको आहे.''

४) हजरत मुआविया शेवटच्या दिवसात म्हणाले, ''हे लोकहो ! ज्या शेताचे पीक काढून-कापून घेतले आहे, अशा शेताचा मी अधिकारी आहे. माझ्या नंतर येणारे शासक माझ्यापेक्षाही वाईट असतील. ज्या प्रमाणे माझ्या अगोदरचे शासक माझ्या पेक्षा चांगले होते.''

आता माझा शेवट जवळ आला आहे, ''मला थोडे उठवून बसवा.''

ते त्यांच्या पालनकर्त्यांची ईश्वराची आठवण काढून म्हणू लागले.

''दूदैव माझे ! जेव्हा माझ्या अंगात रग होती ताकत होती, तेव्हा तुझी मला आठवण येत नव्हती. आता माझे शरीर गलितगात्र झाले आहे. आता उयपोग काय ?'' आणि मग पश्चाताप दग्ध होऊन रडू लागले. त्यानी ईश्वरासमोर दुवा मागितली.

''हे माझ्या स्वामी ! कठीण हृदयाच्या या म्हाताऱ्यास क्षमा कर. माझ्या चुकांची क्षमा कर. आता माझ्यावर विशेष कृपा कर. तुझ्याशिवाय मला कोणा कडूनही मदतीची आशा नाही.''

५) 'प्रेषित मुहम्मद इब्ने मुन्कदीर' फार मोठे धर्मात्मा होते. त्यांचे कापडाचे दुकान होते. त्याच्या गैरहजेरीत त्यांच्या शिष्याने ५ रु. किमतीचे ठाण १० रूपयास विकले. ते दुकानात आले तेव्हा त्यांना ही हकिगत कळली. त्यांना ते योग्य वाटले नाही. ज्याने ठाण खरेदी केले होते, त्याच्या शोधात बाहेर पडले. त्यांची भेट खरेदी दाराशी झाली. त्यांना त्याला खरी परिस्थिती सांगितली व ५ रुपये परत दिले. खरेदीदार चकित झाला. पण ते महात्मा हजरत मुहम्मद इब्ने मुन्कदीर होते. हे कळताच त्याला घटनेचा मतितार्थ समजला.

४०) तेव्हा आणि आत्ता

संध्याकाळची वेळ होती. प्रेषित मुहम्मद (स.) यांचा दरबार भरला होता. त्या वेळेस एक गरीब माणूस दरबारात आला. तो उपाशी होता. व खूप भुकेलेला होता. तो प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या जवळ आला. तो म्हणाला,

''हे अल्लाहचे प्रेषित (स.) मला फार भूक लागली आहे. मला जेवावयास द्या.''

''प्रेषित (स.) यांनी त्याची सांत्वना केली आणि घरात विचारले, ''घरांत जेवण आहे काय ?'' त्यावर घरातून उत्तर मिळाले, ''नाही ! पाण्याशिवाय घरात काही नाही.''

ते उत्तर ऐकून प्रेषित (स.) चिंतीत झाले. ते त्याच्या समोर बसलेल्या साहबींना उद्देशून म्हणाले,

''कोणी आहे ? जो अतिथीचे स्वागत करण्याचे भाग्य प्राप्त करील त्यास आपल्या घरी मेजवानी देईल.''

त्यावर एक साहबी 'अबू तलहा' उठून उभे राहिले. ते म्हणाले, ''हुजूर मी हजर आहे मी या गृहस्थांना सोबत घेऊन जाऊ इच्छितो.''

प्रेषित (स.) यांनी परवानगी दिली अबू तलहा त्या गृहस्थांना घेऊन घरी गेले. पाहुण्याला घराच्या दारात उभे करून तलहा घरात गेले. त्यांनी पत्नीला विचारले,

''स्वयंपाक तयार आहे का ?''

''अहो ! इतक्या सकाळी सकाळी भूक कशी लागली ? सर्व ठीक आहे ना ?'' तलहाच्या पत्नी म्हणाल्या.

''जेवण माझ्यासाठी नको आहे. आपल्या पाहुण्यांना जेवण हवे आहे. त्याला दारात उभे करून आत आलो आहे.''

''हे देवा ! आज तर मुलापुरतेच जेवण घरात शिल्लक आहे.'' पत्नी म्हणाल्या

''अग तू फार वाईट बातमी सांगितली आमच्या घरून अतिथी उपाशी परत जावा. या पेक्षा मोठे दुर्दैव कोणते ?'' तलहानी चिंता व्यक्त करीत उत्तर दिले.

मग ते एकाएकी पत्नीस म्हणाले, ''तू असे कर मुलांना कशीतरी लाडीगोडी लावून झोपव. मुले जेव्हा झोपतील तेव्हा पाहुण्याना जेवण वाढ.''

''परंतु अतिथी बरोबर यजमानाने ही जेवणे आवश्यक आहे ना ? एका माणसाचे जेवण दोघांना कसे पुरेल ?'' तलहाच्या पत्नी म्हणाल्या.

''तू काही काळजी करू नको. माझ्या लक्षात एक युक्ति आली आहे.'' तलहा म्हणाले

''ते कसं ?'' पत्नी म्हणाल्या

''हे बघ ! आम्ही जेव्हा जेवावयास बसू.तेव्हा तू काहीतरी करून दिवा विझव'' तलहा म्हणाले.

''ठीक आहे. आले लक्षात, युक्ति छान आहे.''

थोड्या वेळानंतर मुले उपाशीच झोपली. त्यानंतर जेवण वाढले गेले. अतिथी आणि यजमान प्रथेप्रमाणे दस्तरखान वर बसले.

जेवण सुरू होताच ठरल्याप्रमाणे दिवा विझवला. तेव्हा यजमानांनी जेवणात हात आखडता घेतला. अबू तलहा जेवल्या सारखी क्रिया करीत राहिले. तोंडाने जेवल्याचा अभिनय करीत आवाज काढू लागले.

या प्रकारे अतिथी पोटभर भोजन करून संतुष्ट झाले. आणि यजमान अतिथी तृप्त झाला, या विचाराने उपाशी पोटीच ते संतुष्ट झाले.

पाहा ह्या दोन काळातील फरक एक काळ असा होता, त्या वेळी ही लोक उपाशीपोटी जीवन जगत होते. आणि आजही उपाशी पोटी राहतात. त्या वेळी उपाशी राहत होते ते राष्ट्रधुरीण आणि बादशहा. आणि आता सामान्य जनता उपाशी राहते. समाज धुरीण आणि राष्ट्राचे पुढारी चैनीत राहत आहेत. पूर्वी मुले बाळे उपाशी झोपत असत. आजही मुलेबाळे उपाशी झोपतात. पुढाऱ्यांचे पाळलेले कुत्रेही गरिबाच्या मुलापेक्षा किती तरी चांगले अन्न खातात. तसे अन्न, घामगाळूनही गरीब लोक आपल्या मुलांना देवू शकत नाहीत.

किती फरक आहे ? काल आणि आज मध्ये हा फरक कसा दूर करता येईल ? याचा विचार आता करणे आवश्यक आहे !!

४१) कुरआन जग प्रसिध्द व्यक्तिंच्या नजरेतून

(१) "कुरआनचे मी अनेक वेळा अध्ययन केले आहे."

सत्य आणि अहिंसेची शिकवण कुरआन मध्ये पाहून मला खूप आनंद झाला." असे राष्ट्रपिता महात्मा गांधी आवर्जून उल्लेख करतात.

(२) 'श्रीमती सरोजनी नायडूंनी' एक जानेवारी १९४७ ला कलकत्यात या महान ग्रंथा बद्दल खालील प्रमाणे विचार प्रदर्शित केले.

"कुरआन मजीद शिष्टाचार आणि न्यायाची घोषणा करते. ती स्वातंत्र्याची सनद आहे. व्यावहारिक जीवनात सत्य आणि न्यायाची शिकवण देणारा श्रेष्ठ ग्रंथ आहे. जीवनाचे सर्व पैलू आणि समस्यांची उत्तरे देणारा कुरआन सारखा एकही धार्मिक ग्रंथ नाही. आमच्या सर्व समस्यांचे व जीवनाच्या सर्व अंगाचे व्यावहारिक समाधान कुरआनने सादर केले आहेत. तसे अन्य कोणाही धर्मग्रंथाने केलेले नाही."

(३) 'नेपालियन' कुरआन बाबत म्हणतात -

"तो दिवस फार दूर नाही. जेव्हा जगातील सर्व देशांचे नीतिज्ञ एकत्र येऊन कुरआनच्या सिध्दांता प्रमाणे एकाच शासनाची स्थापना करून त्याचा स्वीकार करतील. कुरआन आणि त्याची शिकवण सत्यावर आधारित आहे. मानव जातीला सुख आणि समाधान प्रदान करण्याची शक्ति कुरआनच्या विचारात आहे. म्हणून अल्लाहने पाठविलेले प्रेषित हजरत मुहम्मद (स.) व त्यांच्यावर अवतरित झालेला ग्रंथ 'कुरआन' या बद्दल मला गर्व वाटतो. मी अल्लाहचा प्रेषित मुहम्मद (स.) यांना श्रध्दांजली अर्पण करतो."

(४) मिस्टर 'रॉडवेल' कुरआन बाबत म्हणतात -

"अरबस्थानातील अज्ञानी, अशिक्षित आणि असंस्कृत समाजाला

अत्यंत थोड्या काळात, जगाचे नेतृत्व आणि शासन योग्य बनविण्यात कुरआनचा मोठा वाटा आहे. जणू जादूची छडी फिरवून क्षणात अरबामध्ये एक महान क्रांती आणली.

(५) जर्मनीचे विद्वान 'गटे' यांचे विचार आहेत -

जेव्हा जेव्हा मी कुरआन उघडतो तेव्हा त्याचे नित्य नवे अर्थ मला जाणवतात. हे पुस्तक वाचन करणाराला हळू हळू आपले से करीत असते. शेवटी त्याच्या विचारावर, मनावर प्रेम प्रभाव पडतो.

(६) प्रसिध्द इतिहासकार 'गिब्सन' हे खालील शब्दात कुरआन बद्दल श्रध्दा प्रगट करतात.

"एकेश्वर वादाचा स्पष्ट खुलासा करणारा व मनावर एकेश्वर वादाचा पगडा बसविणारा 'कुरआन' हा एक महान ग्रंथ आहे."

(७) 'इन्साइक्लोपिडिया ऑफ ब्रिटानिकाचे' संपादक लिहितात.

"जगात सर्वात जास्त वाचले जाणारे व पाठ केले जाणारे एकमेव पुस्तक 'कुरआन' आहे कुरआनचा हे वैशिष्टय जगातील कुठल्याही धार्मिक पुस्तका बाबत दिसून येत नाही."

(८) डॉक्टर 'मौरिस बुकैले' लिहितात -

"आधुनिक ज्ञानाच्या प्रकाशात, कुरआनचे नि:पक्षपाती पणाने अध्ययन केल्यास आधुनिक ज्ञानात व कुरआनात मतैक्य दिसून येते. ज्या वेळी आधुनिक ज्ञान उपलब्ध नव्हते, त्या वेळी हजरत मुहम्मद (स.) यांच्या काळातील व्यक्ति, त्या काळातल्या ज्ञानावर असे (अत्याधुनिक विचाराचे) पुस्तक लिहू शकेल हे शक्य वाटत नव्हते."